# बोरधरण परिसरात वाघिणीचा वावर वाढला

## पाण्याअभावी वन्यप्राणी गावांकडे

**सेलू/प्रतिनिधीः-** बोर व्याघ्र प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या बोरी व बोरधरण परिसरात 'कॅटरिना' या वाघिणीचा व तिच्या बछड्यांचा वावर गेल्या काही दिवसांत वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. उन्हाळ्याच्या तडाख्यामुळे जंगलातील पाणवठे कोरडे पडत चालले असून, तहानेने व्याकुळ झालेले वन्यप्राणी आता गावांच्या दिशेने वळत असल्याचे चित्र समोर आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, व्याघ्र प्रकल्पात जुना बोर व वन्यजीव असे दोन विभाग असून, या दोन्ही क्षेत्रांत मिळून सुमारे ७५ ते ८० पानवटे आहेत. मात्र, मार्च महिन्यातच अनेक पानवटे कोरडे पडल्याने वन्यप्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. नैसर्गिक जलस्रोत आटले असून, झाडांची हिरवाई कमी झाल्याने सावलीचाही अभाव जाणवत आहे. परिणामी, वाघ, हरिणे व इतर प्राणी पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे धाव घेत आहेत.

वनविभागाकडे उपलब्ध साधनसामग्री अपुरी पडत असल्याचेही या निमित्ताने स्पष्ट झाले आहे. सुमारे ७५ ते ८० पानवट्यांसाठी केवळ दोन



टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याने अनेक पानवटे रिकामेच राहिले आहेत. उन्हाळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण होणे अपेक्षित असलेली पानवट्यांची दुरुस्तीची कामेही अद्याप प्रलंबित असल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे.

दरम्यान, 'कॅटरिना' वाघीण आणि तिचे बछडे बोरी गावालगत दिसून आल्याने ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे धोकादायक बनले असून, नागरिकांनी सतर्कता बाळगण्यास सुरुवात केली आहे. वेळीच पाण्याची व्यवस्था केली असती, तर वन्यप्राणी गावाकडे वळले नसते, अशी प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

या घडामोडींचा परिणाम शेतीवरही दिसून येत आहे. वन्यप्राणी शेतात शिरत असल्याने पिकांचे नुकसान होत आहे. तसेच, वाघिणीच्या भीतीमुळे शेतमजूर कामावर जाण्यास घाबरत असल्याने शेतीकामांवर परिणाम झाला आहे.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. पानवटे त्वरित भरावेत, टँकरची संख्या वाढवावी आणि वन्यप्राण्यांच्या वावरावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# आज संत गाडगेबाबांची दशसूत्री व ग्रामविकासावर विद्यापीठात कार्यशाळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र आणि महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार २३ मार्च २०२६ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. 'संत गाडगेबाबांची दशसूत्री व ग्रामविकास' हा या कार्यशाळेचा मुख्य विषय असून, ग्रामीण भागातील प्रशासकीय कामकाज आणि विकास प्रक्रियेवर यात सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरियल रिसर्च सेंटर येथे सकाळी ११ वाजता या कार्यशाळेचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य हर्षवर्धन देशमुख यांच्या शुभहस्ते होणार असून, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळा चे आजीवन प्रचारक आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवतील. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.विद्या शर्मा आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सतीश तराळ यांची उपस्थिती लाभणार आहे.

कार्यशाळेत ग्रामविकासाशी संबंधित विविध तांत्रिक आणि सामाजिक विषयांवर तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. 'ग्रामपंचायतींमध्ये नियुक्त झालेल्या प्रशासकाची जबाबदारी आणि भूमिका' यावर लिनाताई तुरकर,ट्रेनर, यशदा व सल्लागार, महाराष्ट्र सरपंच संघटना ह्या मार्गदर्शन करतील. 'शासकीय योजना राबविताना येणाऱ्या अडचणींवर' महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा. राजेंद्र कराळे भाष्य करतील. याप्रसंगी ग्रामपंचायत कार्यकाळ संपल्यानंतर विद्यमान पदाधिकाऱ्यांनाच पुन्हा संधी द्यावी, याबाबत ज्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती ते याचिकाकर्ते अरविंद दळवी यांचा सत्कार व मार्गदर्शन होणार आहे. यावेळी विविध विषयाचे निराकरण महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना विदर्भ प्रमुख ॲड. देवा पाचभाई आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय मोताळा, जि. बुलढाणा येथील महाविद्यालयात विकास समितीचे सदस्य अनिल उर्फ अण्णा पाटील हे उपस्थितांच्या शंकांचे निरसन करतील. दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेचा समारोप दुपारी ४:०० वाजता चहापान आणि प्रमाणपत्र वितरणाने होणार आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. दिलीप काळे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे आणि महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना चे अध्यक्ष गजानन बोंडे यांनी सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# मजुरांना घेऊन जाणारा टॅक्टर पलटी- आठ जखमी पाचची प्रकृती गंभीर

**सेलू/प्रतिनिधीः-** सेलू-नागपूर महामार्गावर जंगलापुरजवळ रविवारी (ता. २२ मार्च) दुपारी सुमारे एकच्या सुमारास मजुरांना घेऊन जाणारा टॅक्टर पलटी होऊन झालेल्या अपघातात आठ जण जखमी झाले. यापैकी पाच जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, सेलूकडून नागपूरकडे वीज वितरण कंपनीचे साहित्य घेऊन जाणारा टॅक्टर (एमएच ३२ पी १९९९) जंगलापुरजवळ आला असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे टॅक्टर रस्त्याच्या कडेला पलटी झाला. टॅक्टरमध्ये बसलेले मजूर खाली फेकले गेल्याने ते जखमी झाले.

गंभीर जखमींमध्ये राहुल बागडी (१८), निर्मल बागडी (२१), राणी बागडी (१७), बलराम बागडी (१७) आणि




अमित बागडी (२१, सर्व रा. कोलकाता) यांचा समावेश आहे. अन्य तीन मजूरही जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच रुग्णमित्र प्रज्वल लटारे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णवाहिकेतून सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, अपघातामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता.

या प्रकरणाचा पुढील तपास सेलू पोलिसांकडून सुरू आहे.

# चांदूर रेल्वे शहरात 'ईद-उल-फित्र' उत्साहात साजरी

## ईदगाहवर सामूहिक नमाज पठण; बंधुभावाचा संदेश

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान ईद (ईद-उल-फित्र) सण शनिवारी (ता. २१) चांदूर रेल्वे शहरात मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. शहरासह तालुक्यातील शेकडो मुस्लिम बांधवांनी ईदगाह मैदानावर एकत्र येत सामूहिक नमाज अदा केली व देशातील शांतता, सुख-समृद्धीसाठी अल्लाहकडे प्रार्थना केली.



महिनाभर रमजानचे रोजे पूर्ण केल्यानंतर साजरा होणारा 'ईद-उल-फित्र' हा मुस्लिम समाजातील अत्यंत महत्त्वाचा सण आहे. या सणाच्या माध्यमातून आपापसातील हेवेदावे, मत्सर विसरून एकत्र येण्याचा व बंधुभाव वाढविण्याचा संदेश दिला जातो. तसेच आत्मशुद्धी, संयम आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्वही या सणातून अधोरेखित केले जाते. ईदच्या नमाजपूर्वी दानधर्म करण्याची परंपरा असून, याला 'सदका-ए-फित्र' असे म्हटले जाते. समाजातील दीनदुबळ्यांबद्दल जाणीव ठेवून अनेकांनी गरजूंना आर्थिक मदत केली आणि त्यानंतरच नमाजासाठी ईदगाहकडे प्रस्थान केले. शहरातील ईदगाह मैदानावर सकाळी ८.१५ वाजता मुख्य नमाज अदा करण्यात आली. यावेळी मौलवी सिराज यांनी नमाज पठण केले. तर कुऱ्हा रोडवरील मस्जिदमध्ये सकाळी ८.४५ वाजता आलीम अक्रम लाखानी यांनी नमाज अदा केली. नमाजनंतर सर्वांनी एकमेकांना आलिंगन देत 'ईद मुबारक'च्या शुभेच्छा दिल्या.

ईदनिमित्त सकाळपासूनच मुस्लिम बांधव नवीन पोशाख परिधान करून नमाजासाठी ईदगाहकडे जाताना दिसून आले. सर्वांनी एकत्र येत आनंद, उत्साह आणि बंधुभावाने सण साजरा केला. ईदच्या दिवशी प्रत्येक घरात पारंपरिक गोड पदार्थ 'शीरखुर्मा' तयार करण्यात आला. दूध, शेवया आणि सुकामेव्याने बनवलेला हा पदार्थ ईदच्या आनंदात अधिक भर घालणारा ठरतो. सकाळपासूनच घराघरांत शीरखुर्मा तयार करण्याची लगबग सुरू होती.

**राजकीय व्यक्तींनी दिल्या शुभेच्छा-** ईदगाह मैदान परिसरात माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांसह उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच वंचित बहुजन आघाडीचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक निलेश विश्वकर्मा यांनीही मुस्लिम भागात भेटी देत शुभेच्छा व्यक्त केल्या. याशिवाय माजी नगराध्यक्ष गणेश रॉय यांनीही मुस्लिम बांधवांशी चौकात भेट घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.

# १ व १० वरिल उर्वरित

### अखेर बेपत्ता सर्वज्ञचा नाल्यात

घातपात आहे, याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. बालक नाल्यात कसा पडला, तो एकटाच होता की त्याच्यासोबत कोणी होते, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप अनुत्तरित आहेत.

या घटनेमुळे निंबाळकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात शोककळा पसरली आहे. एका निष्पाप बालकाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पुढील तपास एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

### बच्चू कडू यांच्या मेळघाट संघर्ष

रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करून अत्याधुनिक सुविधा व अतिरिक्त पदभरतीला मान्यता देण्यात आली आहे. गेल्या १८ मार्च रोजी निर्गमित शासन निर्णयामुळे मेळघाटच्या आरोग्य व्यवस्थेत मोठा बदल माजी आमदार बच्चू कडू यांच्या मेळघाट संघर्ष महा पदयात्रेच्या माध्यमातून झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.एकीकडे या पद यात्रेत माजी आमदार बच्चू कडू यांनी मेळघाटातील शासकीय रुग्णालयात डॉक्टर - कर्मचाऱ्यांचा तुटवड्याचा गंभीर विषय मांडला होता. इमारतींचे ५० टके बांधकाम पूर्ण झाल्याशिवाय पदभरती करता येत नाही. मात्र मेळघाटची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा नियम शिथिल केला आहे. त्यामुळे आता तातडीने डॉक्टर- कर्मचाऱ्यांची नियुक्ती होऊन रुग्णसेवा सुरू होणार आहे.

यामुळे माजी आमदार बच्चू कडू यांचा पाठपुरावा निर्णायक ठरला आहे . मेळघाटातील नागरिक उपचारासाठी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात येत असतात .ही सुविधा उपलब्ध झाल्यास त्यांना उपचारासाठी दुसऱ्या ठिकाणी जावे लागणार नाही .मेळघातील अनेक भागातून गर्भवती महिला प्रसूती साठी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात येतात .यादरम्यान हा अंतर मोठे असल्याने रुग्णांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो .याकडे माजी आमदार बच्चू कडू यांनी लक्ष केंद्रित करून राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे लक्ष वेधले होते. यामुळे आता धारणी येथे १०० बेड चे रुग्णालय ३०० बेड चे होणार आहे .सोबतच चूरणी, चिखलदरा येथील ग्रामीण रुग्णालयाचा कायापालट होणार आहे .यामुळे माजी आमदार बच्चू कडू यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### चार वर्षे विश्वासाचा गैरफायदा

वेगवेगळ्या बँक खात्यांचा वापर केला. या रकमेचा वापर करून आरोपीने स्वतःसह नातेवाईकांच्या नावावर मालमत्ता उभी केल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. व्यवहारातील अनियमितता लक्षात आल्यानंतर मालकाने चौकशी केली असता हा प्रकार समोर आला. वरुड पोलिसांनी या प्रकरणी मुख्य आरोपीसह त्याच्या कुटुंबीय व संबंधित अशा एकूण सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आर्थिक गुन्ह्याच्या या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून आणखी धागेदोरे हाती येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### श्रद्धा की बारात अनोखा रोड

आयोजकांच्या मते, हा उपक्रम शहरवासियांना एक वेगळा आणि लक्षात राहणारा अनुभव देण्याच्या उद्देशाने राबवला जात आहे.

या कार्यक्रमासोबतच 'शगुन शादी का' या मेगा स्कीमचीही सुरुवात होणार असून, ग्राहकांना खरेदीसोबत आकर्षक भेटवस्तूंचा लाभ मिळणार आहे. शहरवासियांमध्ये या भव्य बारातीबद्दल मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

### विद्युत प्रवाहाच्या झटक्याने

अचानक विद्युत प्रवाहाचा जोरदार धक्का बसला, ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला. घटना लक्षात येताच परिसरातील इतर कामगारांनी तत्काळ रितेशला जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले, जिथे त्याच्यावर तातडीने सुपर स्पेशालिटीत उपचार सुरू झाले. परंतु रविवारी सकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर बांधकाम क्षेत्रात सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्न निर्माण झाले आहेत. संबंधित ठिकाणी योग्य विद्युत सुरक्षा उपाय केले होते का, याची चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे. घटनेची नोंद संबंधित पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

### अंकिता नागतोडे यांची बुलढाणा

ग्रामीण डाक सेवक म्हणून काम करत आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली होती. कठोर परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर तिने हे यश संपादन केले आहे. ती शहरातील प्रदीप देवळे यांची भाची असून तिच्या यशामुळे शहराचे नाव लौकिक झाले आहे.

अंकिताच्या या यशानिमित्त मैत्री ग्रुपच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष प्रभाकर वाघ, नगरसेवक हर्षल वाघ, तिखे बापू तसेच मैत्री ग्रुपचे सदस्य अंकुश जोशी, विकी रॉय, श्रीकांत पारगावकर, अभय बाणाईत, प्रज्वल भोयर आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी अंकिताला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत तिच्या यशाचे कौतुक केले. तिच्या या यशामुळे शहरातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

तिच्या या यशाने चांदुर रेल्वे शहराच्या मान उंचावला. तिच्या अनुभवाचा फायदा शहरातील पाणी व्यवस्थापनासाठी व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करून तिच्या यशाचे प्रेरणा घेऊन शहरातील इतर विद्यार्थ्यांनी सुद्धा असे शहराचे नाव उंच करावे अशा अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या. याच विभागात उपसंचालक म्हणून चांदुर रेल्वे शहरातीलच डॉ.चंद्रकांत भोयर हे सुद्धा कार्यरत असून या सर्व गोष्टींचा आम्हाला अभिमान आहे असे नगरसेवक हर्षल वाघ यांनी सांगितले.

### शेतकरी कर्जमाफी आंदोलनाला

मुख्यमंत्री यांचे आभार व्यक्त करण्यात आले असून, हा विजय शेतकऱ्यांच्या एकजुटीचा आणि बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील लढ्याचा असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. दरम्यान, या यशाच्या पार्श्वभूमीवर डॉ. रामपाल धारकर यांनी बच्चू कडू यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी त्यांनी गाडगे बाबांची प्रतिमा भेट देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी उभारलेल्या त्यांच्या संघर्षाचे त्यांनी कौतुक केले.

### जागतिक जलदिनानिमित्त जलदिंडी

कार्यकारी अभियंते सुरेंद्र आडे, उमप, क्षीरसागर, गुजर तसेच अधीक्षक अभियंता रमेश ढवळे यांचीही उपस्थिती होती.

ही जलदिंडी शिवटेकडी येथून बसस्थानक, इर्विन चौक, पंचवटी, शासकीय तंत्रनिकेतन मार्गे अभियंता भवन (IEI केंद्र) येथे पोहोचली. जलदिंडीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलसंपदा विभाग तसेच विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतील सुमारे ३०० जलप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

यानंतर अभियंता भवन येथे भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच अमरावती जिल्ह्यातील सात नद्यांच्या पाण्याने भरलेल्या कलशांचे पूजन करून व्याख्यान सत्राला प्रारंभ झाला. प्रसिद्ध जलतज्ज्ञ अभिजीत घोरपडे यांनी 'पाणी आणि समानता' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

आपल्या व्याख्यानात त्यांनी जागतिक स्तरावरील पाणीटंचाई व असमानतेचे वास्तव मांडले. आजही जगातील सुमारे २६ टक्के महिला व मुलींना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध नसून सुमारे ११० कोटी महिला पाण्यापासून वंचित आहेत, असे त्यांनी नमूद केले. महिलांना पाणी भरण्यासाठी पुरुषांच्या तुलनेत तिप्पट वेळ द्यावा लागतो, तसेच दररोज सुमारे २५ कोटी तास पाणी भरण्यात खर्च होतात, ही बाब त्यांनी अधोरेखित केली. जगातील सुमारे १८० कोटी लोकांना पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याची गंभीर स्थिती त्यांनी मांडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सार्वजनिक बांधकाम विभागाचे निवृत्त सचिव धनंजय धवड होते, तर मुख्य अतिथी म्हणून जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता राजेंद्र जलतारे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात धनंजय धवड यांनी समाजात अद्यापही स्त्री-पुरुष समानता प्रत्यक्षात दिसून येत नसल्याचे सांगत पाणी व्यवस्थापनाची जबाबदारी प्रामुख्याने महिलांवरच असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रदीप कोल्हे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. राम विघे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या प्रसंगी उपस्थितांसाठी भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली होती.

या व्याख्यानाला सुमारे २०० अभियंते, कंत्राटदार आणि अभियांत्रिकी विद्यार्थी उपस्थित होते.

### गुंतवणुकीच्या आमिषाने डॉक्टरची

कालावधीत वेगवेगळ्या टप्प्यांतून तब्बल ९.६० लाख रुपये ऑनलाइन हस्तांतरित केले. सुरुवातीला काही काळ आश्वासने देत वेळ काढल्यानंतर आरोपीने कोणताही नफा दिला नाही. पैसे परत मागितल्यावर टाळाटाळ करत अखेर ३ लाख रुपयांचा धनादेश देऊन उर्वरित रक्कम थकवली. उरलेले ६.६० लाख रुपये मिळवण्यासाठी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही आरोपी बेपत्ता झाला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर डॉ. चक्रनारायण यांनी तिवसा पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून, अशा आमिषांना बळी न पडण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात येत आहे.

### फॉरेस्ट डेपो परिसरात देशी

उईके हा शस्त्रासह फिरत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. तत्काळ पथकाने सॅक्रेड हार्ट स्कूलजवळ सापळा रचून त्याला अटक केली. तपासणीदरम्यान आरोपीच्या कमरेतून देशी कट्टा आढळला. विशेष म्हणजे, त्या कट्ट्यात एक जिवंत काडतूस आधीपासूनच भरलेले होते. यामुळे आरोपी कोणत्याही क्षणी गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी कट्टा व काडतूस असा एकूण १०,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपीविरुद्ध परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी पथकाने अचूक नियोजन करत यशस्वीरीत्या पार पाडली.

### आत्महत्येसाठी गर्भवती

मात्र, टेकडीची उंची अर्धवट फोडलेली असल्यामुळे आणि वर पोहोचल्यानंतर तिला चक्कर आल्याने ती बेशुद्ध होऊन पडली. हा प्रकार रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या निदर्शनास आला. त्यांनी तात्काळ दामिनी पथकाला माहिती दिली. दामिनी पथकाने तातडीने पोलीस ठाण्याशी संपर्क साधत घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. दरम्यान, टेकडीवर मोठ्या प्रमाणात बघ्यांची गर्दी जमली होती, ज्यामुळे बचावकार्य करताना अडचणी निर्माण होत होत्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी अत्यंत धाडसाने आणि कौशल्याने रोप व स्ट्रेचरच्या सहाय्याने टेकडीवर चढून बेशुद्ध अवस्थेतील महिलेला खाली उतरवले. या संपूर्ण बचावकार्यात जवानांनी काळजीपूर्वक काम करत तिचा जीव वाचवण्यात यश मिळवले. ही कामगिरी अत्यंत कौतुकास्पद ठरली आहे. यानंतर १०८ रुग्णवाहिकेचे डॉ.अंकुश राठोड व चालक शेख बासीद यांनी महिलेला तात्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र महिला गर्भवती असल्याने पुढील उपचारासाठी तिला जिल्हा स्त्री रुग्णालयात हलवण्यात आले. सध्या तिची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करत असून, आत्महत्येचा प्रयत्न करण्यामागील नेमके कारण शोधले जात आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये याबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे.

### भोंदूबाब जवळ २०० व्हिडिओ

आपण कुठल्या पदावर आहोत. कुठली शपथ घेतली. कुठल्या संविधानामुळे आपण या पदावर आहोत, हे सर्व विसरून देश उद्ध्वस्त करण्यासाठी भाजपाकडून ही भोंदूगिरी पोसली जात आहे. याला भाजपा आहे. तसेच महाराष्ट्र उद्ध्वस्त होण्यामागे भाजपा आहे. विजय वडेट्टीवार यांनी पुढे या प्रकरणी आणखी एक धक्कादायक दावा केला. ते म्हणाले की, या प्रकरणाचे जवळपास २०० व्हिडिओ आहेत. त्याची माहिती आहे. त्यामधील ९० व्हिडिओ आक्षेपार्ह आहेत. त्यात अनेक मंत्री, आयएएस आणि आयपीएस अधिकारी आहेत. मोठमोठ्या हुद्द्यावर असलेले अधिकारी आहेत. या सर्वांची गच्छंती झाली पाहिजे आणि त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. आम्ही अंधश्रद्धेविरोधात कायदा आणला होता. मात्र अंधश्रद्धा पसरवणारे मंत्री जर पदावर असतील तर त्यांना त्या पदावर राहण्याचा अधिकार नाही. तो नैतिक अधिकार त्यांनी गमावला आहे, असेही विजय वडेट्टीवार यांनी यावेळी सुनावले

### अजित दादांचा विषय

नाही ना, म्हणत प्रश्न उपस्थित केले आहेत. नोव्हेंबर महिन्यात देखील अजितदादांच्या घराजवळ आणि कार्यालयाजवळ अशीच अघोरी पूजा झाली होती, अशी माहितीही मिटकरी यांनी दिली.

**बाबाच्या आश्रमाला पाणीवाटप**

आता त्या बाबाचं गाव सुद्धा बाबाच्या विरोधात गेले आहे, राज्यात अंनिसचा कायदा आहे. एवढे प्रकार घडत असताना यांचे लक्ष असायला पाहिजे होतं. त्याला पाणी कसे दिले, कोणाच्या काळात दिले, कोणकोणत्या मंत्र्यांनी सहकार्य केले. आता कोणकोण मंत्री आहेत. महायुती असो किंवा महायुती जे कोणी आहेत ते सुटणार नाही, असेही अमोल मिटकरी यांनी म्हटले.

### युद्धाचे भारतात पडसाद, घ मोदींनी

जार्डन,फ्रान्स, मलेशिया, इस्रायल आणि इराणच्या नेत्यांशी दूरध्वनीवरून संवाद साधला आहे.

दरम्यान, एलपीजीची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी देशभरात सातत्याने छापे टाकले जात आहेत. देशभरातील बंदरांवरील कामकाज सामान्य असून, कोणत्याही प्रकारची गोंधळ उडाल्याचे चित्र नाही. सरकार आखाती आणि मध्य पूर्वेतील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून असून तेथे राहणाऱ्या भारतीयांची सुरक्षा हे सर्वोच्च प्राधान्य आहे. आखाती देशांमधील भारतीय दूतावास आपल्या नागरिकांच्या सतत संपर्कात असून त्यांना सर्व आवश्यक माहिती पुरवत आहेत. अनेक भारतीय नागरिकांना संघर्षग्रस्त भागातून बाहेर काढून परत आणण्यात आले आहे.

**बैठकीत कोण कोण उपस्थित होते?** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, रसायन आणि खते आणि आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी, कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविया आणि इतर वरिष्ठ मंत्री व अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

### इराण युद्धाचा एअर इंडियाला

आणखी बदल करून ती अधिक लांबून वळवण्यात आली आहेत. यामुळे वेळ आणि इंधन दोन्ही जास्त लागत आहे. आर्थिक अनिश्चिततेमुळे प्रवाशांच्या मागणीवरही परिणाम होत आहे. प्रत्येक ग्राहक वाढीव भाडे देण्यास तयार नसतो. त्यामुळे मागणी घटण्यापूर्वी आम्ही भाडे किती वाढवू शकतो याला एक मर्यादा आहे, असेही विल्सन यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, काही जागतिक एअरलाईन्स आपली क्षमता कमी करत असताना, एअर इंडियाने युरोप आणि उत्तर अमेरिकेसारख्या बाजारपेठांमध्ये नवीन मागणी पाहून अतिरिक्त उड्डाणे तैनात केली आहेत.

### तर मुंबई, दिल्लीवर हल्ला

ओकली आहे. एकीकडे पाकिस्तानचे शेजारील देश अफगाणिस्तानसोबतचे संबंध ताणलेले असताना बासित यांच्यासारख्या व्यक्तीने भारतातील महत्त्वाच्या शहरांवर थेट हल्ला करण्याच्या उल्लेखामुळे याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.

एका चर्चेदरम्यान बासित म्हणाले की अमेरिकेने आमच्या अणुशस्त्रांना लक्ष्य केल्यास, आम्ही दिल्ली आणि मुंबईवर ब?म्बफेक करू. जर कोणी आमच्याकडे वाकड्या नजरेने पाहिले, तर पाकिस्तानकडे भारतावर जिथे हवे तिथे हल्ला करण्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही अशी वल्गना करत, आम्हाला असे व्हावे असे वाटत नाही आणि भारतालाही ते नको आहे असे सांगण्यासही ते विसरले नाहीत. दरम्यान, बासित यांनी थेट मुंबई आणि नवी दिल्लीच्या उल्लेखामुळे या विधानाची चर्चा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर सुरू झाली असून अशा प्रक्षोभक विधानांच्या परिणामांबाबत वादविवाद सुरू झाले आहेत.अब्दुल बासित हे भारतासाठी नवीन नाहीत.

### ४८ तासांत इराणचे

आहेत. डिमोना हे बेअरशेबाच्या दक्षिण पूर्वेला सुमारे ३० किमी अंतरावर एक शहर आहे. हे शहर शिमोन पेरेस नेगेव न्यूक्लियर रिसर्च सेंटरजवळ आहे, जे इस्रायलच्या सीक्रेट अणुकार्यक्रमाचे एक प्रमुख केंद्र मानले जाते.

**इराण तेलासाठी ब्लॅकमेल करतंय**दरम्यान, इराणने सुमारे ४,००० किमी अंतरावर असलेल्या दिएगो गार्सिया येथील अमेरिका-ब्रिटनच्या लष्करी तळालाही लक्ष्य केले होते. इराणची क्षेपणास्त्रे आता युरोपपर्यंत पोहोचू शकतात,.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# अजितदादांनी रुपाली चाकणकरांचा राजीनामा मागितला होता, पण सुनील तटकरेंनी तो थांबवला

**मुंबई/प्रतिनिधी :** महिलेचं लैंगिक शोषण केल्याच्या प्रकरणात कॅप्टन अशोक खरात या स्वयंघोषित बाबाला पोलिसांनी अटक केली. यानंतर कॅप्टन अशोक खरात आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे फोटो व्हायरल झाले. या फोटोंमध्ये रुपाली चाकणकर या अशोक खरातसाठी छत्री धरताना दिसत आहेत. दुसऱ्या एका फोटोत त्याची पाद्यपूजा करताना दिसत आहेत. यावरुन गदारोळ माजल्यानंतर रुपाली चाकणकर यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला. या सगळ्या गोष्टी घडल्यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी आक्रमक भूमिका मांडली आहे. तसंच काही धक्कादायक दावेही केले आहेत.

मी पक्षातली आहे म्हणून आरोप करत नाही. मी वकील म्हणून हे सगळे आरोप करते आहे. कारण चाकणकर या भोंदूबाबा अशोक खरातच्या सेक्स रॅकेटच्या त्या मुख्य सूत्रधार आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायद्यानुसार जो तपास समोर आला आहे त्यानुसार ही मागणी करते आहे की रुपाली चाकणकरांना अटक करावी. कारण चाकणकरांना सगळं माहीत असून त्यांनी दडपशाही केली. अत्यंत गंभीर आणि महाराष्ट्रातील खूप मोठं सेक्स स्कँडल आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष असलेल्या रुपाली चाकणकर मुख्य आरोपीशी संगनमत साधून हे सगळं करत होत्या. त्यामुळे रुपाली चाकणकरांना तातडीने अटक करणं गरजेचं आहे.

अशोक खरातला दोन मुलं ब्लॅकमेल करत होती. पुण्यात ती दोन मुलं आली होती त्यांच्याबाबतही तडजोड करण्यात आली. पोलिसांनाही सगळ्या गोष्टी मिळाल्या आहेत. मी दोन दिवसांत सामाजिक कार्यकर्त्यांचं नाव जाहीर करणार आहे. एसआयटीने जर नाव जाहीर केलं नाही तर आम्ही उच्च न्यायालयात जाउन रिट याचिका दाखल करणार आहे. देवाभाउंवर मला विश्वास आहे ज्या कुणाचा यामध्ये सहभाग आहे त्यांना देवेंद्र फडणवीस वाचवणार नाही याची खात्री मला आहे. अनेक महिलांनी अनेक तक्रारी रुपाली ठोंबरे पाटील यांच्याकडे येत होत्या, अशोक खरातच्या तक्रारी करत होत्या. पण संविधानिक पदाचा वापर करुन चाकणकर यांनी दडपशाही केली असाही आरोप रुपाली ठोंबरे पाटील यांनी केला आहे. रुपाली ठोंबरे पाटील यांनी एबीपी माझाशी



## अजितदादांना कटू सत्य माहीत होते-रुपाली ठोंबरे

संवाद साधला. त्यामुळे त्यांनी हे धक्कादायक आरोप केले आहेत.

रुपाली चाकणकर यांनी छत्री धरल्याचा फोटो आहे, पाद्यपूजन करत आहेत तो फोटो आहे. गुरु माउलीच्या विरोधात आलेला वर्षभरापूर्वीचा गुन्हा चाकणकर यांनी का दडपला? त्यांना अशोक खरातच्या सगळ्या गोष्टी माहीत होत्या. भोंदूबाबाला त्यांनी सांगितलं होतं की तू काहीही कर मी पदावर बसले आहे. त्यामुळेच भोंदूबाबाने महिलांवर अत्याचार केले. राज्य महिला आयोग चाकणकरांच्या काळात अशोक खरातच चालवत होता. नीट सगळ्या घटना पाहिल्या तर ही बाब लक्षात येईल असंही रुपाली ठोंबरे पाटील यांनी म्हटलं आहे.

रूपाली ठोंबरे यांनी पुढे असंही म्हटलंय की, सर्व कटू सत्य अजितदादांना माहित होतं. अजित दादांनी चाकणकर यांचा राजीनामा आधीच मागितला होता. जेव्हा अजित दादांनी चाकणकरांचा राजीनामा मागितला होता, तेव्हा सुनील तटकरे यांनी तो राजीनामा थांबवला, असा गंभीर आरोप ठोंबरे यांनी केला आहे. अजित दादा आज आपल्यात नाहीत, पण जर ते असते तर त्यांनी या लोकांना छडीच्या तालावर सरळ केले असते, असे त्या संतापून म्हणाल्या. अजित दादांना त्यांच्या शेवटच्या काळात कोणी कोणी आणि कशा प्रकारे घेरले होते, ते कोणामुळे वैतागले होते, या सर्व गोष्टी आपण येणाऱ्या काळात नावानिशी जाहीर करणार आहोत, असा इशारा त्यांनी दिला. जे दादांना जिवंत असताना करता आले नाही, ते त्यांनी वर गेल्यावर या भोंदू बाबाच्या माध्यमातून जगासमोर आणले आहे, असे त्यांनी म्हटले आहे. या सर्व प्रकरणाला आणि घडलेल्या घटनांना पूर्णपणे रुपाली चाकणकर मॅडम याच जबाबदार आहेत, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

# गरोदर महिलेवरही अत्याचार

## नाशिक हादरले! भोंदूबाबा अशोक खरातचा आणखी एक कारनामा



**नाशिक/प्रतिनिधी :** महिलेवरील अत्याचार प्रकरणी पोलीस कोठडीत असणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरातची धक्कादायक प्रकरणे आता एकापाठोपाठ एक समोर येउ लागली आहेत. गरोदरपणात करावयाच्या पूजाविधीचे कारण देत खरातने लैंगिक शोषण केल्याप्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात दुसरा गुन्हा दाखल झाला आहे. अडचणी घेउन विश्वासाने येणाऱ्या महिलांशी भोंदूबाबा अघोरी कृत्य करीत असल्याचे पुढे आले आहे.मंत्री आणि राजकीय नेत्यांचे भविष्य कथन, सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथे ईशानेश्वर मंदिराची स्थापना या माध्यमातून दबदबा निर्माण करणारा खरात हा भक्तांच्या अडचणींवर तोडगा अथवा फलप्राप्ती होण्यासाठी मंत्र-तंत्राच्या आधारे विविध उपाय सांगून महिलांचे लैंगिक शोषण करीत असल्याचे उघड झाले आहे. यासंदर्भात एका पीडितेने हिंमत दाखवल्यानंतर दुसऱ्या प्रकरणात खरातकडे गरोदर पत्नीला घेउन गेलेला पती तक्रार देण्यासाठी पुढे आला. २१ नोव्हेंबर २०२३ ते २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत शहरातील कॅनडा कार्नरवरील ओकस प्रापर्टीज या खरातच्या कार्यालयात शोषणाचा हा प्रकार घडला. गरोदरपणातील विधी करावयाचे सांगून खरातने अत्याचार केले. याबाबत कुठेही वाच्यता केल्यास पतीसह कुटुंबियांना जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. कार्यालयात विश्वासाने येणाऱ्या महिलांशी खरातने अघोरी प्रकार केले. गुंगीकारक पदार्थ खाण्यास आणि द्रव्य पिण्यास देत असे. महिलांना मोहित करून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करीत असे. अशाच दुसऱ्या प्रकरणात सरकारवाडा पोलीस ठाण्यात खरातविरुद्ध बलात्कार आणि जादू टोणा प्रतिबंधात्मक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याआधी दाखल गुन्ह्यात भोंदूबाबाने महिलेवर तिच्या लग्नाआधी आणि लग्नानंतर गुंगीचे औषध देउन, आपण कृष्णाचा अवतार असल्याचे सांगून अत्याचार केल्याचे समोर आले. दुसरा गुन्हा दाखल झाल्यानंतर खरातला सायंकाळी विशेष तपास पथकाकडून शहर पोलिसांनी पुन्हा ताब्यात घेतले. गुन्हे शाखा युनिट क्रमांक एकच्या कार्यालयात त्याची चौकशी सुरू होती. महिलेचे लैंगिक शोषण आणि जादूटाणा प्रतिबंधक अधिनियमान्वये नाशिकमध्ये खरातविरुध्द दाखल गुन्ह्यांसह वावी आणि शिर्डी पोलीस ठाण्यात या विषयाशी संबंधित अन्य प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने आपले तात्पुरते कार्यालय रविवारपासून महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी अर्थात एमपीएमध्ये हलवले. यापूर्वी पोलीस आयुक्तालयाच्या मागील बाजूला असणाऱ्या हिमांशू पोलीस क्लब हाउस येथून पथकाचा तपास सुरू होता. मध्यवर्ती भागातील या ठिकाणी प्रसारमाध्यमांचा गराडा असे. तक्रारदारांची ओळख गोपनीय ठेवण्याच्या दृष्टीने हे ठिकाण योग्य नव्हते. बहुदा हाच विचार करून विशेष तपास पथकाने त्र्यंबक रस्त्यावरील महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीतून पुढील तपास करण्याचे निश्चित केल्याचा अंदाज वर्तवविला जातो. पोलीस प्रबोधिनी परिसरात कुणालाही थेट प्रवेश नसतो. संवेदनशील गुन्ह्याच्या तपासासाठी हे ठिकाण योग्य असल्याचे मानून पथकाने तेथून कामकाज सुरू केले. रविवारी दिवसभर संशयित अशोक खरातची चौकशी सुरू होती, असे सांगण्यात आले.

# भीषण अपघातात एकाच कुटुंबातील 4 ठार

**जिंतूर / प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील चारठाणा जवळील गणेशपुर शिवारात रविवार दि. २२ मार्च रोजी सकाळी भरधाव ट्रॅव्हल्स आणि कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील एकाच कुटुंबातील ४ जागीच ठार झाले असून अन्य २ जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातानंतर ५० ते ६० फूट अंतरावर फेकल्या गेलेल्या



कारचा चुराडा झाला आहे.याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथून डिझायर कार (क्र. एमएच १२ जीएफ ६२५९) मंठाकडे जात होती. याचवेळी समोरून येणारी ट्रॅव्हलर (क्र. एमएच २० डीडी ७६६६) ने कारला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की कार रस्त्यापासून सुमारे ५० ते ६० फूट अंतरावर फेकली जाउन तिचा अक्षरशः चुराडा झाला. या अपघातात सय्यद अझर सय्यद महेमूद, सुमैया सय्यद अजहर आणि एक लहान बालक जागीच ठार झाले तर सय्यद इस्माईल याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या चौघांच्या मृत्यूमुळे वसमत परिसरात शोककळा पसरली आहे. दरम्यान, कारमधील मरियम फ़ाद आणि फरवा हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जालना येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेतील ट्रॅव्हलरमध्ये १३ प्रवासी होते. त्यापैकी ४ ते ५ जण जखमी झाले असून त्यांच्यावर मंठा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ट्रॅव्हलर चालक संतोष केशवराव शिंदे (४९, रा. छ. संभाजीनगर) हे गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे. या अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. वाहनांचे पत्रे कापून जखमींना बाहेर काढण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली.

# हेलिकॉप्टर अपघातात 6 ठार

**दोहा :** मध्यपूर्वेत सध्या अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात जबरदस्त युद्ध सुरू आहे. या भागातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, कतारमधून एक अत्यंत दुर्दैवी बातमी समोर येत आहे. कतारच्या प्रादेशिक जलक्षेत्रात रविवारी पहाटेच्या सुमारास एका हेलिकाप्टरला भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला असून एक जण बेपत्ता आहे. स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार या हेलिकाप्टरमध्ये एकूण सात प्रवासी स्वार होते. अपघाताची माहिती मिळताच कतारच्या संरक्षण मंत्रालयाने तातडीने शोध आणि बचाव मोहीम सुरू केली आहे. कतारच्या संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हेलिकाप्टर अपघात झाल्यापासून त्यांचे विशेष पथक देशाच्या सागरी हद्दीत शोध आणि बचाव कार्य करत आहेत. हे अभियान कोस्ट्स आणि बार्डर्स सिक्योरिटीचे जनरल डायरेक्टरेटचे समुद्री शोध आणि बचाव पथक आणि अंतर्गत सुरक्षा दलाच्या कतार आंतरराष्ट्रीय शोध आणि बचाव पथकाच्या समन्वयाने सुरू आहे. कतारच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सातपैकी सहा जणांचे मृतदेह सापडले असून त्यांच्या मृत्यूची अधिकृत पुष्टी करण्यात आली आहे. उर्वरित एका बेपत्ता व्यक्तीचा शोध घेण्यासाठी कतारची विशेष पथके समुद्रात अत्यंत सखोल आणि व्यापक शोधमोहीम राबवत आहेत. महत्वाचे म्हणजे, हा अपघात नेमका कशामुळे झाला, यासंदर्भात अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

# हर्षवर्धन सदगीर ठरला सातवा डबल महाराष्ट्र केसरी

**पुणे :** पुण्यातील वाघोली, तालुका हवेली येथे महाराष्ट्र केसरीचा अंतिम सामना महेंद्र गायकवाड आणि हर्षवर्धन सदगीर यांच्यात पार पडला. हर्षवर्धन सदगीर याने महेंद्र गायकवाड याला ४-२ असे पराभूत केले. या विजयासह हर्षवर्धन सदगीर सातवा डबल महाराष्ट्र केसरी झाला. महेंद्र गायकवाड यानं पहिल्या हाफमध्ये १ गुण मिळवत आघाडी घेतली. यानंतर हर्षवर्धन सदगीर



याने एक गुण मिळवत बरोबरी केली. पहिला हाफ संपेपर्यंत १-१ असा सामना बरोबरीत होता. दुसऱ्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड याला एक्टिव्हिटी टास्क देण्यात आला, यात त्याला गुण मिळवता आला नाही. यामुळे हर्षवर्धन सदगीरला एक गुण मिळाला. यानंतर हर्षवर्धन सदगीर याने दोन गुण मिळवले. अशा प्रकारे हर्षवर्धन सदगीर याने ४-१ अशी आघाडी मिळवली. यानंतर हर्षवर्धन सदगीर बाहेर गेल्याने एक गुण महेंद्र गायकवाडला मिळाला. कुस्तीचा वेळ संपला तेव्हा हर्षवर्धन सदगीर याने ४-२ असा विजय मिळवला. महेंद्र गायकवाड यानं माती विभागातील अंतिम फेरीत सिकंदर शेखचा पराभव केला. तर हर्षवर्धन सदगीर याने जय पाटील याचा गादी विभागातील अंतिम फेरीत केला. यामुळे महाराष्ट्र केसरीच्या अंतिम लढतीत हर्षवर्धन सदगीर आणि महेंद्र गायकवाड आमने सामने आले. माती विभागाच्या अंतिम फेरीत सोलापूर जिल्ह्यातून महेंद्र गायकवाड आणि हिंगोली जिल्ह्यातून सिकंदर शेख आमने सामने आले होते. या कुस्तीत महेंद्र गायकवाड याने ३-० असा विजय मिळवला. पहिल्या हाफमधील पहिल्या मिनिटातच महेंद्र गायकवाड याने २ गुण मिळवले. यानंतर पुन्हा एकदा महेंद्र गायकवाड याने १ गुण मिळवला. पहिल्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड ३-० अशा आघाडीवर होता. दुसऱ्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड याच्या विरोधात सिकंदर शेख याने गुण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, सिकंदर शेख याला गुण मिळवण्यात अपयश आले. यामुळे महेंद्र गायकवाड याने मॅटवर होणाऱ्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

# राज्यातील 36 जिल्ह्यात उमेद मॉल

## महालक्ष्मी सरस महिलांसाठी बाजारपेठेचा मोठा ब्रँड- मुख्यमंत्री

**नागपूर/प्रतिनिधी :** महालक्ष्मी सरस प्रदर्शन हे केवळ विक्रीचे ठिकाण नसून महिला बचत गटांसाठी प्रभावी बाजारपेठ म्हणून कार्य करत आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यात उमेद मॉल उभारण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.या प्रदर्शनाला नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून महालक्ष्मी सरस हा प्रदर्शनाचा ब्रँड अधिक मजबूत होत आहे. राज्यात शंभर कोटी रुपयाचा व्यवहार बचत गटाच्या माध्यमातून होत असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले .या प्रसंगी महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार सर्वश्री कृपाल तुमाने, कृष्णा खोपडे, चरणसिंग ठाकूर आदी लोकप्रतिनिधी उपस्थिती होती. महालक्ष्मी सरस २०२६ मध्ये सुमारे ४०४ स्टाल्स उभारण्यात आले असून आतापर्यंत १० कोटी रुपयांची विक्री झाली आहे. ही विक्री पुढील काळात मोठ्या प्रमाणात वाढण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.राज्यात ३ ठिकाणी महालक्ष्मी सरस प्रदर्शन भरविण्यात येते आणि या माध्यमातून सुमारे १०० कोटी रुपयांची उलाढाल होत असते. यामुळे महिलांच्या उद्योगाना मोठी चालना मिळत असून पुढे त्यांना अधिक संधी निर्माण करून देण्याचे काम शासन करणार आहे. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून महिला सशक्तीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येत असून महिला अर्थव्यवस्थेच्या प्रमुख घटक बनल्या आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात लखपती दीदीअभियानांतर्गत १ कोटी महिलांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यांमध्ये उमेद माल उभारण्यात येणार असून टप्प्याटप्प्याने सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये हे माल उभारण्याचा शासनाचा मानस असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना सांगितले. नागपूर येथे महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे आयोजन अत्यंत उत्तम झाले असून यासाठी १०० पैकी १०० गुण आयोजकांना देतो आणि महिलांसाठी महालक्ष्मी सरस च्या माध्यमातून मिळणारी हक्काची बाजारपेठ दरवर्षी नागपुरात उपलब्ध करून दिली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. महिलांचे कौशल्य वाढविणे, त्यांच्या उत्पादनांचे ब्रँडिंग व मार्केटिंग करणे आणि त्यातून त्यांची उत्पादने परदेशात पाठविण्यासाठी शासन काम करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. नवसखी उद्योगिनी योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक सहाय्य मिळवून देण्याचे काम मंत्री बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात योजना आखून १ लाख रुपये महिला बचत समूहाना उपलब्ध करून दिले.

# भांडेवाडी पोलीस स्टेशनचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घघाटन

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर शहरातील वाढती लोकसंख्या, शहराच्या बाहेरील भागांमध्ये वेगाने होणारे शहरीकरण तसेच कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने भांडेवाडी येथील पोलीस स्टेशन सुरु झाले आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यास जनतेनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते आज सुसज्ज अशा भांडेवाडी पोलीस स्टेशनचे उद्घघाटन झाले. त्या प्रसंगी मार्गदर्शन



करतांना ते बोलत होते.डा.रवींद्र कुमार सिंघल, पोलीस आयुक्त निकेतन कदम तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. भांडेवाडी पोलीस ठाण्याच्या स्थापनेमुळे परिसरातील नागरिकांना जलद व प्रभावी पोलीस सेवा उपलब्ध होणार असून गुन्हे प्रतिबंध, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यास मोठी मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. या पोलीस ठाण्यात अत्याधुनिक सुविधा, तांत्रिक साधने तसेच नागरिकाभिमुख सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे पोलीसांची कार्यक्षमता वाढून प्रतिसाद वेळेत देण्यात सुधारणा होणार आहे. नागपूर पोलीस दल नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध असून, नव्याने सुरू करण्यात आलेले भांडेवाडी पोलीस ठाणे हे त्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाउल ठरणार आहे.

# लाडक्या बहिणीच्या रक्षणासाठी महायुती सरकारचे 'कॅप्टन' काय करणार?

### मंकी बात

किशोर आपटे

**राज्यात लाडकी बहिण योजना लागू करत कोट्यावधी रुपये खर्च करण्यात आले. त्यातून सध्याच्या सरकारला विक्रमी बहुमत मिळाल्याचेही सांगण्यात येते. मात्र या सरकारच्या गेल्या वर्षभराच्या काळात पड द्यामागे काय सुरू होते. उच्चभ्रु नेत्यांचा राजगुरू असलेला भोंदू बाबा महिलांचे शोषण करत होता. आणि त्यांच्या रक्षणाची जबाबदारी महिला आयोगाच्या अध्यक्षांकडे होती! आता कदाचित त्या बाबा चा एन्काउंटर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बदलापूरच्या अक्षय शिंदे प्रकरणासारखे पुरावाच नष्ट करून सर्वपक्षीय नेत्यांची प्रतिष्ठा? जपली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे!**

***हिंदू-मुस्लिम राजकीय धृ्वीकरणाचे राजकारण जोमाने होणार***

राज्याच्या विधिमंडळात सन२०२६-२७च्या अर्थसंकल्पाला मंजूरी मिळाली, त्यानंतर राज्य सरकारने महाविकास आघाडीत फूट पाडणारे धर्मस्वातंत्र्य विधेयक मंजूर करून घेतले. त्या निमित्ताने राज्यात पुन्हा एकदा हिंदू-मुस्लिम राजकीय ध्रुवीकरणाचे राजकारण जोमाने होणार यांची खात्री पटली. मात्र हे विधेयक सभागृहात मांडण्यापूर्वीच चाणाक्षपणे उद्धव ठाकरे यांनी विधिमंडळात चर्चेला उपस्थित न राहताच माध्यमांसमोर या विधेयकाला पाठिंबा दिल्याची घोषणा करून टाकली. त्यामुळे हिंदुत्वाच्या ठेकेदारीचा मक्ता आम्हीच घेतला आहे असे भासविण्याची भाजपची संधी हिसकावली गेली.

मग पायाखालची चादर हिसकावल्याने चिडलेल्या भाजपच्या नवहिंदू ब्रिगेडने मग सभागृहात अर्वाच्यपणे हातवारे, वक्तव्ये आणि आक्रमकपणा दाखविण्याची संधी साधत आपणच हिंदुरक्षक असल्याचा नरेटिव साध्य करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसले, असे जाणकारांचे मत आहे. यावेळी सभागृहात शिवसेना शिंदे गटाचे सदस्य नाममात्रच हजर होते, त्यांचे मुख्यनेते नेमके नवी दिल्लीत तीन दिवस ठाण मांडून बसले होते आणि कुछ तो गडबड है असे सत्ताधारी बाजुला कुजबूजले जात होते.

**■ मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यात कलगीतुरा?**

नवी दिल्लीत मागच्या सप्ताहात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यात कलगीतुरा रंगला होता असे जाणकारांचा कानोसा घेतला तर सांगण्यात येते. राज्याच्या अर्थसंकल्पात भाजपच्या तुलनेत शिवसेनेच्या मंत्र्यांच्या वाट्याथ्ला फारच कमी निधी देण्यात आल्याची त्यांची मुख्य तक्रार होती म्हणे. पण आता तर अजित पवारसुध्दा नाहीत. अजीत पवार वित्तमंत्री असताना अगदी उध्दव ठाकरेंच्या मंत्रीमंडळात देखील शिंदे आणि कंपनीची निधी कमी दिला हिच तक्रार होती आणि मग म्हणे त्यांनी 'उठाव' करत सुरत-गुवाहाटी करत सध्याच्या भाजपसोबतच्या नव्या हिंदुत्वाच्या सरकारची स्थापना केली. आता पुन्हा हेच तुणतुणं घेवून हे लोक अगदी नरेंद्र मोदी यांच्याकडे सदिच्छा भेटीला गेल्याचे सांगण्यात येते. ही भेट केवळ दहा-पंधरा मिनीटांची नियोजीत भेट होती. मात्र मुख्यमंत्र्यांच्या विरोधात तक्रारींचा पाढा वाचता वाचता ती भेट ५२ मिनीटांची झाली म्हणे!

गंमत म्हणजे जगात तेलटंचाई, आणि युध्दजन्य आणिबाणीची स्थिती असताना पंतप्रधानानी या शिष्टमंडळाला इतका वेळ दिला हेच आश्चर्य मानले जात आहे. या भेटीनंतर मुख्यमंत्र्यांनाही नवी दिल्लीत भेटीसाठी बोलाविण्यात आल्याचे सांगण्यात येते, त्यानुसार ते देखील जावून आले. मात्र विधिमंडळात त्यामुळे धर्मस्वातंत्र्य विधेयकाच्या बाजुने शिवसेना शिंदे गटाच्या फारश्या कुणा सदस्यांनी आपल्या सरकारची बाजू मांडल्याचे दिसले नाही, त्या उलट उध्दवसेनेच्या भास्कर जाधव आणि अनिल परब यांनी दोन्ही सभागृहात विधेयकाला समर्थन करतानाचा भाजपच्या 'स्युडो हिंदुत्वाची' 'शेलक्या' शब्दात हजेरी घेण्याचा प्रयत्न केला. तर कांग्रेस आणि राष्ट्रवादीच्या सदस्यांची गोची झाली.शिवसेना ठाकरे पक्षाने अचानक हिंदुत्वाचा पवित्रा घेतल्यानंतर संख्याबळाची वानवा असलेल्या विरोधकांमध्ये जोश राहिला नाही. त्यांच्याकडून या विधेयकाला विरोध नसल्याचे सांगण्यात आले. मात्र त्याच्या हेतू आणि उपयुक्ततेला विरोध करण्यात आला. या विधेयकाची रचनाच संविधनाच्या कलम २१ च्या विरोधात आहे. हे केशवानंद भारती खटल्याच्या निकषावर सर्वोच्च न्यायालयात टिकणार नाही. या विधेयकाचा मुळ उद्देश विशिष्ट धर्मियांना 'टारगेट' करण्याचा आहे आणि त्यातून आक्रमक राजकीय सामाजिक संघटनाकडून दुरूपयोग करून समाजात दुहीचे वातावरण तयार केले जाईल अशी मांडणी कॉंग्रेस राष्ट्रवादीकडून करण्यात आली. मात्र त्यात मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, भाजपचे योगेश सागर, सपाचे अबू आझमी कॉंग्रेसचे मुस्लिम सदस्य नितीन राउत अश्या सदस्यांमध्ये शाब्दिक चकमकी घडल्या. भाजपचे मत्स्यव्यवसाय मंत्री तर हिरीरीने हे आपल्याच विभागाचे विधेयक असल्यासारखे सातत्याने विरोधकांच्या वक्तव्यात अडथळे आणताना दिसत होते. त्यामध्ये सभागृहात वातावरण तापले आणि कामकाज तहकूब करावे लागले, शेवटी भाजपला आपणच कसे धर्मरक्षक आहोत हे दाखविण्याचा हा सोपस्कार पूर्ण करत विधेयक मंजूर करण्यात आले.

**■ कायदा संविधानाच्या तत्त्वांचे उल्लंघन करणारा ?**

त्यानंतरही त्यावर समाजात प्रतिक्रिया उमटल्या आहेत. महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक', हा कायदा संविधानाच्या तत्त्वांचे उल्लंघन करणारा असल्याचे मत ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले आहे त्यांनी म्हटले आहे की, धार्मिक धर्मांतरांना आळा घालण्यासाठी प्रस्तावित केलेले हे विधेयक कायदेशीर कसोटीवर टिकणार नाही. भारतीय संविधानाने नागरिकांना धर्मस्वातंत्र्य आणि विवाहाचे मूलभूत अधिकार दिले असून, कोणत्याही कारणाने या अधिकारांवर मर्यादा आणणारा कायदा घटनाबाह्य ठरू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, देशातील इतर काही राज्यांमध्येही अशाच प्रकारचे कायदे मंजूर करण्यात आले असून, ते सध्या न्यायालयीन आव्हानांना सामोरे जात आहेत. हे प्रकरण उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही या विधेयकाच्या वैधतेबाबत प्रश्न निर्माण होणार, असे ते म्हणाले.

या कायद्यामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप करत त्यांनी म्हटले की, समाजाचे हिंदू-मुस्लिम किंवा हिंदू-ख्रिश्चन असे ध्रुवीकरण करून मतदारसंघ मजबूत करण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच, जबरदस्तीने धर्मांतराच्या घटनांसाठी विद्यमान कायदे पुरेसे असल्याचे सांगत, नव्या कडक कायद्याची गरज नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ॲड. प्रकाश आंबेडकरांनी पुढे म्हणाले की, या विधेयकाच्या माध्यमातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप धार्मिक धृवीकरणाला चालना देत आहेत. दरम्यान, राज्य सरकारकडून या विधेयकाचे उद्दिष्ट जबरदस्तीचे धर्मांतर आणि कथित 'लव्ह जिहाद' रोखणे असे सांगितले जात असले, तरी विरोधकांकडून त्याच्या घटनात्मक वैधतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

**■ मित्रपक्षाकडून मिळालेल्या 'अपूर्ण सहकार्याचा' अहवाल?**

दरम्यान शिवसेना (शिंदे गट)चे प्रमुख आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्याच दिवशी (१७ मार्च) दिल्ली दौऱ्यात भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाशी भेटून थेट चर्चा करत होते. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या शिवसेना पक्ष आणि पक्षचिन्ह (Bow and Arrow) याबाबतच्या दीर्घकाळ चाललेल्या खटल्याचा आढावा एकनाथ शिंदे घेतल्याचे समजते. मात्र, राज्यात नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकांमध्ये महायुतीची कशी कामगिरी झाली याचा एक अहवाल शिंदेंकडून भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला देण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. ज्यामध्ये शिंदे आपली नाराजी व्यक्त केल्याची शक्यता आहे. सूत्रांच्या मते, शिंदे यांचा हा दौरा केवळ शिष्टाईसाठी नसून, महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे मजबूत करण्याच्या दृष्टीकोनातून नियोजित दौरा होता. दिल्लीत सुरू असलेल्या केंद्रीय अधिवेशनात (Parliament Session) ंहभागी होणाऱ्या शिवसेना (शिंदे गट)च्या सर्व खासदारांची एकनाथ शिंदे यांनी त्यापूर्वी (१६ मार्च) विशेष बैठक घेतली. या बैठकीत पक्षाची संसदेत नेमकी भूमिका काय असणार याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीत प्रामुख्याने दोन मुद्द्यांवर चर्चा झाली असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली. पहिला मुद्दा म्हणजे सुप्रीम कोर्टातील शिवसेना पक्ष व चिन्ह प्रकरण. शिंदे गटाचे वकील आणि पक्षाचे काही ज्येष्ठ नेते यावेळी उपस्थित होते.

दुसरा महत्वाचा मुद्दा होता मागील निवडणुकांमधील मित्रपक्षाकडून मिळालेल्या अपूर्ण सहकार्याचाअहवाल. शिवसेना पक्षांतर्गत सूत्रांनी सांगितले की, मागील तीन प्रमुख निवडणुकांमध्ये मित्रपक्ष (मुख्यतः भाजप) यांनी विविध ठिकाणी अपेक्षित सहकार्य दिले नाही. त्यामुळे शिवसेना (शिंदे गट)चे अनेक उमेदवार पराभूत झाले. या सर्व ठिकाणी निवडणुकीतील अपयशाचे कारणे, मतदारसंघनिहाय विश्लेषण आणि मित्रपक्षाच्या भूमिकेचा सविस्तर अहवाल पक्षांतर्गत तयार करण्यात आला आहे. या अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, काही ठिकाणी भाजप उमेदवाराने शिवसेना उमेदवाराला पाठिंबा देण्याऐवजी स्वतंत्र उमेदवार उभा करून किंवा अप्रत्यक्षपणे विरोध केल्यामुळे पक्षाचे उमेदवार पराभूत झाले. विशेषतः मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक आणि विदर्भातील काही मतदारसंघांमध्ये हे प्रमाण अधिक होते. पक्षाच्या आंतरिक चाचणीत या अहवालाला कठोर स्वरूप दिले गेले आहे. शिवसेना (शिंदे गट)चे खासदार, आमदार आणि जिल्हाध्यक्ष यांना या बैठकीतून काही गोष्टींबाबत स्पष्ट संदेश देण्यात आला आहे.

राज्यात धर्मांतर विरोधी कायद्याच्या मंजूरीनंतर सर्वसामान्य जनतेकडून त्याबाबत फारसा सकारात्मक प्रतिसाद आल्याचे दिसले नाही याशिवाय शिवसेना शिंदे गटाकडून भाजप विरोधात कुरबुरी सुरू असल्याच्या पार्श्वभुमीवर अचानक नाशिक येथील वावी सिन्नर येथील भोंदू बाबा कॅप्टन खरातचे तथाकथित हायप्रोफाईल प्रकरण गाजण्यास सुरूवात झाली, त्यात आधी सुषमा अंधारे आणि मग नेहमीचे यशस्वी कलाकार दमानिया कुंभार तृप्ती देसाई वगैरे यांच्याकडून आरोप-प्रत्यारोप करण्यात येवू लागले, त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या साठमारीच्या खेळात लक्ष वळविण्याच्या आणि एकमेकांची जिरविण्याच्या ओघात एक नवीच कहाणी, नवे नरेटिव असा हा खेळ सुरू असल्याचे जाणकाराचे मत आहे.

**■ लाडक्या बहिणीच्या रक्षणासाठी सरकार काय करणार?**

मात्र या खेळात एक नवे तथ्य अनायासे समोर आले आहे. लाडक्या बहिणीचा प्रचार करत योजना तयार करून महिलांचा सन्मान करणाऱ्या राष्ट्रवादी पक्षाच्या महिला अध्यक्ष आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी महिलांचा उद्धार करायचा सोडून लिंगपिसाट भोंदूबाबाच्या सेवेत स्वतः तत्पर राहून अनेक उच्चभ्रू नेत्याना त्यांच्याशी संबंधीत महिलांना या कारस्थानात सहभागी करून घेतल्याची माहिती आता समोर येत आहे. म्हणजे सध्याच्या महायुतीच्या सरकारचा वरुन किर्तन आतून तमाशा समाजाच्या समोर आल्याने आता लाडक्या बहिणीच्या रक्षणासाठी सरकार काय करणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

पूर्ण

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, २३ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# हाय टेन्शनच्या सापळ्यात अडकला तरुण

## मृत्यूनंतर संतप्त ग्रामस्थांचा ठिय्या; कारवाईची मागणी

**■ प्रतिनिधी | हिवरखेड ■**

**हिवरखेड : अकोट–सोनाळा राज्य मार्गावरील रामकृष्ण वेट ब्रिज परिसरात महावितरणच्या हलगर्जीपणामुळे एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ज्ञानेश्वर कैलास गोमासे हा तरुण आयशर ट्रकवर ताडपत्री व्यवस्थित करत असताना वरून लोंबकळणाऱ्या हाय टेन्शन वीज तारांचा स्पर्श होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना २१ मार्च रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली.**



घटनेनंतर ज्ञानेश्वरचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी तेल्हारा येथे पाठविण्यात आला. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी संतप्त नातेवाईक व ग्रामस्थांनी मृतदेह पुन्हा घटनास्थळी आणत अकोट–सोनाळा मार्गावर ठिय्या आंदोलन छेडले. रुग्णवाहिकेत मृतदेह ठेवून नागरिकांनी रास्ता रोको करत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. शेकडो नागरिकांच्या उपस्थितीमुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी हिवरखेड पोलिसांनी बंदोबस्त वाढविला असून अकोटचे उपविभागीय पोलिस अधिकारी निखिल पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली.

परिसरात अनेक ठिकाणी वीज तारा धोकादायकरीत्या खाली लोंबकळत असतानाही महावितरणकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या निष्काळजीपणामुळेच ज्ञानेश्वरचा मृत्यू झाल्याचा आरोप करत दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची आणि पीडित कुटुंबाला तात्काळ भरीव आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात आली. 'जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही,' असा इशाराही यावेळी देण्यात आला.

दरम्यान, गावातील लोकप्रतिनिधी व प्रतिष्ठित नागरिकांनी मध्यस्थी करत कुटुंबीयांची समजूत काढली. मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले आणि ज्ञानेश्वरवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंतिम यात्रेला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

ज्ञानेश्वर हा कुटुंबाचा एकमेव कमावता सदस्य होता. त्याच्या पश्चात वृद्ध आई-वडील, आजी-आजोबा, पत्नी आणि अवघ्या दोन वर्षांची मुलगी असा परिवार आहे. मुलीच्या वाढदिवसाच्या आदल्या दिवशीच पित्याचा मृत्यू झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत न मिळाल्यास उपासमारीची वेळ येऊ शकते, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## भगवंताचे अवतरण भक्त कल्याणासाठी - जनक शास्त्री

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

भूतलावर देवी देवतांचे अवतरण हे भक्त कल्याणासाठी असते. भक्तांच्या रक्षणार्थ देवी-देवता निरनिराळ्या स्वरूपात आपले अस्तित्व प्रगट करीत असतात. भक्ताचे कल्याण व रक्षणासाठी ते सदा भक्तवत्सल असतात. म्हणून खऱ्या आनंदासाठी जगदंबेच्या सानिध्यात जाऊन आपली भक्ती प्रगट करण्याचा हितोपदेश पु शास्त्री जनक जोशी यांनी दिला. जय अंबे माता संस्थान व डॉ. तृप्ती मुकेश भाटिया यांच्या संयुक्त विद्यमाने शास्त्रीनगर परिसरातील जय अंबे माता संस्थान प्रांगणात सुरू असलेल्या ऋषीकुमार संदीपनी विद्यानिकेतन पोरबंदरचे शास्त्री जनक जोशी यांच्या श्रीमद् देवी भागवत कथेत त्यांनी आपले चतुर्थ पुष्प गुंफून देवी व कृष्णाची महिमा विशद केली. या देवी भागवत कथेत पु शास्त्री जनक जोशी यांनी संगीतमय कृष्ण कथा प्रतिपादित केली.

# तलाव आटत असताना प्रशासन झोपेत

## मालेगाव (केळी) तलाव कोरड्याच्या उंबरठ्यावर!

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

मालेगाव शहराच्या दक्षिणेस असलेल्या मालेगाव (केळी) तलावातील जलसाठा दिवसेंदिवस घटत असून सध्या तलावात केवळ मृत साठा शिल्लक राहिला आहे. तरीही तलावातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा सुरूच असल्याने जलसिंचन विभागाच्या बेजबाबदार कारभारावर नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तलाव पूर्णपणे कोरडा पडण्याच्या मार्गावर आला आहे.

अलीकडेच जिल्हाधिकाऱ्यांनी उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन जिल्ह्यातील पाणी साठा आरक्षित ठेवण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र या आदेशाकडे जलसिंचन विभागाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप होत असून वरिष्ठांच्या सूचनांनाच केराची टोपली दाखवण्यात आल्याचे चित्र आहे. सध्या तलावात अत्यल्प पाणी शिल्लक असतानाही अनेक पंप रात्रंदिवस सुरू असल्याचे दिसून येत आहे.



परिणामी, तलाव पूर्ण कोरडा पडल्यास गाडगे बाबा नगर, जामा मश्जिद परिसर, मुंगसाजी नगर तसेच अकोला फाटा भागात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. कारण याच तलावाच्या बुडीत क्षेत्रातील नळगंगेच्या विहिरीवर शहराच्या पाणीपुरवठ्याचा मोठा आधार आहे. दरम्यान, तलावातील पाणी उपसा थांबवण्यासाठी नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे यांनी वीज वितरण कंपनीला पत्र देऊन पंपांचे वीज कनेक्शन खंडित करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र कंपनीने केवळ अवैध कनेक्शनवर कारवाई केली असून इतर पंप अद्यापही सुरूच आहेत. याबाबत जलसिंचन विभागाने कोणतीही ठोस पावले उचलली नसल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

तलाव कोरडा पडल्यास निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईसाठी जलसिंचन विभागच जबाबदार राहील, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे. तसेच उशिरा का होईना, प्रशासनाने तातडीने जागे होऊन पाणी उपसा बंद करावा आणि उर्वरित साठा नागरिकांसह वन्यप्राण्यांसाठी आरक्षित ठेवावा, अशी मागणी गाडगे बाबा नगर परिसरातील रहिवाशां कडून जोर धरत आहे.

# काटेपूर्णा–सोहळ अभयारण्यालगत गावांमध्ये वन वणवा प्रतिबंधासाठी जनजागृती अभियान



**■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■**

जागतिक वन दिनाचे औचित्य साधून अकोला वन्यजीव विभागामार्फत वाशिम व अकोला जिल्ह्यात पसरलेल्या काटेपूर्णा व सोहळ अभयारण्यालगतच्या गावांमध्ये वनवणवा प्रतिबंधासाठी व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात आले. जंगलात लागणाऱ्या आगीबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध आकर्षक पोस्टर, बॅनरच्या माध्यमातून माहिती देण्यात आली.

विभागीय वनाधिकारी यशवंत नागूलवार व सहाय्यक वनसंरक्षक चेतन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात 'अंगारमुक्त जंगल' अभियानाच्या प्रतिज्ञा वाचनाने करण्यात आली. काटेपूर्णा अभयारण्यालगत पिंपळशेंडा, फेट्रा व पुर, तसेच सोहळ अभयारण्यालगत गिर्डा व सोमठाणा या गावांमध्ये सरपंच, पोलीस पाटील व ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत ग्रामस्थांना जंगलाला आग लागू न देण्याची शपथ देण्यात आली. तेंदूपत्ता संकलन, कोवळ्या चारासाठी जाळपोळ, मोहफुले गोळा करताना किंवा शेतातील कामांदरम्यान लागलेली आग जंगलात पसरण्यामुळे होणारे मोठे नुकसान टाळण्यासाठी ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग मिळविण्यावर भर देण्यात आला. यावेळी प्रतिबंधात्मक नोटीस गावांमध्ये वाचून दाखवण्यात आली व दवंडी देऊन जनजागृती करण्यात आली. निसर्ग कट्टा प्रमुख अमोल सावंत यांनी उन्हाळ्यात कठीण परिस्थितीत काम करणाऱ्या वनकर्मचाऱ्यांसाठी उष्माघातापासून संरक्षण मिळावे या उद्देशाने सनकुल होमिओपॅथीच्या गोळ्यांचे वाटप केले. या गोळ्यांचे वितरण वनकर्मचारी व रोजंदारी मजुरांना करण्यात आले.

## पायाभूत सुविधा अनुदान योजनेसाठी मुदतवाढीची मागणी

**वाशिम :** अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेमध्ये ५१ टक्केपेक्षा जास्त बौद्ध विश्वस्त / सदस्य असलेल्या बौद्ध समाजातील सांस्कृतीक, शैक्षणीक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी संस्थाचे बळकटीकरण करण्यासाठी सदर संस्थांना पायाभूत सुविधा पुरवण्याकरिता रु.१०.०० लक्ष पर्यंत अनुदान देण्याची योजना राबविण्यासाठी शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे.

बौद्ध समाजातील संस्थांना पायाभूत सुविधा निर्मितीसाठी शासनामार्फत देण्यात येणाऱ्या अनुदान योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

# शाळा परिसरात उभारला 'रेन वॉटर हार्वीस्टिंग' प्रकल्प!

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण कमी होत आहे .कमी होणार्या पावसामुळे पिण्याच्या पाण्यासह शेती व्यवस्थापनाचा प्रश्न निमार्ण होत असतांना जमिनीत पाणी मुरविणे हे महत्वाचे असून ,त्यासाठी रेनवॉटर हार्वीस्टींग योजना हि अतिशय महत्वाची आहे व त्यामुळे हि योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने पुढे येणे गरजेचे असून ,जलयुक्त शिवार योजने प्रमाणे रेनवॉटर हार्वीस्टींग योजना राबवावी अशी अपेक्षा आहे . मोठ्या प्रमाणावर विकासाच्या नावाखाली वृक्षाची तोड झाली आहे .वृक्षतोडीने जंगल नष्ट झाले आहे .आज कोठेहि जंगल सापडत नाही .वृक्षतोडीच्या प्रमाणात वृक्षाची लागवड झाली नाही व ती आजहि होत नाही या सर्वांचा परिणाम हा पर्यावरणावर होत आहे . पर्यावरणाच्या असमतोलामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले आहे . मागील अनेक वर्षापासून पावसाच्या कमी प्रमाणामुळे पिण्याच्या पाण्यासह अनेक समस्या निर्माण झाल्या आहे .आजहि ग्रामीण भागात व शहरी भागात उन्हाळ्यात पिण्याचे पाणी मिळत नाही . भुगर्भागातील पाण्याची पातळी खोलावत चालली आहे . त्याचेच उदाहरण माहणजे कोठेहि बोअर घेतल्यास ४०० ते ५०० फुटा पर्यंत खोलीचे बोअर घ्यावे लागते तेंव्हा पाणी लागते अशी स्थिती निर्माण झाली आहे . याला कारण पावसाचे दिवसेंदिवस होणारे कमी प्रमाण व पावसाळ्यात जमिनीवर पडणारे पाणी हे वाहून जाणे हे एक महत्वाचे कारण आहे . त्यामुळे पावसाळ्यातील पाऊस हा एकत्रीत करून जमिनीत मुरवण्यात आला पाहिजे व त्यासाठी रेनवॉटर हार्वस्टींग हि योजना कार्यान्वीत करण्यात आली पाहिजे . संभाव्य पाणि टंचाईवर मात करण्यासाठी स्थानिक एस एम सी इंग्लिश स्कूल मध्ये रेन वॉटर हार्वीस्टींग प्रकल्प उभारत संभाव्य पाणी टंचाईवर मात करण्याचा प्रयत्न केलेला आहे . पूर्वी संस्थेला दरवर्षी उन्हाळ्यामध्ये एक ते दिड लाख रुपयांचे पाणी विकत घ्यावे लागत होते परंतु सदर हार्वस्टींग मुळे पाण्याची व पैशाची बचत झालेली आहे . उल्लेखनीय बाब म्हणजे वाशीम जिल्हा परिसरातील शाळेत उभारलेला हा पहिलाच प्रकल्प आहे . लाखाळा परिसरात नेहमीच पाणी टंचाई असते तसेच दिवसेंदिवस पाण्याची पातळीहि खोल जात आहे .पाणी टंचाईचे चटके डिसेंबर महिण्यातच जाणवायला सुरुवात होते .



## पक्ष्यांसाठी चिमुकल्यांची धडपड!

**वाशिम :** स्थानिक एस एम सी इंग्लिश स्कूलच्या राष्ट्रीय हरित सेनेच्या चिमुकल्यांनी प्राचार्य मीना उबगडे, सामाजिक वनिकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी अशोक प-हाड, सहायक वनसंरक्षक पदमाकर मोगरे, वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र कातखेडे, वनरक्षक भगवान वानखडे, अनिल लेमले व राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी , कला शिक्षीका भारती गटलेवार यांच्या मार्गदर्शनात पक्षांना रणरणत्या उन्हापासून संरक्षण आणि पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी जलपात्राची व घरट्यांची उभारणी करण्यात आली.

# वाशिम येथे पंडीत दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभीयानास प्रारंभ



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

स्थानिक वाशिम शहर मंडळ भाजपा च्या वतीने पंडीत दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षन महाअभीयान मंडळ प्रशिक्षन वर्ग कार्यशाळेला रविवार २२ मार्च रोजी स्थानिक महेश भवन येथे उत्साहात प्रारंभ करण्यात आला.दोन दिवसीय प्रशिक्षन कार्य शाळेचे उद्घाटक वाशिम मंगरूळपीर विधानसभा सदस्य आ.शाम खोडे होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हाध्यक्ष पुरूषोत्तम चितलांगे होते.मंचावार माजी आ.विजयराव जाधव नगराध्यक्ष अनील केंदळे,माजि जिल्हाध्यक्ष सुधाकरराव परळकर,वर्ग प्रभारी डॉ दिपक ढोके, माजी नगराध्यक्ष अशोक हेडा,वाशिम मंडळ अध्यक्ष मनिष मंत्री,वाशिम ग्रामीन अध्यक्ष एकनाथ कड,अनसींग मंडळ अध्यक्ष संतोष उगले,जिल्हा सरचीटनीस सौ.संगीताताई इंगोले, भाजपा न.प गटनेते बाळुभाउ मुरकुटे उपस्थीत होते.सर्व प्रथम भारतमाता पंडीत दिनदयाल उपाध्याय व शामा प्रसाद मुखर्जि यांच्या प्रतीमेचे पुजन व दिप प्रज्वलन करण्यात आले.

यावेळी आ.शाम खोडे यांनी आपल्या विचारातुन आपल्या राजकीय प्रवासाचे वर्णन केले पक्षाने जी जवाबदारी दिली ती निष्ठेने पार पाडा भाजपा मध्ये काम करणाऱ्या व्यक्तीची निश्चीतपणे दखल घेतल्या जाते .आज सर्वात मोठा पक्ष भाजप असुन आगामी विस वर्षाची रननीती कार्यकर्त्यांच्या निशते वर अवलंबुन राहिल असे सांगीतले.नगराध्यक्ष केंदळे यांनी प्रशिक्षन कार्यशाळेचा लाभ घेण्याचे आव्हान केले.

## प्रमोद मुरुमकार यांचा सत्कार

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

युरोप विदेश शेतकरी अभ्यास दौरा यशस्वीपणे पूर्ण करून मायदेशी परतलेल्या महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद मुरुमकार यांचा महाराष्ट्र राज्य परीट (धोबी) समाज संघटनेच्या वतीने २२ मार्च २०२६ सर्किट हाऊस, अकोला येथे महाराष्ट्र राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री डॉ. दशरथजी भांडे यांच्या हस्ते प्रमोद मुरुमकार यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. भांडे यांनी मुरुमकार यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत युरोप दौऱ्यातील अनुभवांबाबत आत्मीयतेने सविस्तर संवाद साधला.

# मालेगांवमध्ये भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट

## चिमुकल्यावर हल्ला; प्रशासन झोपेतच?

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

शहरात भटक्या कुत्र्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून प्रशासन मात्र याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र समोर येत आहे. वार्ड क्रमांक ८ मध्ये चि. साहिल संतोष ताजने या निष्पाप बालकावर भटक्या कुत्र्यांनी अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मागील काही दिवसांपासून शहरातील विविध भागांत लहान मुले, महिला व पुरुष यांच्यावर भटक्या कुत्र्यांचे हल्ले वाढले आहेत. तरीही नगरपंचायत प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. 'आता नागरिकांनीच आपली सुरक्षा स्वतः करायची का?' असा संतप्त सवाल सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. विशेष म्हणजे, वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कुत्र्यांच्या निर्बंधासाठी कोणतीही प्रभावी मोहीम राबवली जात नसल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.



जीव धोक्यात घालून नागरिकांनीच रस्त्यावर फिरायचे आणि प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घ्यायची का, असा रोष व्यक्त होत आहे. जर तात्काळ उपाययोजना करून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात आला नाही, तर नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन छेडतील, असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

मालेगाव शहरात भीतीचे सावट असताना नगरपंचायत प्रशासन कधी जागे होणार? हा प्रश्न आता सर्वांच्या मनात घर करून बसला आहे.

## आजपासुन एस.एम.सी संस्थेत एक्युप्रेशर शिबीराला सुरूवात



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

स्थानिक एस.एम.सी शिक्षन प्रसारक मंडळ,सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय व शारीरीक शिक्षन विभागाच्या वतीने एक्युप्रेशर रीर्सच ट्रेनिंग व ट्रिटमेंट संस्थान जोधपुर राजस्थानच्या वतीने विशेषज्ञाद्वारे एक्युप्रेशर शिबीराला सोमवार २३ मार्च ते २८ मार्च पर्यंत आयोजित करण्यात आले आहे.स्थानिक लाखाळा येथे सावित्रीबाइ फुले महिला महाविद्यालय येथे शिबीर सकाळी ८ ते १२ व दुपारी ४ ते ८ वाजे पर्यंत आयोजित करण्यात आले आहे.यामध्ये शुगर, ब्लडप्रेशर ,मोटापा, घुटन्याचा दर्द ,गॅस ,कब्ज, सर्वाइकल दर्द,कमर दर्द, जुनी डोकेदुखी, सायीटीका, डोळे, थॉयराइड, लकवा ,मस्सा बवासीर,मानसीकतानतनाव ,हाथ व पाया व वेदना,वेरीकोज वेन्स आदी सह अनेक रोगावर औषधीवीना एक्युप्रेशर सुजोक व वाइब्रेशनच्या माध्यमातुन उपचार विशेषज्ञ डॉ.राजेंद्र सारन , सी.आर चौधरी,करनार आहे.सदर शिबीराच्या नोंदनी करीता प्रा.डॉ.शुभांगी दामले,प्रा.डॉ.प्रज्ञा क्षिरसागर यांच्याशी संर्पक साधण्याचे आव्हान प्रा.डॉ विजय पांडे यांनी केले आहे.

# तुटवड्याच्या काळातही जय पोहरादेवी गॅस एजन्सीची उल्लेखणीय सेवा

## नागरिकांकडून समाधान व्यक्त

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

सध्या गॅस सिलिंडर पुरवठ्यात विविध कारणांमुळे तुटवडा निर्माण झाला असतानाही, मानोरा येथील जय पोहरादेवी इंडेन गॅस एजन्सीने ग्राहकांना अखंड आणि दर्जेदार सेवा देत एक आदर्श निर्माण केला आहे. या कठीण परिस्थितीतही एजन्सीने संयम, नियोजन आणि जबाबदारीची जाणीव ठेवत नागरिकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून देशातील विविध भागांत गॅस वितरणात अडचणी येत असून, त्याचा परिणाम ग्रामीण भागात अधिक जाणवत आहे. अशा परिस्थितीत अनेक ठिकाणी ग्राहकांना गॅस मिळवण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. मात्र, मानोरा येथील या एजन्सीने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वितरणाची कार्यपद्धती अधिक सुटसुटीत व प्रभावी केली आहे.



एजन्सीमार्फत ग्राहकांना वेळेवर गॅस सिलिंडर मिळावा यासाठी बुकिंग प्रक्रिया व्यवस्थित राबवली जात आहे. तसेच, उपलब्ध साठ्याचे योग्य नियोजन करून गरजूंना प्राधान्याने गॅस वितरित केला जात आहे. वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखत, कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार होऊ नये यासाठीही खबरदारी घेतली जात आहे.

याशिवाय, एजन्सीचे कर्मचारी ग्राहकांशी नम्रपणे वागत असून, त्यांना आवश्यक ती माहिती देण्यावर भर देत आहेत. फोनद्वारे तसेच प्रत्यक्ष भेटीत ग्राहकांच्या शंकांचे समाधान करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत नाही आणि त्यांचा वेळही वाचत आहे. स्थानिक नागरिकांनी एजन्सीच्या कामकाजाचे कौतुक करत समाधान व्यक्त केले आहे. 'सध्याच्या तुटवड्याच्या परिस्थितीतही आम्हाला वेळेवर गॅस मिळतो आहे. एजन्सीचे कर्मचारी सहकार्यशील आहेत,' अशी प्रतिक्रिया अनेक ग्राहकांनी दिली.

या कार्यामुळे जय पोहरादेवी इंडेन गॅस, मानोरा एजन्सीने सेवा, विश्वास आणि सामाजिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. भविष्यातही अशाच प्रकारे ग्राहकाभिमुख सेवा देत राहण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ११५ ■ सोमवार, २३ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# विदर्भाचा दानशूर हात थांबला... दत्ता मेघे काळाच्या पडद्याआड

**नागपूर :** विदर्भाच्या राजकारणात, शिक्षण क्षेत्रात आणि समाजसेवेत आपली वेगळी ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ नेते दत्ता राघोबाजी मेघे यांचे रविवारी (२२ मार्च) नागपूर येथे दुःखद निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने संपूर्ण विदर्भ शोकसागरात बुडाला असून, राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

वर्धा जिल्ह्यातील पवनार या छोट्याशा गावातून सुरू झालेला मेघे यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी ठरला. साध्या कुटुंबातून पुढे येत त्यांनी आपल्या कष्ट, चिकाटी आणि लोकांशी असलेल्या नात्यामुळे मोठे स्थान मिळवले. त्यांच्या मृदू स्वभावामुळे आणि समजूतदार नेतृत्वामुळे ते सर्वपक्षीय नेत्यांमध्ये आदराचे स्थान मिळवू शकले.

राजकीय कारकिर्दीत त्यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच भाजपमध्ये काम करत चार वेळा लोकसभा खासदार म्हणून नागपूर, रामटेक आणि वर्धा मतदारसंघांचे प्रतिनिधित्व केले. तसेच राज्यसभा सदस्य आणि विधानपरिषद सदस्य म्हणूनही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. १९७८ मध्ये पुलोद सरकारमध्ये मंत्री म्हणून त्यांनी विदर्भाच्या विकासासाठी अनेक निर्णय घेतले.

राजकारणाबरोबरच शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात त्यांनी उभारलेले कार्य आजही हजारो कुटुंबांना आधार देत आहे. दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, नागर युवक शिक्षण संस्था अशा माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागात उच्च शिक्षण आणि वैद्यकीय सुविधा पोहोचवल्या. त्यांच्या या कार्यामुळे अनेक गरीब विद्यार्थ्यांना डॉक्टर, अभियंते होण्याची संधी मिळाली. मेघे हे विदर्भ राज्याच्या मागणीचे ठाम पुरस्कर्ते होते. त्यांनी नेहमीच विदर्भाच्या विकासाचा मुद्दा प्रखरपणे मांडला. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्ते घडले आणि त्यांना राजकारणात दिशा मिळाली.त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव इतका होता की, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. राजकारणाच्या पलीकडे जाऊन जपलेली ही मैत्री त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचीच साक्ष देणारी होती. त्यांच्या निधनाची बातमी समजताच विदर्भातील जनतेसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हळहळ व्यक्त केली. पुत्र सागर मेघे, समीर मेघे, यांच्यासह कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

दत्ता मेघे हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते समाजाचा विचार करणारे, शिक्षणाचा दीप लावणारे आणि सामान्य माणसाच्या आशा-अपेक्षांना दिशा देणारे नेते होते. त्यांच्या जाण्याने विदर्भाने केवळ नेता नव्हे, तर एक दानशूर आधारवड गमावला आहे.



**पाडवा पाटला पहाटे दत्ता मेघे वर्धा उपस्थिती ठरली शेवटची**

गुढीपाडव्याच्या दिवशी, १९ मार्च रोजी वर्ध्यातील 'पाडवा पहाट' कार्यक्रमात त्यांनी पहाटे ५ वाजता हजेरी लावली होती. गेल्या १८ वर्षांपासून या कार्यक्रमाचे ते आश्रयदाते होते. पहाटेची वेळ असो किंवा आरोग्याची अडचण त्यांच्या उपस्थितीत कधीही खंड पडला नाही. त्यामुळे 'दत्ता मेघे आले म्हणजे कार्यक्रमाला घरचा मोठा माणूस लाभला,' अशी भावना प्रत्येक वर्धेकराच्या मनात होती.

वर्ध्यातील धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना त्यांनी नेहमीच सढळ हाताने मदत केली. श्रीराम मंदिर व शोभायात्रा समितीच्या उपक्रमांना त्यांनी दिलेला हातभार हा केवळ आर्थिक नव्हता, तर भावनिकही होता. त्यांच्या पाठबळामुळे अनेक उपक्रमांना नवी ऊर्जा मिळाली.

गेल्या जून महिन्यात त्यांनी पवनार येथील स्वतः शिकलेल्या प्राथमिक शाळेला भेट दिली होती. शाळेची दुरवस्था पाहून ते व्यथित झाले. तातडीने आर्थिक मदत जाहीर करत मी जिवंत असेपर्यंत या शाळेची जबाबदारी माझी, असे त्यांनी ठामपणे सांगितले होते. त्या शब्दांतून त्यांच्या मनातील सामाजिक बांधिलकीची जाणीव स्पष्ट होत होती.आलेल्याचे अश्रू पुसणारा नेता ही त्यांची खरी ओळख होती. शेकडो गरीब कुटुंबांना त्यांनी आधार दिला. मुलींच्या विवाहासाठी आर्थिक मदत, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी हातभार अशा असंख्य उदाहरणांतून त्यांनी 'सेवा' हेच आपले ध्येय ठेवले. स्वतःच्या वैद्यकीय महाविद्यालयात अनेक विद्यार्थ्यांचे एमबीबीएसपर्यंतचे शुल्क माफ करून त्यांनी शिक्षणाला नवी दिशा दिली.

निस्सीम गणेश भक्त असलेल्या मेघे यांनी आपल्या संस्थांमध्ये गणेशोत्सवाची परंपरा सुरू केली. आज तो उत्सव संपूर्ण वर्धेकरांचा झाला आहे. या उत्सवात त्यांनी मोठ्या चित्रपट कलाकारांना आणून शहरात वेगळीच सांस्कृतिक चैतन्य निर्माण केली. गणेश विसर्जन मिरवणुकीत कलाकारांसह त्यांची उपस्थिती हा लोकांसाठी उत्सवाचा अविभाज्य भाग होता.

राजकारणातील सर्व पदे त्यांनी भूषवली, मात्र राज्यपाल होण्याची त्यांची इच्छा अपूर्णच राहिली. मी तिरंग्यातच जाईन, असे ते नेहमी म्हणत. आज त्यांच्या जाण्याने त्या शब्दांची वेदनादायक आठवण प्रत्येकाच्या मनात दाटून आली आहे. दत्ता मेघे यांच्या निधनाने विदर्भाने केवळ एक नेता गमावलेला नाही, तर माणुसकीचा, आधाराचा आणि विश्वासाचा एक भक्कम स्तंभ गमावला आहे. त्यांच्या आठवणी आणि कार्य हेच आता समाजासाठी प्रेरणास्थान ठरणार आहेत.

# १५ वर्षांनंतर रेशनवर रॉकेल'चा नवा निर्णय; पण घराघरात स्टोव्ह आहेत कुठे!

## -सरकारचा दिलासा की केवळ कागदी घोषणा? नागरिकांचा प्रश्न, प्रशासनाची मोठी कसोटी




**सेलू । जनमाध्यम :** जवळपास दीड दशकापासून बाजारातून गायब झालेले रॉकेल पुन्हा एकदा सर्वसामान्यांच्या आयुष्यात परतण्याच्या मार्गावर आहे. राज्य शासनाने बदलत्या परिस्थितीचा विचार करून सार्वजनिक वितरण प्रणाली (इअए) अंतर्गत स्वयंपाक व दिवाबत्तीसाठी रॉकेलचे तात्पुरते वितरण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर सूचना देण्यात आल्या असून प्रशासन यंत्रणा पुन्हा सज्ज करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

केंद्र शासनाने १२ मार्च रोजी घेतलेल्या निर्णयानुसार, इंधन टंचाईसारख्या संभाव्य संकटांचा सामना करण्यासाठी हा उपाययोजना म्हणून रॉकेल पुरवठा सुरू करण्याचे संकेत देण्यात आले. त्यानुसार राज्यभरात केरोसीन वितरणाची यंत्रणा पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

मात्र, या निर्णयामागे जितका दिलासा आहे, तितकाच गोंधळ आणि प्रश्नचिन्हांचाही भडका उडालेला दिसतो. कारण गेल्या काही वर्षांत रॉकेलचा पुरवठा पूर्णपणे बंद झाल्याने अनेकांनी आपले स्टोव्ह भंगारात विकून टाकले आहेत. आता रॉकेल मिळणार म्हणता, पण वापरायचं कसं असा प्रश्न नागरिक प्रशासनाला विचारत आहेत.

गॅस सिलिंडरच्या वाढत्या किमती, ग्रामीण भागातील आर्थिक मर्यादा आणि शहरातील महागाईच्या झळांमुळे आजही अनेक कुटुंबे पर्यायी इंधनाच्या शोधात आहेत. अशा वेळी रॉकेलचा पुरवठा पुन्हा सुरू होणार असल्याची बातमी काहींसाठी आशेचा किरण ठरत असली, तरी किती मिळणार आणि नियमित मिळणार का याबाबत स्पष्टता नसल्याने नागरिक साशंक आहेत.

पूर्वीप्रमाणे रेशन दुकानांबाहेर रांगा, हातात कॅन घेऊन उभे असलेले ग्राहक आणि आज मिळेल का या अनिश्चिततेचे चित्र पुन्हा दिसणार का, अशी भीतीही व्यक्त होत आहे. अनेक नागरिकांचे मत स्पष्ट आहे, पुरवठा नियमित आणि पारदर्शक असेल, तरच या निर्णयाचा फायदा होईल; अन्यथा ही केवळ घोषणा ठरेल.

तज्ज्ञांचेही मत याच दिशेने आहे. ते सांगतात की, केवळ धोरण जाहीर करून उपयोग नाही; त्याची अंमलबजावणी काटेकोर, पारदर्शक आणि सातत्यपूर्ण असणे आवश्यक आहे. अन्यथा रॉकेल वितरणाची ही योजना पुन्हा एकदा कागदावरच अडकण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दरम्यान, शासनाने या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे संकेत दिले आहेत. लवकरच पुरवठा सुरळीत होईल, असा दावा प्रशासनाकडून केला जात असला, तरी जनतेचा विश्वास प्रत्यक्ष कृतीवरच अवलंबून राहणार आहे.आता खरा प्रश्न एकच रॉकेल खरोखरच घराघरात पोहोचणार का, की पुन्हा एकदा आश्वासनांचीच धूळफेक होणार.

# 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' पण वर्ध्यात 'डांबरातच' भ्रष्टाचार : पीएम दौऱ्याच्या कामांवर गंभीर प्रश्नचिन्ह

## -पंतप्रधानांच्या नावाखाली : रस्त्यांत १५ एमएमचा थर -कोट्यावधीचा व्यवहार, चौकशी अहवाल बुधवारी -कारवाईची टांगती तलवार

**वर्धा । जनमाध्यम :** 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' असा भ्रष्टाचाराविरोधातील कडक संदेश देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या विकासकामांवरच आता संशयाचे गडद सावट दाटले आहे. वर्ध्यातील स्वावलंबी विद्यालयाच्या मैदानावर करण्यात आलेल्या रस्ते व पायाभूत सुविधांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे आरोप पुढे येत असून, यामुळे प्रशासनाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

पंतप्रधानांच्या हस्ते 'पी.एम. विश्वकर्मा' योजनेच्या उद्घाटनासाठी या परिसरात मोठ्या प्रमाणात कामे हाती घेण्यात आली होती. हेलिपॅड, अंतर्गत रस्ते, मैदानाची मजबुतीकरण यासाठी कोट्यवधींचा निधी खर्च करण्यात आला. मात्र, या कामांची गुणवत्ता पाहता 'विकास' पेक्षा 'भ्रष्टाचार'च जास्त झाल्याची चर्चा आता नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

तक्रारीनुसार, रस्त्यांच्या कामात वापरण्यात आलेल्या बिटुमेन कार्पेटचा (डांबराचा थर) जाडी केवळ १५ एमएम ठेवण्यात आल्याचा आरोप आहे. नियमानुसार अपेक्षित जाडीपेक्षा हा थर अत्यंत कमी असल्याने रस्त्यांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे स्पष्ट होत आहे. याशिवाय, जीएसबी (ग्रॅन्युलर सब बेस) ची जाडी फक्त १० सेंटीमीटर ठेवण्यात आली, तर बीएम (बिटुमिनस मॅकॅडम) चे काम पूर्ण न करताच बिलांची उचल करण्यात आल्याचेही गंभीर आरोप समोर आले आहेत.



या संपूर्ण कामाचा ठेका हिंगणघाट येथील एका कंत्राटदाराला देण्यात आला होता. मात्र, पुढे हे काम सहकंत्राटदारांमार्फत पूर्ण करण्यात आले. या प्रक्रियेत पारदर्शकतेचा पूर्ण अभाव असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, संबंधित कनिष्ठ अभियंते व कंत्राटदार यांच्यात संगनमत झाल्याचा संशय व्यक्त होत असून, 'नियमांना हरताळ फासून' आर्थिक लाभ उचलण्यात आला का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता सार्वजनिक बांधकाम विभागाने त्रि-सदस्यीय चौकशी समिती गठीत केली आहे. या समितीने प्रत्यक्ष स्थळी जाऊन कामांची तपासणी केली असून, सखोल अहवाल लवकरच सादर होणार आहे. या अहवालातून अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, वर्ध्यातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मोदी साहेब, तुम्ही भ्रष्टाचाराला आळा घालण्याची भाषा करता, पण तुमच्याच नावाने होणाऱ्या कामांत असा प्रकार कसा? असा प्रश्न जनतेकडून विचारला जात आहे. या प्रकरणामुळे केवळ स्थानिक प्रशासनच नव्हे, तर संपूर्ण यंत्रणाच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

जर या आरोपांमध्ये तथ्य आढळले, तर हा प्रकार केवळ आर्थिक गैरव्यवहार ठरणार नाही, तर जनतेच्या विश्वासाचा घात ठरेल. विकासाच्या नावाखाली जर दर्जाहीन कामे करून निधी लाटला जात असेल, तर ही अत्यंत गंभीर बाब आहे.

आता सर्वांच्या नजरा चौकशी अहवालावर खिळल्या आहेत. दोषींवर कठोर कारवाई होणार की प्रकरण दडपले जाणार, हा खरा प्रश्न आहे. कारण रस्त्यांवरील खड्डे बुजवणे सोपे असते, पण भ्रष्टाचाराचे खड्डे बुजवण्यासाठी प्रशासनाची खरी इच्छाशक्ती लागते आणि ती दाखवण्याची वेळ आता आली आहे.

## दातृत्वाचा धनी हरपला!

# दत्ता मेघे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली

**मुंबई :** ज्येष्ठ नेते, माजी मंत्री दत्ताभाऊ मेघे यांच्या निधनाने दातृत्वाचा धनी हरपला आहे. शिक्षण संस्थांचे जाळे आणि प्रचंड मोठे सामाजिक कार्य उभे करताना त्यांच्या संपूर्ण राजकारणात सामान्य माणूस हा कायम केंद्रस्थानी असायचा, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

आपल्या शोकसंदेशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, दत्ता मेघे यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक जीवनात कायमच सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवूनच आयुष्यभर ते कार्यरत राहिले. त्यामुळेच एक लोकनेता अशी त्यांची प्रतिमा होती. विविध शैक्षणिक संस्था उभारून त्यांनी विदर्भातील तरुणांच्या शिक्षणाची सोय तर केलीच आणि या संस्थाही नावारूपाला आणल्या. ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे एक मोठा आधार ज्येष्ठांना मिळाला. एक आदर्श राजकारणी म्हणून त्यांची ख्याती होती. वर्धा, नागपूर-विदर्भातील विकासाच्या राजकारणात त्यांनी कधीही पक्षीय भेद आणला नाही. सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यात सुद्धा त्यांचा सदैव पुढाकार असायचा. नव्या पिढीचे मार्गदर्शक म्हणून त्यांनी भूमिका बजावली. म्हणूनच सर्वच राजकीय पक्षात त्यांचे चाहते आहेत, हेच त्यांच्या यशाचे गमक. माझे त्यांच्याशी कौटुंबिक संबंध होते. अनेक प्रश्नांवर वडिलकीच्या नात्याने ते मार्गदर्शन करायचे. त्यांच्या निधनाने माझी वैयक्तिक हानी झाली आहे. दत्ताभाऊंना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

# ज्येष्ठ नेते दत्ताजी मेघे यांच्या निधनाने विदर्भाच्या शैक्षणिक, सामाजिक क्षेत्राची मोठी हानी -उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**मुंबई -** ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आणि माजी खासदार दत्ताजी मेघे यांच्या निधनामुळे विदर्भाच्या शैक्षणिक, सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत दत्ताजी मेघे यांना श्रद्धांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, 'दत्ताजी मेघे यांनी विदर्भाच्या विकासासाठी, विशेषतः शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रात दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांनी उभ्या केलेल्या शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून हजारो ग्रामीण विद्यार्थ्यांना ज्ञानाची दारे खुली झाली. एक अनुभवी संसदपटू आणि संवेदनशील समाजसेवक म्हणून त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील.त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक दिग्गज नेता गमावला आहे. त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दत्ताजी मेघे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# कंत्राटदारीत 'कमीशनराज'चा आरोप वर्ध्यात आंदोलनाचा इशारा

## -मजूर सहकारी संस्थांच्या कामांवर प्रश्नचिन्ह; कंत्राटदार समितीचा ठिय्या आंदोलनाचा निर्णय

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील कंत्राटदारी व्यवस्थेत मजूर सहकारी संस्थांच्या नावाखाली 'कमीशनराज' सुरू असल्याचा गंभीर आरोप करत वर्धा जिल्हा कंत्राटदार समितीने आंदोलनाचा इशारा दिला आहे. मजूर सहकारी संस्थांना आरक्षित करण्यात आलेली कामे तात्काळ रद्द करून ती खुल्या निविदांद्वारे किंवा सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना देण्यात यावी, अशी मागणी समितीने केली आहे.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप समितीने केला आहे. उलट, अलीकडे १५ ते २० कामे पुन्हा आरक्षित करण्यात आल्याने कंत्राटदारांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.समितीच्या मते, जिल्ह्यातील काही मजूर सहकारी संस्था प्रत्यक्ष मजुरांना रोजगार न देता केवळ 'कमीशन'वर आधारित व्यवहार करत आहेत. शासनाच्या ११ नोव्हेंबर २०२० च्या परिपत्रकानुसार अशा संस्थांना कुशल स्वरूपाची कामे देऊ नयेत, अशी स्पष्ट तरतूद असतानाही नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जिल्ह्यात सुमारे २४ ते २८ मजूर सहकारी संस्था नोंदणीकृत असून, नियमानुसार एका संस्थेला एका आर्थिक वर्षात ३ कोटी रुपयांपर्यंत अकुशल कामे देण्याची मर्यादा आहे. मात्र प्रत्यक्षात विविध विभागांमध्ये सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद, पाटबंधारे, कृषी व वन विभाग मोठ्या प्रमाणावर कामांचे वाटप होत असल्याचे समितीचे म्हणणे आहे. एकीकडे कंत्राटदारांना वर्षभर काम करूनही योग्य मोबदला मिळत नाही, तर दुसरीकडे काही संस्थांचे अध्यक्ष मोठ्या प्रमाणात नफा कमावत आहेत, असा आरोप करत समितीने या संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी केली आहे. याशिवाय, थकीत देयके ३१ मार्चपूर्वी अदा करावीत, सर्व मजूर सहकारी संस्थांचे ऑडिट करण्यात यावे, तसेच कुशल व अकुशल कामांचे पारदर्शक वाटप करावे, या मागण्या समितीने मांडल्या आहेत. दरम्यान, या मागण्यांकडे प्रशासनाने तत्काळ लक्ष न दिल्यास २३ मार्च रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# भिडीतील छोट्या व्यावसायिकांचा आक्रोश ऐकून खा.काळे यांनी समन्वयातून मार्ग काढण्याचे दिले निर्देश

**अतिक्रमणाच्या नावाखाली होणाऱ्या त्रासावर तोडगा; वीज मीटरही पूर्ववत करण्याचे आदेश**

**देवळी । भिडी जनमाध्यम :** महागाईच्या झळा सहन करत कुटुंबाचा गाडा कसाबसा ओढणाऱ्या भिडी येथील छोट्या व्यावसायिकांना अखेर दिलासा मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. खासदार अमर काळे यांनी त्यांच्या समस्या ऐकून तत्काळ प्रशासनाला समन्वयातून मार्ग काढण्याचे निर्देश दिले.

दि. २१ मार्च २०२६ रोजी देवळी येथील रेल्वे स्टेशनवरील आरक्षण खिडकीच्या उद्घाटनासाठी आले असता भिडीतील अल्प उत्पन्न गटातील व्यावसायिकांनी खासदारांची भेट घेतली. रस्त्यालगत कोणतीही वाहतूक अडथळा न आणता व्यवसाय करणाऱ्या या दुकानदारांवर अतिक्रमणाच्या नावाखाली कारवाईचा धाक दाखवला जात असल्याने ते त्रस्त झाले होते. या व्यावसायिकांनी सरपंच सचिन बिरे यांच्या नेतृत्वाखाली आपल्या अडचणी मांडल्या. अल्प उत्पन्नातून संसार, मुलांचे शिक्षण, आरोग्य खर्च आणि वाढती महागाई या सगळ्यांचा ताण सहन करत असताना प्रशासनाकडून होणारा त्रास असह्य झाला आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.



खासदार अमर काळे यांनी याची गांभीर्याने दखल घेत प्रकल्प संचालकांशी तातडीने चर्चा केली. वाहतुकीला कोणताही अडथळा होणार नाही आणि या बेरोजगारांचा व्यवसायही हिरावला जाणार नाही, अशा समन्वयातून मार्ग काढा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

याशिवाय, यापूर्वी बंद करण्यात आलेले वीज मीटर पुन्हा सुरू करण्याबाबतही त्यांनी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना आदेश दिले. त्यामुळे व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या हस्तक्षेपामुळे व्यापाऱ्यांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली असून त्यांनी खासदारांचे आभार मानले. यावेळी अजय डोंगरे यांच्यासह अनेक व्यावसायिक उपस्थित होते.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# तृणमूलची परीक्षा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच पश्चिम बंगालमधील पायाभूत सुविधांसाठी १८,६८० कोटींच्या प्रकल्पाची पायाभरणी केली. भाषणात त्यांनी ममतांच्या कारभाराचे वाभाडे काढले आणि पश्चिम बंगालमध्ये हिंदूंची संख्या इतरांच्या तुलनेत घटत चालल्याचा गंभीर इशाराही दिला. मोदी यांनी निवडणुकीचे रणशिंगच फुंकले आहे. त्यातून भाजपचा प्रचार अतिशय आक्रमक होईल, याचे संकेत मिळत आहेत.पश्चिम बंगाल हे संवेदनशील राज्य म्हटले जाते. बंगाली भाषिकांच्या प्रतिक्रिया तीव्र असतात. त्यामुळे बंगाली अस्मिता आणि राष्ट्रीय विचारधारा यांच्यातील संघर्ष या निवडणुकीत दिसून येण्याची शक्यता आहे. काहीही करून ममतांना राज्य टिकवणे आवश्यक आहे. ते हातून गेले, तर त्यांच्या कारकिर्दीची उलट गणती सुरू होण्याचा धोका आहे. देशातील प्रादेशिक पक्षांच्या दृष्टीनेही या निवडणुकीचे महत्त्व आहे. त्यामुळे ही निवडणूक अनेक मुद्द्यांवर निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.प्रसारमाध्यमांत सर्वात गाजणाऱ्या आणि गरजणाऱ्या विरोधी गोटातल्या प्रमुख नेत्या म्हणजे ममता बॅनर्जी. गेल्या सलग तीन विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमताने पश्चिम बंगालची सत्ता अबाधित राखून त्यांनी आपल्या तृणमूल काँग्रेस या पक्षाची राज्यावर घट्ट पकड ठेवली आहे. गेल्या निवडणुकीत 'खेला होबे' (खेळ होईल) अशी घोषणा देत त्यांनी विजयाची हॅट्ट्रिक साधली होती. आता पश्चिम बंगाल विधानसभेची २३ एप्रिलला निवडणूक होत असून ममता बॅनर्जी आपला मार्ग निष्कंटक राखणार की भारतीय जनता पक्ष त्यांना आव्हान देणार, याचे उत्तर या निवडणुकीच्या निकालाने स्पष्ट होणार आहे. १९७० च्या दशकापर्यंत काँग्रेस आणि नंतर तीन दशके मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाची राजवट असलेल्या पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवाद्यांना जबरदस्त आव्हान दिले ते ममता बॅनर्जींनी. काँग्रेसमधून बाहेर पडून त्यांनी तृणमूल काँग्रेसची स्थापना केली. २००१ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला २८ जागा मिळाल्या होत्या, तर ममतांनी ६० जागा जिंकून आपले अस्तित्व निर्माण केले होते. त्यानंतर त्यांची घोडदौड वेगाने सुरू झाली आणि दहा वर्षांतच म्हणजे २०११ च्या निवडणुकीत २९४ पैकी १८४ जागा जिंकत ममतांनी निर्विवाद सत्ता मिळविली. तेव्हा भाजपला खाते उघडता आले नव्हते. २०१६ च्या निवडणुकीत ममतांनी २११ जागा जिंकून दोन तृतीयांश हुकमी बहुमत मिळवले, तेव्हा भाजपने तीन जागा जिंकत आपले अस्तित्व निर्माण केले. २०२१ ची विधानसभा निवडणूक ममता आणि भाजप यांच्यातच झाली. २१४ जागा जिंकून ममतांनी पकड भक्कम केली, तर तीन जागांवरून ७७ जागांवर झेप घेत भाजपने प्रभाव निर्माण केला आणि एकेकाळी प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेस आणि मार्क्सवादी पक्षांना भोपळाही फोडता आला नाही. या दोन प्रमुख पक्षांचे अस्तित्व जणू नाहीसेच झाले. २०२१ च्या निवडणुकीत ममतांच्या तृणमूल काँग्रेसला ४८.२ टक्के मते मिळाली; पण भाजपनेही ३७.९७ टक्के मते खेचत ममतांपुढे आव्हान उभे केले. आता या निवडणुकीत भाजप आपली मते किती वाढविणार, किती जागा जिंकणार यावर सत्तापालट होणार का, याचे उत्तर मिळेल. लोकसभा निवडणुकीत भाजपचे १८ खासदार निवडून आले, हेही लक्षात घेतले पाहिजे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जबरदस्त करिश्मा अबाधित आहे. केंद्रासह अनेक राज्यांतील सत्ता, दिग्गज नेत्यांची मांदियाळी, जबरदस्त संघटना हे भाजपचे प्लस पॉईंट आहेत आणि पश्चिम बंगालमध्ये भाजपचे जाळे सर्वदूर तळागाळात पसरलेले आहे. प्रत्येक बूथवर भाजप कार्यकर्त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे आणि निवडणुकीसाठी जय्यत तयारी केली आहे.ममता बॅनर्जी या लोकप्रिय नेत्या आहेत आणि सदैव आक्रमक राहत आपण बंगालची अस्मिता आहोत, हा दावा त्यांनी सातत्याने अधोरेखित केला आहे. केंद्र सरकारच्या पश्चिम बंगालविषयक कोणत्याही निर्णयाला रस्त्यावर उतरून आव्हान देण्याची त्यांची स्टाईल आहे आणि सर्वसामान्य जनतेला त्याचे आकर्षण वाटत आले आहे. तृणमूलसाठी आयपॅक ही संस्था निवडणुकीच्या रणनीतीचे काम करते. या संस्थेवर हवालामार्फत पैसा पुरवला गेल्याच्या आरोपावरून ८ जानेवारीला ईडीने छापा घातला. लॅपटॉप, हार्डवेअर, फोल्डर आदी साहित्य जप्त केले तेव्हा ममता बॅनर्जी थेट घटनास्थळी गेल्या आणि त्यांनी ईडीने जप्त केलेले सारे साहित्य आपल्या ताब्यात घेतले. ईडीविरोधात पोलिसांत फिर्याद दिली. निवडणुकीच्या तोंडावर हे प्रकरण गाजत आहे. त्याचा कोणाला किती लाभ होणार, हे निकालातून स्पष्ट होईल.

# पाच राज्यांच्या नेतृत्वाची कसोटी

**तामिळनाडू, केरळ, पश्चिम बंगाल, आसाम आणि पुद्दुचेरीमध्ये विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सध्या शिगेला पोहोचत आहे. या पाचही क्षेत्रांतील निवडणूक निकाल राज्य सरकारांच्या कामकाजाबाबत, कार्य पद्धतीबाबत, धोरणांबाबत जनतेचा कल स्पष्ट करतील. सामान्यतः प्रत्येक सरकारला काही प्रमाणात सत्ताविरोधी लाटेचा सामना करावा लागतो; परंतु ज्या सरकारांचा कार्यकाळ दीर्घ असतो, तिथे हा धोका अधिक असतो.**



भारतीय निवडणूक आयोगाने चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकांच्या तारखा नुकत्याच जाहीर केल्या असल्या, तरी या राज्यांमधील राजकीय रणधुमाळी ही जवळपास वर्षभरापूर्वीपासून सुरू झालेली आहे. सद्यस्थितीतील देशाचे राजकीय चित्र पाहता ही पाचही क्षेत्रे अत्यंत महत्त्वाची ठरत आहेत. आसाम, केरळ आणि पुद्दुचेरीमध्ये ९ एप्रिल रोजीच मतदान होणार असल्याने आता प्रचारासाठी फारसा वेळ उरलेला नाही. पश्चिम बंगालमध्ये यावेळेस केवळ दोन टप्प्यांत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. गेल्या दोन दशकांतील ही पहिलीच वेळ आहे, जेव्हा बंगालमध्ये इतक्या कमी टप्प्यांत निवडणूक होत आहे. विशेष म्हणजे, २०२१ च्या निवडणुकीत येथे आठ टप्प्यांत मतदान झाले होते. पूर्वीच्या तुलनेत आता प्रचाराचा कालावधी कमी झाला असला, तरी आचारसंहितेमुळे सरकारी कामे ठप्प होण्याचा काळही कमी झाला आहे, ही एक जमेची बाजू मानली पाहिजे.

### पाच राज्यांचे वैशिष्ट्य

या पाच राज्यांतील एकूण ८२४ जागांसाठी १७.४ कोटी मतदार आपला कौल देतील. ही मतदारसंख्या जर्मनी, कॅनडा, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशांच्या एकूण लोकसंख्येच्या बरोबरीची आहे. देशाच्या लोकसंख्येचा विचार केल्यास १७ ते १८ टक्के लोकसंख्या असणारी ही राज्ये आहेत. या पाच राज्यांतून लोकसभेसाठी ५४३ जागांपैकी सुमारे २१ टक्के म्हणजेच ११६ खासदार निवडले जातात. तसेच या राज्यांमधील आमदार मिळून राज्यसभेसाठी ५१ सदस्य पाठवतात. त्यामुळे या निवडणुका जिंकणाऱ्या पक्षांचा संसदेतील प्रभावही वाढणार आहे. एसआयआर प्रक्रियेनंतर या निवडणुका होणार असल्याने त्यांना एक वेगळे महत्त्व आहे. पश्चिम बंगालमध्ये या पुनरीक्षणावरून मोठा गदारोळ झाला होता, तर आसाममध्येही विशेष पुनरीक्षणावरून वाद निर्माण झाले होते.

### वर्तमान स्थिती

या पाच राज्यांमधील वर्तमान स्थिती पाहता तामिळनाडूमध्ये एकूण २३४ विधानसभा जागा आहेत, जिथे एम. के. स्टालिन ७ मे २०२१ पासून मुख्यमंत्री आहेत. पश्चिम बंगालमध्ये २९४ जागा असून ममता बॅनर्जी २०११ पासून सत्तेत आहेत. केरळमध्ये १४० जागा असून पिनराई विजयन २०१६ पासून मुख्यमंत्री पदावर आहेत. आसाममध्ये १२६ जागा असून हिमंत विश्व शर्मा २०२१ पासून मुख्यमंत्री आहेत. पुद्दुचेरीमध्ये एकूण ३३ जागा असून यामध्ये केंद्र नियुक्त ३ सदस्यांचा समावेश आहे. येथे एन. रंगासामी २०२१ पासून सत्तेत आहेत.

### रणधुमाळातील रेवड्या

अलीकडील काळात निवडणूक निकालांचे कल हे जाहीरनाम्यातील आश्वासनांनुरूप बदलतात, हे गेल्या काही वर्षांत झालेल्या निवडणुकांनी दाखवून दिले आहे. त्यामुळे निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होण्याच्या आधीच या राज्यांमध्ये मतदारांना आकृष्ट करण्यासाठी आश्वासनांचा वर्षाव करण्यात आला. तामिळनाडू सरकारने निवडणुकीच्या घोषणेपूर्वी हॉटेल आणि क्लाऊड किचनसाठी वीज दरात २ रुपये प्रतियुनिट सवलत जाहीर केली आहे. दुसरीकडे पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी आचारसंहिता लागू होण्यापूर्वी काही तास आधी हिंदू-मुस्लीम पुजारी आणि मुअज्जिन यांच्या मानधनात ५०० रुपयांची वाढ केली आहे. आता त्यांना दरमहा २,००० रुपये मानधन मिळणार आहे. आसाम आणि केरळमध्येही अशाच प्रकारच्या घोषणांचा पाऊस पडला आहे. राजकीय पक्ष मतदारांना खूश करण्याची एकही संधी सोडताना दिसत नाहीत. अशा घोषणांवर टीका होत असली, तरी सर्वसामान्यांना त्याचा थेट लाभ मिळतो, हेही नाकारता येणार नाही.

### पश्चिम बंगालमध्ये ममतादीदी 'चौकार' ठोकतील?

राजकीयदृष्ट्या यंदा पश्चिम बंगालची निवडणूक सर्वाधिक चर्चेत आहे. या राज्यांत तृणमूल काँग्रेसच्या सुप्रिमो ममता बॅनर्जी यांच्यासमोर सत्ता टिकवण्याचे मोठे आव्हान आहे. २०२१ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये तृणमूल काँग्रेसने २१५ जागा जिंकल्या होत्या; पण भाजपला पहिल्यांदाच या राज्यांत ७७ जागांपर्यंत मुसंडी मारण्यात यश आले होते. तथापि, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला पश्चिम बंगालमध्ये केवळ १८ जागा मिळाल्या. टीएमसीने २९४ पैकी २९१ जागांवर आपले उमेदवार जाहीर केले असून उर्वरित ३ जागा मित्रपक्षांसाठी सोडल्या आहेत. ममतादीदी पुन्हा निवडून आल्या, तर सलग चार वेळा मुख्यमंत्री होण्याचा विक्रम त्यांच्या नावावर होईल. भाजपाने महाराष्ट्र, हरियाणा, बिहार आदी राज्यांप्रमाणेच पश्चिम बंगालमध्येही 'डबल इंजिन' सरकारचा नारा केंद्रस्थानी ठेवला आहे. जिथे डबल इंजिन नाही, तिथे पंतप्रधान मोदींच्या योजना लोकांपर्यंत पोहोचू शकत नाहीत, असा प्रचार पक्षाकडून केला जात आहे. याखेरीज भाजपने बंगालमध्ये भ्रष्टाचाराचे मुद्दे आणि 'घुसखोरी' या विषयावरून रान उठवले आहे. विशेष सखोल पुनरीक्षणानंतर (एसआयआर) मतदार याद्यांमधून लाखो नावे वगळली गेल्याने तिथे मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे. पश्चिम बंगालच्या एकंदर राजकारण, समाजकारणावर ममतादीदींनी मिळवलेली पकड पाहता भाजपला सत्तांतर घडवून आणणे बरेच कठीण आहे; पण मागील वेळेपेक्षा १० टक्के जागांमध्ये वाढ झाली, तरी तो दीदींसाठी नामुष्कीजनक ठरेल.

मोठी अल्पसंख्याक मतपेढी ही तृणमूल काँग्रेसची ताकद आहे. म्हणूनच भाजप हिंदू मतदारांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न करत असते. या प्रयत्नांमुळे आणि संघाच्या सक्रियतेमुळे भाजपा तृणमूलसोबतचे अंतर किती कमी करू शकेल, यावर पश्चिम बंगालचा निकाल अवलंबून असेल. गेल्या वेळी एकत्र लढलेली काँग्रेस आणि डावी आघाडी यावेळी स्वतंत्रपणे निवडणूक मैदानात उतरणार आहेत. ते तृणमूलच्या अल्पसंख्याक मतपेढीत खिंडार पाडतात की, प्रस्थापितांविरोधी मतांचे विभाजन करून भाजपचे नुकसान करतात, हे पाहणे रंजक ठरणार आहे. ममता चौथ्यांदा जनादेश मिळवण्यात यशस्वी झाल्या, तर 'इंडिया' आघाडीच्या माध्यमातून राष्ट्रीय राजकारणातील त्यांची भूमिका दुर्लक्षित करणे काँग्रेससाठी कठीण होईल.

### तामिळनाडूत टीव्हीके गेमचेंजर ठरेल?

तामिळनाडूचे राजकारण प्रदीर्घ काळ द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांच्याभोवती फिरत राहिले; पण जयललिता यांच्या निधनानंतर तो समतोल बिघडला आहे. अण्णाद्रमुकचे एकत्रीकरण आणि त्यांच्याशी युती करून भाजप तिथे सत्तापालटाच्या शक्यता शोधत आहे; मात्र एम. के. स्टालिन सरकारच्या काळात सनातन धर्म आणि हिंदी भाषेवरून निर्माण झालेले वाद पाहता हे काम सोपे वाटत नाही; परंतु 'टीव्हीके' नावाचा पक्ष काढून चित्रपट अभिनेत्यातून राजकारणी बनलेले थलापती विजय जर मोठी शक्ती म्हणून उदयास आले, तर सर्व समीकरणे बदलू शकतात. राष्ट्रीय स्तरावर द्रमुक आणि काँग्रेस 'इंडिया' आघाडीत सामील आहेतच. तामिळनाडूमध्येही त्यांची जुनी युती आहे. द्रमुक आघाडी सत्ता टिकवण्यात यशस्वी झाली, तर राष्ट्रीय स्तरावर 'इंडिया' आघाडीचे मनोबल वाढेल. इतर प्रादेशिक नेत्यांप्रमाणे एम. के. स्टालिन यांनाही आपला मुलगा उदयनिधी यांचा राज्याभिषेक करायचा आहे; पण त्यांच्या राष्ट्रीय राजकीय महत्त्वाकांक्षांचे कोणतेही स्पष्ट संकेत मिळालेले नाहीत. तसे पाहता सनातन आणि हिंदी विरोधी प्रतिमेमुळे स्टालिन यांच्यासाठी राष्ट्रीय राजकारणाची वाट सोपी नसेल. 'इंडिया' आघाडीदेखील त्यांच्याशी संबंधित वादांपासून दूर राहणे पसंत करेल. 'टीव्हीके'च्या उपस्थितीमुळे बिगर द्रमुक पक्षांच्या सत्तेच्या शक्यता निर्माण झाल्या, तर ते दक्षिणेकडील राज्यात भाजपासाठी मोठी लॉटरी लागल्यासारखे असेल. तामिळनाडूमध्ये ५.६७ कोटी नोंदणीकृत मतदार असून त्यांचा कौल कुणाला मिळतो, याकडे देशाचे लक्ष लागून राहिले आहे.

### आसाममधील विजयाची हमी

आसाममधील विधानसभेचा कार्यकाळ २० मे २०२६ रोजी संपत आहे. भाजपने येथे १०० पेक्षा जास्त जागा जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. दुसरीकडे सत्तेत परतण्यासाठी काँग्रेसने ८ प्रादेशिक पक्षांसोबत 'महाजोत'सदृश युती केली आहे. घुसखोरी, नागरिकत्व (एनआरसी) आणि आसामी अस्मिता हे येथील प्रमुख मुद्दे आहेत. आसाममध्ये भाजपने महिला, विद्यार्थी आणि चहाच्या मळ्यातील कामगारांसाठी थेट रोख रक्कम देणाऱ्या योजनांच्या माध्यमातून मतदारांच्या मोठ्या वर्गाचा पाठिंबा मिळवण्यासाठी मोठा डाव खेळला आहे, तरीही अनेक स्थानिक प्रश्न आणि वादांवरून त्यांना विरोधकांच्या आव्हांनाचा सामना करावा लागू शकतो; पण पाच राज्यांपैकी भाजपसाठी विजयाची सर्वाधिक शक्यता आसाममध्ये आहे. दीर्घकाळापासून घुसखोरी आणि लोकसंख्याशास्त्रीय बदलांसारख्या मुद्द्यांनी वेढलेल्या आसाममध्ये सलग दुसऱ्यांदा भाजपचे सरकार आहे. माजी काँग्रेस नेते हिमंत बिस्वा सरमा यांनी ईशान्येकडील राज्यांमध्ये भाजपचा ज्या प्रकारे विस्तार केला, त्याचे बक्षीस म्हणून त्यांना गेल्या निवडणुकीनंतर आसामचे मुख्यमंत्रिपद देण्यात आले. भाजपचे लाडके हिमंत सध्या काँग्रेसच नव्हे, तर राहुल गांधींचेही प्रखर टीकाकार आहेत. माजी प्रदेशाध्यक्ष भुपेन बोरा यांना भाजपात सामील करून घेऊन हिमंत यांनी निवडणुकीपूर्वी काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे. आसामच्या राजकारणात आजही आघाड्या निर्णायक भूमिका बजावू शकतात. त्यामुळे भाजप आणि काँग्रेसपैकी कोण अधिक चांगल्या प्रकारे युती करू शकते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. राहुल गांधींचे निकटवर्तीय गौरव गोगोई यांच्या राजकीय भविष्याचा फैसलाही बराचसा याच निवडणुकांवर अवलंबून असेल.

### केरळमध्ये डाव्यांची निर्णायक लढाई

साक्षरतेबाबत देशात अग्रेसर राज्य असणाऱ्या केरळमधील १४० विधानसभा जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान होईल. केरळमध्ये दर पाच वर्षांनी सत्ता बदलण्याची परंपरा डाव्यांनी २०२१ मध्ये मोडली होती. यंदा मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या नेतृत्वाखालील डावी आघाडी तिसऱ्यांदा सत्तेत येऊन नवा विक्रम प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात आहे. दुसरीकडे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ १० वर्षांचा सत्तेचा वनवास संपवण्यासाठी पूर्ण जोर लावत आहे. भाजपही येथे आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करत असून अलीकडेच काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या मतदारसंघात भाजप आपला महापौर बसवण्यात यशस्वी झाल्याने पक्षाचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे डाव्या आघाडीसमोर (एलडीएफ) आपला शेवटचा बालेकिल्ला वाचवण्याचे आव्हान आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफही सत्तेत परतण्यासाठी जोर लावत आहे.

### पुद्दुचेरीत कोणाची 'आघाडी'?

केंद्रशासित पुद्दुचेरीचे राजकारण तामिळनाडूच्या धर्तीवर चालते. गेल्या वेळी समीकरणे बदलली. कारण, द्रमुकची मित्र असलेल्या काँग्रेसची कामगिरी अत्यंत सुमार राहिली. परिणामी, प्रादेशिक पक्ष एनआर काँग्रेस आणि भाजप मिळून सरकार स्थापन करण्यात यशस्वी झाले. यावेळी तिथे आघाडीच्या पटावर कोण कशी कामगिरी करेल, यावरच सत्तेचा निकाल अवलंबून असेल.

या पाचही क्षेत्रांतील निवडणूक निकाल राज्य सरकारांच्या कामकाजाबाबत, कार्यपद्धतीबाबत, धोरणांबाबत जनतेचा कल स्पष्ट करतील. सामान्यतः प्रत्येक सरकारला काही प्रमाणात सत्ताविरोधी लाटेचा सामना करावा लागतो; परंतु ज्या सरकारांचा कार्यकाळ दीर्घ असतो, तिथे हा धोका अधिक असतो. या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जींचे तिसरे सरकार, केरळमधील डाव्या आघाडीचे दुसरे सरकार आणि आसाममधील भाजपचे दुसरे सरकार यांच्यासाठी ही मोठी परीक्षा आहे.

**डॉ. जयदेवी पवार**

## गॅस केंद्रावरील हल्ले

इराण-इस्त्रायल युद्धामुळे मध्य-पूर्वेतील तणाव शिगेला पोहोचला असून, याचा परिणाम जागतिक गॅस आणि इंधन पुरवठ्यावर झाला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्यात आल्याने आणि गॅस क्षेत्रावर हल्ले झाल्याने कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. याचा परिणाम म्हणून भारतात गॅस सिलेंडर व पेट्रोल-डिझेल महाग होण्याची भीती निर्माण झाली आहे. पश्चिम आशियातील इराण-इस्त्रायल संघर्षात गॅस केंद्रांवर झालेले हल्ले जागतिक ऊर्जा सुरक्षेसाठी अत्यंत चिंताजनक आहेत, ज्यामुळे भारताच्या इंधनपुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती आहे. या हल्ल्यांमुळे होर्मुझ सामुद्रधुनीत भारताची गॅस घेऊन जाणारी जहाजे अडकली आहेत. तेल, गॅस आणि रासायनिक प्रोडक्ट्स भरलेली सहा जहाजे होर्मुझ सामुद्रधुनीत अडकली आहेत. केंद्रीय जहाज वाहतूक मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनीच ही माहिती दिली आहे. या सहा जहाजांसह भारताची एकूण २२ जहाजे पर्शियन खाडीत अडकून पडली आहेत.होर्मुझमधून भारतीय जहाजांना सुरक्षित मार्ग करुन देण्यासंदर्भात इराणच्या संबंधित विभागासोबत भारताची चर्चा सुरू आहे. सहा जहाजांमध्ये भारताला तीन दिवस (१४.२ किलोचे सिलेंडर) पुरेल इतका गॅस आहे.तथापि, केंद्र सरकारने घाबरून न जाण्याचे आवाहन केले असून साठे पुरेसे असल्याचे स्पष्ट केले आहे.

**प्रा.डॉ. सुधीर अग्रवाल,**
वर्धा-९५६१५९४३०६

## भाववाढ अपरिहार्य

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा ज्वर जसजसा वाढत गेला तसा इराणने आपला हुकमाचा पत्ता बाहेर काढला आणि जागतिक दैनंदिन तेलाचा २० टक्के पुरवठा जेथून होतो जातो. त्या आपल्या ताब्यातील 'होर्मुझ'ची सामुद्रधुनी जागतिक तेल व्यापाराच्या वाहतुकीसाठी बंद केली. जागतिक तेल व्यापाराच्या दृष्टीने महत्वाचा असलेली होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्याने जागतिक पुरवठा साखळी धोक्यात आली आणि कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. खरे तर जगभरात जेव्हा दोन किंवा अधिक देशांमध्ये युद्ध पुकारले जाते तेव्हा त्याचे परिणाम केवळ त्या देशांपुरते मर्यादित न राहता संपूर्ण जगाला भोगावे लागतात. कारण युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक स्तरावर वस्तूंची टंचाई निर्माण होते मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी पडल्यामुळे आणि भाववाढ होते. परिणामी महागाईचा आगडोंब उसळतो. आपल्या देशाला ८५ टक्के इंधन परदेशातून आयात करावे. त्यामुळे इंधनाचे दर वाढल्यास वाहतूक खर्च वाढून सर्वच वस्तू महाग होतात.सध्याच्या युद्धाचा आपल्या देशावरही झाला असून सरकारने व्यावसायिक गॅस सिलिंडरवर नियंत्रण आणले आहे व घरगुती गॅस सिलिंडरचा कोटा कमी केला आहे.त्यामुळे खाद्यपदार्थ व्यावसायिकांवर मोठे गंडांतर आले आहे. दुसरीकडे परिस्थितीचा गैरफायदा घेत साठेबाज जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांच्यावरही त्यांच्यावरही लक्ष ठेवून सरकारने कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

**प्रदीप मोरे**

## सीसीटीव्ही अंमलबजावणीला गती द्यावी!

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी विशेषतः दुर्गम व ग्रामीण भागातील शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचा शासनाने घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहेच. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी अत्यंत संथ गतीने होत असल्याचे वास्तव वाचनात आले.पालघर जिल्ह्यातील २११२ शाळांपैकी जिल्हा परिषद शाळांपैकी केवळ २५९ शाळांमध्येच सीसीटीव्ही प्रणाली कार्यान्वित आहे, ही बाब समाधानकारक म्हणता येणार नाही. राज्यातील इतर अनेक जिल्ह्यांतील शाळांची स्थितीही फारशी वेगळी नाही. परिणाम अनेक शाळा या महत्त्वपूर्ण सुरक्षाव्यवस्थेपासून वंचित आहेत. साहजिकच विद्यार्थ्यांच्या, विशेषतः विद्यार्थिनींच्या सुरक्षेबाबत पालकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे.

शाळांमध्ये सुरक्षित, पारदर्शक आणि शिस्तबद्ध वातावरण राखण्यासाठी सीसीटीव्ही प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

त्यामुळे उर्वरित शाळांमध्येही ही सुविधा तातडीने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांची सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता मानून प्रशासनाने या योजनेच्या अंमलबजावणीला गती द्यावी अशी अपेक्षा.

**विश्वनाथ पंडित**

## इच्छामरण देणे योग्य नाही..

नुकतेच हरीश राणा हे गेल्या तेरा वर्षांपासून अंथरुणाला पूर्णपणे खिळून असल्याने सर्वोच्च न्यायालयाने त्यांना इच्छामरण देण्याची अनुमती दिली. त्यानुसार हळूहळू त्यांना ज्या जीवन रक्षक साधनांमुळे जिवंत ठेवले आहे, ते हळूहळू बंद करावेत असा आदेश न्यायालयाने दिला आहे. अर्थात न्यायालयाला सुद्धा हा निर्णय देताना दुःखच झाले असणार यात शंकाच नाही. त्यांचे आई वडील गेले अनेक वर्षे गरिबीत जीवन काढून आजारी मुलाला सांभाळत आले आहेत. जन्मदात्या आईवडिलांचे आर्थिक हाल झाले हे जरी खरे असले तरी, हे मनुष्य जन्मातील भोग आहेत की जे मनुष्याला भोगावेच लागतात. त्यातून त्याची सुटका नसते असेच शास्त्र सांगते. कितीही तीव्र प्रारब्ध असले तरी मानवाला ते भोगावेच लागते. मग इच्छामरण घेऊन त्यातून सुटका मिळते का? तर नाही. शास्त्रानुसार प्रारब्धभोग एका जन्मात शिल्लक राहिले तर पुन्हा उरलेले भोग भोगायला जिवाला जन्म घ्यावाच लागतो असे शास्त्र सांगते. त्यामुळे मानवाने असे इच्छा मरण मागणे म्हणजे दैवी नियोजनाच्या विरुद्ध जाण्याचा प्रयत्न करणे होय. इच्छामरण न म्हणता हा एकप्रकारे आधीच प्रारब्ध भोग भोगणाऱ्या जीवाचा खून केल्यासारखेच आहे !

त्यामुळे प्रत्येक जिवाने कर्म अधिकाधिक चांगले ठेऊन देवाच्या चरणी शरण जावे आणि वाट्याला आलेले नशिबाचे भोग खंबीर राहून भोगणे यातच शहाणपण आहे. नाहीतर प्रत्येक जण सर्वोच्च न्यायालयात या न त्या दुःखाला टाळण्यासाठी इच्छामरणाचा मार्ग अवलंबून लागला तर समाजाचे काय होईल याचा विचारच न केलेला बरा !

म्हणून इच्छामरण, दयामरण, इत्यादी गोष्टी रद्दच केल्या पाहिजेत.

**आदिती देखणे**

## देशातील दूध उत्पादन वाढले

स्वातंत्र्यानंतर देशाच्या दूध उत्पादनात मोठी वाढ दिसून येत आहे.१९५० मध्ये हे उत्पादन केवळ एक कोटी ७० लाख टन होते आज ते जवळपास २४कोटी ७० लाख टन एवढे पोहचले आहे. गेल्या सात दशकात दूध उत्पादनात विविध प्रयोग केले गेले. यात स्थानिक म्हशी, स्थानिक गायी व देशी गायी स्थानिक म्हशी यांचा वाटा आता ६४ टक्के इतका आहे. विदेशी गायी यांचा वाटा १,८९एवढा आह. संकरित गायींचा वाट ३०.८० टक्के आहे . याचाच अर्थ असा कि अजूनही लोकांचा ओढा देशी गाई किंवा म्हशी यांच्यावरच दिसतो. देशात सर्वात जास्त उत्पादन उत्तर प्रदेशात असून पंजाब व हरियाणा मात्र उत्पादकतेत आघाडीवर आहेत. केंद्रीय अर्थसंकल्पात सुद्धा दूध उत्पादनाला प्राधान्य देण्यात आले असून पशुसंवर्धन विभागा साठी सहा हजार १५३ कोटी रुपये एवढी तरतूद करण्यात आली आहे. यात जवळपास १६ टक्के वाढीची तरतूद आहे. ही बातमी नुकतीच वाचली महाराष्ट्र मात्र देशाच्या तुलनेत मागे दिसतो. भारताच्या एकूण मूल्यवर्धित उत्पादनात दुग्ध व्यवसायाचा वाटा तब्बल १६ टक्के एवढा आहे . देशातील ४६.१ टक्के एवढी लोकसंख्या या व्यवसायात गुंतली आहे.

एकूणच देशातील दुग्ध व्यवसाय हा एक मोठा व्यवसाय आहे असे दिसते. केंद्र सरकारने अनेक सवलती दुग्ध व्यवसायासाठी दिल्या आहेत. महाराष्ट्र सरकारने सुद्धा या व्यवसायाला मदत करून तो वाढवावा अशी अपेक्षा आहे

**शांताराम वाघ**

सोमवार, २३ मार्च २०२६

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# "शेजाऱ्यांकडूनच ६ वर्षीय शिवानीची अपहरणानंतर निर्घृण हत्या; गाव हादरले"

## दारव्हा तालुक्यातील बोथ गावात धक्कादायक उलगडा, पोलिसांच्या सर्च ऑपरेशनमध्ये घरशेजारीच आरोपींचा पर्दाफाश




जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - जिल्ह्यातील दारव्हा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या बोथ गावात अवघ्या ६ वर्षांच्या निष्पाप मुलीच्या अपहरणानंतर झालेल्या निर्घृण हत्येचा थरकाप उडवणारा उलगडा झाला आहे. या प्रकरणात सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे, मुलीचे अपहरण करून तिची हत्या करणारे आरोपी हे तिच्याच घराशेजारी राहणारे असल्याचे निष्पन्न झाले आहे.

२० मार्च २०२६ रोजी निलेश नथ्थुसिंग जाधव यांनी आपल्या मुलीच्या अपहरणाची तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १९६/२०२६ अंतर्गत अपहरणाचा गुन्हा नोंदविण्यात आला. मात्र मुलीचा कोणताही ठावठिकाणा लागत नसल्याने पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्वतः घटनास्थळी दाखल होत संपूर्ण गावात मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबवण्याचे आदेश दिले. आठ पथकांच्या माध्यमातून संशयित घरांची झडती सुरू करण्यात आली. या दरम्यान, फिर्यादीच्या घराशेजारील कैलास जाधव यांच्या घरात पलंगाखाली लपवून ठेवलेला मुलीचा मृतदेह आढळून आला. तपासात उघड झाले की, आरोपींनी जुन्या वादातून शिवानीचे अपहरण करून तिची हत्या केली आणि पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह घरातच लपवून ठेवला होता. या प्रकरणी कैलास विलास जाधव (३०), माला विलास जाधव (२६), सोनी विलास जाधव (३२), रंजना सोनू जाधव (३०) तसेच एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले असून, गुन्ह्यात खून व पुरावा नष्ट करण्याचे कलम वाढविण्यात आले आहे. या घटनेमुळे बोथ गावात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, "आपल्याच शेजाऱ्यांनी असा विश्वासघात करावा?" असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, पोलिसांच्या तत्पर आणि समन्वयपूर्ण कारवाईमुळे या गंभीर गुन्ह्याचा उलगडा झाला असून पुढील तपास दारव्हा पोलीस ठाणे करत आहे.

# जागरूक ग्राहक ही काळाची गरज : सुनीता विभुते



जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - येथील तहसील कार्यालयात दिनांक १८ मार्च रोजी महसूल व अन्न नागरी पुरवठा संरक्षण विभाग महागाव यांच्या मार्फत जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या मंचावरून प्रमुख अतिथी म्हणून बोलतान सौ.सुनिता विभुते मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनातून ग्राहक हक्काचे महत्व विषद केले. त्यांनी जागरूक ग्राहक ही काळाची गरज असल्याचे सांगितले. यामध्ये आधुनिक बाजारपेठेत ग्राहकांची फसवणूक होण्याचे प्रमाण वाढले आहे.

ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. निकृष्ट दर्जाच्या वस्तू, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, ग्राहकापासून लपविलेले नियम, ऑनलाइन व्यवहारातील फसवणूक, यामुळे ग्राहकांना आपल्या हक्काबद्दल जागरूक राहणे अनिवार्य झाले असल्याचे आपल्या मार्गदर्शनातून सांगितले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की ग्राहकांनी वस्तू खरेदी करताना ग्राहक हक्काची माहिती ठेवणे व हक्काची जाणीव म्हणजे प्रत्येक ग्राहकाला सुरक्षितेची माहीती मिळविण्याचा, निवड करण्याचा, किंवा ऐकून घेण्याचा तसेच तक्रार निवारण करण्याचा व ग्राहक शिक्षणाचा हक्क आहे. वस्तू खरेदी करताना पक्के बिल घेणे, उत्पादनाची तारीख व अंतिम तारीख तपासुन घेणे, ISI किंवा ऍगमार्क गुणवत्ता चिन्ह तपासणे आणि फसवणुकीपासून स्वतःचे रक्षण तसेच ऑनलाईन व्यवहारातील धोके व कायदेशीर संरक्षण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन व्यक्त केले.

# माईंदे चौक परिसरात पिसाळलेल्या कुत्र्याचा हैदोस

## नऊ नागरिकांना चावा ; नगरपरिषद निष्क्रिय



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - शहरातील माईंदे चौक परिसरात पिसाळलेल्या कुत्र्याने अक्षरशः दहशत माजवली असून काल रात्री महिला बँकेच्या मागील बाजूस असलेल्या अपार्टमेंट परिसरात तब्बल नऊ नागरिकांना चावा घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरपरिषद कारवाई करण्यास तयार नसल्याने शिवसेनेचे शहर उपाध्यक्ष संजय उपगनलावार यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

या भागात आधीपासूनच भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असून, आता पिसाळलेल्या कुत्र्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. घटना समजताच शिवसेनेचे शहर उपाध्यक्ष संजय उपगनलावार यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन नागरिकांशी चर्चा केली. त्यांनी यवतमाळ नगर परिषदेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधला असता, "कुत्रे पकडण्याचा परवाना नसल्यामुळे आम्ही कारवाई करू शकत नाही," असे सांगत प्रशासनाने हात वर केल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

दरम्यान, ज्या नागरिकांना कुत्र्याने चावा घेतला, त्यांना वैद्यकीय महाविद्यालयात जाऊन उपचार घ्यावे लागले. संबंधित नागरिकांनी उपचाराचे कागदपत्र दाखवत प्रशासनाकडे तातडीने कुत्र्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिक हतबल झाले आहेत. माईंदे चौक परिसरात कुत्र्यांची टोळकी रस्त्यावरच बसून वाहने पाहताच त्यांच्या अंगावर धावून जात असल्याने अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. अनेक वाहनचालक जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. संकट मोचन रोड समर्थवाडी, शिवाजीनगर, गिलानी नगर, दहिवलकर प्लॉट यासह शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात कुत्र्यांचा त्रास वाढला असून याविरोधात लवकरच तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संजय उपगनलावार यांनी दिला आहे.

# वेचक




## घाटंजीत भाजपा महिला आघाडीची नवीन कार्यकारिणी गठीत

घाटंजी - तालुक्यातील भारतीय जनता पार्टी महिला आघाडीची नवीन कार्यकारिणी सौ. वर्षाताई नरेश पेंदोर यांच्या नैतृत्वात दि. 22 मार्च 2026 रोजी विश्राम गृह घाटंजी येथे आर्णी विधानसभेचे लोकप्रिय आमदार प्रा. श्री राजूभाऊ तोडसाम यांच्या प्रमुख उपस्थितीत गठीत करण्यात आली असून त्यांच्या हस्ते सर्व महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्यात वर्षा नरेश पेंदोर अध्यक्ष तर उपाध्यक्ष म्हणून सौव.योगिता बंडू तोडसाम, सौ.योगिता गजानन दुर्वे, सौ.उषा रमेश कोडापे,सौ. कल्पना संतोष मडावी,तर सरचिटणीस म्हणून सौ.आशा प्रदीप ठोंबरे ,सचिव म्हणून सौ.सुषमा विनय जाधव,सौ.अलकाताई चिंतामण मेश्राम, सौ.द्वारका ज्ञानेश्वर लोढे, सौ वनमाला गेडाम आणि मीराबाई किनाके व सौ. रंजना संदीप कोवे कोषाध्यक्ष असे एकूण पंधरा महिला सदस्यांची पदाधिकारी म्हणून निवड करून नियुक्तीपत्र देण्यात आले आहे एकूण साठ सदस्यांची कार्यकारणी गठीत करून उपस्थित सर्व महिला सदस्यांनाही नियुक्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी भाजपाचे तालुका अध्यक्ष श्री विजयजी बैस, सुरेशजी डहाके,सौ. वर्षाताई पेंदोर तालुका अध्यक्षा महिला आघाडी घाटंजी,महिला शहर अध्यक्षा सौ साधनाताई माडूरवार, सौ, सोनल ठाकरे उपाध्यक्षा न. प. घाटंजी सौ.नम्रता मेश्राम,सौ.लता ठाकरे श्री राम खांडरे, अजय पालतेवार, मुज्जू पटेल सह तालुक्यातील सर्व महिला व पुरुष पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.



## राममय वातावरणात सामूहिक रामरक्षा पठण उत्साहात संपन्न

यवतमाळ - शहरातील तिवारी चौक, अवधूत वाडी येथील श्रीराम मंदिरात श्री रामनाम उपासना मंडळाच्या वतीने आयोजित सामूहिक रामरक्षा पठण कार्यक्रम उत्साहात पार पडला. सलग सातव्या वर्षी आयोजित या उपक्रमास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रविवार, २२ मार्च रोजी सकाळच्या प्रसन्न वातावरणात मंत्रमुग्ध करणाऱ्या स्वरांत रामरक्षा पठण करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुनील लुले, उपाध्यक्ष नरेंद्र देशपांडे, मुकुंदराव औदार्य व सौ. मुक्ता वैद्य यांच्या हस्ते प्रभू श्रीरामांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर "श्रीराम जय राम जय जय राम" या जपाने सामूहिक पठणाला सुरुवात झाली. बालगोपाल आणि ज्येष्ठांच्या उपस्थितीत पाच वेळा रामरक्षा आवर्तन व एकदा मारुती स्तोत्र पठण करण्यात आले. महिलांची विशेष उपस्थिती कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरली. महाआरती मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाली. या उपक्रमात युवा ब्राह्मण संघ, इस्कॉन, समर्थ ब्राह्मण मंडळ, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, सखी ब्राह्मण महिला मंडळ, गायत्री परिवार व श्री स्वामी समर्थ केंद्र यांसह विविध संस्थांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाच्या विश्वस्तांनी परिश्रम घेतले.

# शेती परवडेना, बटईने देण्यावर शेतक-यांचा भर

## नापिकी, मजूरटंचाई व वाढत्या खर्चाचा फटका

जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - सततची नापिकी,घटलेले उत्पादन,शेतमालाचे पडणारे दर,मजूरटंचाई,खते-बियाणांच्या वाढलेल्या किमतीमुळे शेतकऱ्यांना शेती करणे अवघड झाले आहे.त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांपाठोपाठ आता मोठे शेतकरीदेखील बैल-बारदाना मोडीत काढत यंदा भागीदारीत शेती देण्याकडे वळला आहे.अलिकडच्या काळात अल्पभूधारक शेतकरी शेती ठोक्याने किंवा बटईने देत आहेत.एक एकर ते पाच एकरपर्यंत शेती घरी करणे परवडत नाही.

मजुरीची वाढलेले दर बैलांचा सांभाळ करण्यासाठी लागणारा चारा जाणारा वेळ घटलेले उत्पन्न यामुळे छोटे शेतकरी सरळ आपली शेती ठोक्याने देत आहेत. अलिकडच्या काळात तर पाच दहा आणि वीस एकरपर्यंतचे शेतकरीदेखील मजूरटंचाईमुळे शेती दुसऱ्यांना ठेक्याने देत आहेत.शेती पैशाने,मक्त्याने किंवा भागीदारीत लावायची असल्यास त्या शेताची प्रतवारी पाहून भाव ठरतो. साधारणपणे केळापूर तालुक्यात १५ ते २० हजार रुपये एकर भाव आहे. भागीदारीत दिल्यास प्रत्येक खर्च हा अर्धा विभागला जातो.एक हंगाम किंवा दोन्ही हंगामांसाठी शेती दिली जाते. काही वर्षांपासून शेतीवर सातत्याने नैसर्गिक संकटे येत आहेत.कधी कोरडा दुष्काळ,तर कधी ओला दुष्काळ,कधी गारपीट यामुळे शेतकरी धास्तावले आहेत तर कधी पिकांवर पडणाऱ्या रोगामुळे उत्पन्न कमी होत आहे.एकीकडे उत्पन्न कमी होत आले,तर दुसरीकडे शेतमालाचे भावदेखील सातत्याने कोसळत आहेत आणि दुसरीकडे शेतीसाठी लागणारे खते-बियाणे यांचे दर मात्र वाढत आहेत.अशा परिस्थितीत शेती करणे जिकिरीचे झाले आहे.त्यामुळे शेतकरी आपली शेती दुसऱ्यांना ठेक्याने किंवा बटईने देऊन अन्य रोजगार किंवा व्यवसाय करत आहेत.

### सालगडी दीड लाखावर

गुढीपाडव्याला सालगडी ठेवण्याची प्रथा आहे.केळापूर तालुक्यात यंदा सालगड्याचे एक लाख २५ हजार ते ५० हजार रुपये वर्ष असे करार झाले आहेत.याव्यतिरिक्त दिवाळी,पोळ्याला ड्रेस,धान्य हे वेगळे.हल्ली संपर्कासाठी मोबाइलदेखील द्यावा लागतो. त्यामुळे सालगडी आता दीड लाखाच्या जवळ पोहोचला आहे. अनेक मजूर शहरात कामासाठी मोठ्या प्रमाणावर जात आहेत. त्यामुळे शेतकामासाठी मजूर मिळत नाहीत.सालगडी ठेवण्याएवढे उत्पन्न होत नाही.

- श्रीनिवास रेकुलवा, (तालुका अध्यक्ष : केळापूर तालुका युवक काँग्रेस)

# विचार बदलल्यासच आनंदाचा मार्ग : डॉ. श्रीकांत मेश्राम

## 'वर्ल्ड हॅपिनेस' दिनानिमित्त पत्रकारांना माईंड हेल्थ कार्ड वितरण



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : "इतरांनी बदलले पाहिजे, ही अपेक्षा सोडून स्वतःच्या विचारांमध्ये बदल घडवून आणल्यास मानसिक स्थैर्य साध्य होते," असे प्रतिपादन मानसोपचार तज्ज्ञ डॉ. श्रीकांत मेश्राम यांनी केले. 'वर्ल्ड हॅपिनेस' दिनानिमित्त शिंदे प्लॉट येथील यवतमाळ माईंड केअर सेंटरमध्ये पत्रकारांसाठी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

समाजात पत्रकारांची भूमिका महत्त्वाची असून त्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे, या हेतूने माईंड हेल्थ कार्ड उपक्रम राबविण्यात आला. २२ मार्च रोजी झालेल्या या कार्यक्रमात अनेक पत्रकारांनी सहभाग नोंदवला. डॉ. मेश्राम यांनी आपल्या मार्गदर्शनात इतरांशी तुलना, ईर्ष्या, एकांगी विचारसरणी आणि अवास्तव अपेक्षा यामुळे व्यक्तिमत्वावर होणारे नकारात्मक परिणाम स्पष्ट केले. मानसिक संतुलन राखण्यासाठी सकारात्मक विचार, आत्मपरीक्षण आणि भावनांवर नियंत्रण आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच निरामय मनासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम, ध्यानधारणा आणि छंद जोपासण्याचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. स्मार्टफोनचा अतिरेक हा आधुनिक काळातील गंभीर व्यसन ठरत असून त्यापासून दूर राहण्याचा सल्लाही त्यांनी दिला. "जीवनात लवचिकता आणि समतोल राखल्यास आनंदी राहणे शक्य आहे," असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकारांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक अमित कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन नागेश गोरख यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित पत्रकारांना माईंड हेल्थ कार्डचे वितरण करण्यात आले.

# एक-दोन नव्हे तर तब्बल चार गावांतील भ्रष्टाचाराच्या तक्रारींनी कनिष्ठ अभियंता प्रवीण सलामे अडचणीत

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे 1 ते 4 चा प्रस्ताव दाखल, फौजदारी कारवाईचा प्रश्न ऐरणीवर

जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये झालेल्या विकास कामांमध्ये गंभीर अनियमितता व कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपां मुळे कनिष्ठ अभियंता प्रवीण सलामे यांचे नाव पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. विशेष म्हणजे एक-दोन नव्हे तर तब्बल पाच ते सहा गावांमधील तक्रारी वरिष्ठ स्तरावर पोहोचल्या असून त्यांच्या विरोधात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे 1 ते 4 कारवाई प्रस्ताव दाखल झाल्याची माहिती समोर येत आहे.

घाणमुख ग्रामपंचायत विकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक अपहार झाल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. या संदर्भात झालेल्या चौकशीमध्ये सलामे दोषी आढळल्याचा दावा तक्रारदारांकडून करण्यात येत असून त्यांच्यावर वसुलपात्र रक्कम असल्याचेही सांगितले जात आहे. ही रक्कम त्यांच्या पगारातून वसूल करण्यात यावी तसेच फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी उपोषणकर्ते राम जाधव यांनी केली आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, घाणमुख येथे दोन स्वतंत्र चौकशांमध्ये अनियमितता निदर्शनास आल्याचे सांगितले जाते. तसेच आपल्या अधिकृत कार्यक्षेत्राबाहेरील कामे घेणे, ठेकेदारी पद्धतीने हस्तक्षेप करणे, बोगस कागदपत्रांच्या आधारे बिले काढणे असे अनेक गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आले आहेत. धारेगाव येथील रस्त्याच्या कामात प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणाऐवजी दुसऱ्या रस्त्याचे फोटो दाखवून बिले काढल्याचा आरोप असून या संदर्भातील पुरावे संबंधित विभागाकडे असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. मात्र या प्रकरणात अद्याप ठोस कारवाई न झाल्याने संशय व्यक्त केला जात आहे. वाकोडी येथे बोगस सह्यांच्या आधारे लाखो रुपयांचे बिल काढल्याचा आरोप आहे, तर घोणसरा व इतर गावांमध्येही विकास कामांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचे तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले आहे. या सर्व गावांतील तक्रारी गटविकास अधिकारी यांच्यामार्फत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आल्याचे सांगितले जाते. दरम्यान, इतक्या मोठ्या प्रमाणात आरोप आणि चौकशी अहवाल समोर येत असतानाही अद्याप फौजदारी कारवाई का करण्यात आलेली नाही, हा प्रश्न आता नागरिकांमध्ये जोर धरत आहे. इतके गंभीर आरोप असताना संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल का होत नाहीत? शासन अशा अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहे का? असे प्रश्नही उपस्थित होत आहेत.

# तालुकास्तरीय भव्य पशु प्रदर्शनात विषमुक्त शेतमालाला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद यवतमाळ,पंचायत समिती पांढरकवडा तर्फे तालुकास्तरीय भव्य पशु प्रदर्शन शनिवार दि.२१ मार्च २०२६ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती चालबर्डी रोड पांढरकवडा येथे आयोजित करण्यात आले.

तालुका स्तरीय भव्य पशु प्रदर्शन कार्यक्रमात शेतकरी रविंद्र देशट्टीवार गांव खैरगांव (देशमुख) या शेतकऱ्यांच्या शेतातील विषमुक्त शेतीमधून उत्पादित शेतमालाला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला,आर्णी-केळापूर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार राजूभाऊ तोडसाम यांनी शेतकरी रविंद्र देशट्टीवार या शेतकऱ्यांच्या शेतातील विषमुक्त शेतीमधून उत्पादित शेतकऱ्यांची भेट घेऊन नैसर्गिक शेतीबाबत संवाद साधला,शेतकरी रविंद्र देशट्टीवार हे गेल्या दोन वर्षापासून पांढरकवडा शहरात बिरसा मुंडा चौक विषमुक्त शेतीमधून उत्पादित शेत मालाची विक्री करीत असल्याने नवीन ग्राहक जुळले आहे.आजरोजी पांढरकवडा येथे पशु प्रदर्शन कार्यक्रमामध्ये थेट शेतकरी ते ग्राहक विषमुक्त शेतमालाची ग्राहकांना विषमुक्त फळे,हळद पावडर मिळत आहे त्यामुळे ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे,विषमुक्त नैसर्गिक शेती,सेंद्रिय शेती काळाची गरज आहे.शेतकरी रविंद्र देशट्टीवार यांनी शेतकरी ते ग्राहक विक्री केल्यामुळे त्याचा त्यांना चांगला फायदा मिळत आहे.कारण यामध्ये

सरळ शेतकरी ते थेट ग्राहक असल्याने मध्यस्थी जो दलाल असतो तो या प्रक्रियेत नसतो त्यामुळे फायदा थेट शेतकऱ्यांना मिळतो.पशु विभाग पंचायत समितीचे डॉ.नाळे साहेबांनी शेतकरी रविंद्र देशट्टीवार या शेतकऱ्यांच्या शेतातील विषमुक्त शेतीमधून उत्पादित वायगाव हळद पावडर,चिकू,शेवग्याच्या शेंगा विक्रीसाठी स्टॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल रविंद्र देशट्टीवार यांनी त्यांचे आभार मानले.

# वनविभागाने केला ५० लाखांचा खर्च; मात्र तीन हजार झाडे गेली कुठे?

## हिरवळ होण्याऐवजी येलदरी स्मृतिवन झाले उजाड

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - पुसद वाशिम रोड लगत निसर्गाच्या छायेत असलेले 'एक एक झाड लावू, हिरवाईत स्मृती जपू' ही संकल्पना घेऊन निर्माण झालेले येलदरी स्मृतिवन भकास झाले आहे. या स्मृती वनातील ५० लाख रुपये खर्च करून लावलेली तीन हजार झाडे गेली कुठे? असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. हे स्मृतिवन सध्या गैरव्यवहाराच्या धुक्यात हरवले असून सखोल चौकशीची मागणी होत आहे.

पुसद वाशीम मार्गावर निसर्गप्रेमीसाठी उभारलेल्या येलदरी स्मृतीवनासाठी पुसद वन विभागाच्या वतीने ५० लाख रुपये खर्च केल्याची माहिती, माहिती कायद्यान्वये उघड झाली. या स्मृती वनात दोन हजार ९०१ झाडांची लागवड झाल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आले आहे. प्रत्यक्षात आज या ठिकाणी मोजकीच झाडे शिल्लक आहे. त्यामुळे वनविभागाच्या या गैरप्रकारांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संदर्भात निसर्गप्रेमी संजय एडतकर यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत माहिती मागविली असता स्मृती वनातील विविध कामांवर सुमारे ५० लाख रुपयांच्या खर्चाची नोंद आहे. त्यानुसार पिंपळ, जांभूळ, शिसव, बेल, सप्तपर्णी, पारिजातक, रिठा आदी प्रजातींची जवळपास एक हजार ९०० झाडे तर बांबू व विविध शोभेच्या फुलझाडांची ४७५ रोपे आणि स्वस्तिक, बोगनवेल, जेट्रोफा, मधुमालती यांसारख्या वेलींची ५२६ रोपे लावण्यात आल्याचे नमूद आहे. कागदोपत्री दाखविलेल्या आकडेवारी आणि प्रत्यक्षात दिसणारी परिस्थिती पुसद उजाड झालेले येलदरी स्मृतिवन यामध्ये मोठी तफावत असल्याने वनप्रेमींच्या/ निसर्गप्रेमींच्या मनात संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय येथे बोअरवेल खोदून त्यावर पाच एचपीचा मोटार पंप बसविल्याची नोंद आहे. जर अशी पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती, तर झाडांच्या संगोपनासाठी त्या पाण्याचा वापर का झाला नाही? आणि जर बोअरवेलमध्ये पाणीच उपलब्ध नव्हते, तर मोटार पंप बसविण्याचा खर्च का केला? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. तसेच सोलर प्लांट, खते यासारखे काही साहित्य स्थानिक बाजारात सहज उपलब्ध असतानाही ते चंद्रपूर शहरांतून खरेदी केल्याची नोंद असल्याने त्याबावतही संशय व्यक्त केला जात आहे. या दुर्लक्षित अवस्थेत असलेल्या स्मृती वनाचे पुनरुज्जीवन करण्यात यावे. खंडाळा घाटानंतर दाट जंगला लगत असलेल्या येलदरी स्मृतिवनात पुन्हा नव्याने हिरवाई फुलवून पर्यटन विकसित करावे, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. वन खाते निधी नाही अशी बतावणी करून येलदरी स्मृतिवनाची स्मृतीच नष्ट करत आहे, हा प्रकार आता थांबवावा, अशी निसर्गप्रेमींची मागणी आहे. जबाबदार अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संजय एडतकर तसेच परिसरातील नागरिकांनी केली आहे. तत्कालीन उप वनसंरक्षण अधिकारी पुसद यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. या दुर्लक्षित अवस्थेत असलेल्या स्मृती वनाचे पुनरुज्जीवन करण्यात यावे. खंडाळा घाटानंतर दाट जंगल लगत असलेल्या येलदरी स्मृतिवनात पुन्हा नव्याने हिरवाई फुलवून पर्यटन विकसित करावे, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. वन खात्यात निधी नाही अशी बतावणी करून येलदरी स्मृतिवनाची स्मृतीच नष्ट करत आहेत, हा प्रकार आता थांबवावा, अशी सामाजिक कार्यकर्ते तसेच वनप्रेमींची मागणी आहे.

येलदरी बीट मधील स्मृतिवन येथे खर्च झाला किंवा नाही याबाबत मला कुठलीही माहिती नाही त्यामुळे याबाबत मी आपणास कुठलीही माहिती परिपूर्ण सांगू शकत नाही.

**- आनंद सुरत्ने वनपरिक्षेत्र अधिकारी पुसद**

# रुग्ण व ट्राफीक पोलीसांसोबत केली ईद साजरा



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सुद्धा रमजान ईद च्या दिवशी सकाळी इंजिनीयर सय्यद अन्वरअली यांनी सह परिवार ग्रामिण रुग्णालय पुसद येथे रुग्ण व त्याच्या नातेवाईकांना शिरखुरमा वाटप करुन ईदच्या शुभेच्छा दिल्या. मागिल ४ वर्षा पासुन त्यांनी हा अनोखा उपक्रम सुरु केला आहे. सामाजिक कार्य करत असतांना आपल्या घरची मंडळी सोबत घेवुन मुस्लिम समाजातील एकमेव व्यक्तीमत्व आहे .तसेच ईदच्या दिवशी ट्राफिक पोलिस बांधव आपले कर्तव्य बजावत दिवसभर चौकात उभे असतात.त्यांना पण चौका चौकात जाऊन जागेवर शिरखुरमा देवुन ईदच्या शुभेच्छा देण्यात आले. यावेळेस पत्नी,मुलगा उमर अली, पुतन्या अशहर अली, पुतनी हाना व इतर मित्रमंडळी उपस्थित होते.जवळपास शेकडो लोकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# ‘इको-स्टे’ मेळघाटातील पर्यटकांसाठी ठरणार आकर्षणाचे केंद्र

**अमरावती/का.प्र.**

लोकांना निसर्गाच्या सान्निध्यात जायला आवडते. जंगलात फिरायला गेल्यानंतर काहीतरी वेगळा आणि भन्नाट अनुभव घ्यायला आवडतो.जंगलात ट्रेकिंगला जाणे किंवा एखाद्या उंच किल्ल्यावर चढाई करणे अनेकांना आवडते. पण, जंगलातच उंच मचानावर मुक्कामाची सोय झाली, तर हा वेगळाच रोमांचक अनुभव ठरू शकतो. वनविभागाने मेळघाटातील जंगलात ‘इको-स्टे’ सुविधा आता उपलब्ध करून दिली असून ती मेळघाटातील पर्यटकांसाठी



आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

मेळघाट जंगलात वाघांसह अस्वल, सांभर, रानगवा यांसारखे विविध प्रकारचे प्राणी पर्यटकांना अनेकदा दर्शन देतात. सध्या शंभरावर वाघांची संख्या या जंगलात आहे. मेळघाटाचे जंगल विस्तीर्ण आहे. ते दऱ्या-खोऱ्यांचे आहे. झाडांची संख्या जास्त आहे. जंगल दाट आहे. त्यामुळे वाघांचे दर्शन होण्याचे प्रमाण कमी असते. तरीही अलीकडे अनेकदा पर्यटकांना जंगल सफारीदरम्यान वाघोबा दिसतो, अशी माहिती वन अधिकाऱ्यांनी दिली आहे. विविध जैवविविधतेने परिपूर्ण अशा मेळघाटच्या जंगलात विविध प्राण्यांसह दुर्मिळ झाडे, दऱ्या-खोऱ्यांचा संगम आहे. पर्यटकांसाठी जंगल सफारीची सोयही आहे.

चारही बाजूंनी उंच पर्वतरांगा, खोल दऱ्या आणि घनदाट जंगल. निसर्गरम्य वातावरणात सुरक्षित पण रोमांचक अनुभव पर्यटकांना मिळावा, यासाठी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या वतीने चिखलदरा नजीक कुंभी बल्डा येथे उंच अशा मचानावर निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. हा ‘इको-स्टे’ पर्यटकांसाठी नवे आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. चिखलदरा रेंजर्स कॉलेजपासून वैराटकडे जाताना कुंभी बल्डा हे ठिकाण आहे.

डोंगरावरच एकूण चार उंच ‘प्लॅटफॉर्म’ उभारण्यात आले आहेत. तेही साधेसुधे नाहीत, तर मजबूत लोखंडी खांबांवर आहेत. त्यावर मजबूत घरासारखी निवासाची व्यवस्था आहे. जमिनीपासून चाळीस मीटर उंचीवर राहण्याची ही सुविधा सुरक्षित आणि दर्जेदार असल्याचे वन अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

या ‘इको-स्टे-मध्ये दोन व्यक्ती सहजपणे राहू शकतील, अशी व्यवस्था आहे. प्रसाधनगृहाची सुविधा त्यात आहे. उंच ठिकाणावरून जंगल न्याहाळण्याची संधी मिळते. मात्र, अंधार पडल्यानंतर पर्यटकांना मचानावरून खाली उतरण्याची परवानगी नाही. घटदाट जंगल, दरीतून वाहणारा गार वारा आणि चंद्रप्रकाशात वन्यजीवांच्या हालचाली टिपण्याचा रोमांचक अनुभव या ठिकाणी मिळू शकतो.

या मचानांना चुर्णी, कुंभी, अमलतास आणि रानजाई अशी वृक्षांची नावे देण्यात आली आहेत. या भागात खासगी वाहनांना प्रवेश नाही. तर ऑनलाईन बुकिंग करणाऱ्या पर्यटकांना वनविभागाच्या वाहनाने ‘इको-स्टे’पर्यंत पोहचवले जाते. ‘मॅजिकल मेळघाट’ या संकेतस्थळावरून बुकिंग करता येऊ शकते.

## संक्षिप्त

### जि. प. शाळा दहीगाव धावडे चे नवोदय परीक्षेत घवघवीत यश



**चांदूर रेल्वे**-तालुक्यातील जि. प. शाळा, दहीगाव धावडे येथील इयत्ता ५ वी चे विद्यार्थी सतेज तेजस्वी करुणाधन व नियती नरसिंह खडसे हे नुकत्याच झालेल्या नवोदय परीक्षेत पात्र ठरले आहेत. नवोदय विद्यालयात प्रवेशाबद्दल विद्यार्थ्यांचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ, विस्तार अधिकारी रवींद्र दिवाण, विजय सगणे, विषय साधनव्यक्ती अनिल गोंडसे, वर्षा गादे, शाळेचे मुख्याध्यापक प्रल्हाद इंगोले, शा. व्य. समिती अध्यक्ष किशोर वैद्य, शिक्षक राजेंद्र खोडे, सारंग धामणकर, विशाल बेले, अजय दाभेराव व समस्त गावकऱ्यांनी अभिनंदन केले.

### उद्योजकता विकास प्रशिक्षणाचा समारोप



**चांदूर रेल्वे**-तालुक्यातील घुईखेड ग्रामपंचायत येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत बचत गटातील महिलांसाठी आयोजित ६ दिवसीय उद्योजकता विकास प्रशिक्षणाचा समारोप कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, अमरावती यांच्या वतीने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.प्रशिक्षणामध्ये महिलांना लघुउद्योग उभारणी, व्यवसाय नियोजन, आर्थिक व्यवस्थापन, विपणन कौशल्य तसेच स्वयंरोजगाराच्या विविध संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढून स्वावलंबनाची नवी दिशा मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत प्रशासक वर्षलता हेमंत जाधव या होत्या. यावेळी प्रशासक समिती सदस्य अर्चना शिलणकर तसेच ग्रामपंचायतीचे ज्येष्ठ नागरिक श्री. जुनघरे उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अनिता तरारे यांनी केले.

### विद्यापीठात आज एकदिवसीय कार्यशाळा

**अमरावती**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र आणि महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या, सोमवार २३ मार्च २०२६ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. 'संत गाडगेबाबांची दशसूत्री व ग्रामविकास' हा या कार्यशाळेचा मुख्य विषय असून, ग्रामीण भागातील प्रशासकीय कामकाज आणि विकास प्रक्रियेवर यात सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे.अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरियल रिसर्च सेंटर येथे सकाळी ११:०० वाजता या कार्यशाळेचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य हर्षवर्धनजी देशमुख यांच्या शुभहस्ते होणार असून, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळा चे आजीवन प्रचारक आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवतील.‘ग्रामपंचायतींमध्ये नियुक्त झालेल्या प्रशासकाची जबाबदारी आणि भूमिका’ यावर लिना तुरकर,ट्रेनर, यशदा व सल्लागार, महाराष्ट्र सरपंच संघटना ह्या मार्गदर्शन करतील.

# सकाळच्या शाळेच्या वेळेत बदल करा

## महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे अधिका-यांना निवेदन



**अमरावती/का.प्र.**

(शासन मान्यता प्राप्त)महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना मुंबई ३२ जिल्हा अमरावती च्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अमरावती व सतीश मुगल शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. अमरावती यांना निवेदन सादर कडून सकाळच्या शाळेच्या वेळेत बदल करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनांनी केली.

२० मार्च २०२६ पासून सकाळ सत्रातील शाळा सुरू झाल्या आहेत व शाळेची वेळ ही ७:१५ ते १२:१५ अशी ठरविण्यात आली आहे, अमरावती जिल्ह्यातील उष्णतेचे प्रमाण पाहता व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेता आणि बाहेर गावावरुन शाळेत येणारी मुले यांच्या करीता सकाळ शाळेतील वेळेत बदल करून ती वेळ ७ ते ११ अशी करण्यात यावी अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली.निवेदन देते वेळी राजेंद्र दिक्षित (जिल्हाध्यक्ष), किशोर मालोकार व राजू डांगे उपस्थित होते.

**स्व.सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे राज्यस्तरीय उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती पुरस्कारांची घोषणा**

# झाडीबोली महर्षी ज्येष्ठ साहित्यिक डॉ.हरिश्चंद्र बोरकर यांना ‘साहित्यव्रती’

## कविता मोरवणकर, डॉ.शिवाजी शिंदे, क्षितीज देसाई, प्रभू राजगडकर,रश्मी पदवाड,मोहन काळे, बबन नाखले,अरूण मानकर पुरस्काराचे मानकरी

**अमरावती/का.प्र.**

मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे ट्रस्ट,अमरावती यांच्यावतीने दिल्या जाणाऱ्या २०२५च्या उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली असून यावर्षी सुप्रसिद्ध साहित्यिक, झाडीबोलीमहर्षी, .डॉ.हरिश्चंद्र बोरकर साकोली जिल्हा भंडारा यांना ‘साहित्यव्रती’ पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. विविध साहित्य प्रकारासाठी राज्यातील साहित्यिकांना सन्मानीत करणारी विदर्भातील ही मोठी पुरस्कार योजना आहे.

या पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट कादंबरीसाठीचा पुरस्कार रश्मी पदवाड मदनकर, नागपूर यांच्या ‘कायांतर’ या कादंबरीला देण्यात आला आहे तर उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार क्षितिज देसाई, ठाणे ‘शीतपेटीतून जेव्हा जाग येते’ या कथासंग्रहाला मिळाला आहे. रत्नागिरीच्या कविता मोरवणकर यांच्या ‘उद्याचा दहशतगर्द अंधार’ या कवितासंग्रहाला व गडचिरोली येथील प्रभू राजगडकर यांच्या ‘येथे आमचाही श्वास कोंडतो’ आहे यांना पुरस्कार जाहीर झाला. सोलापूरचे डॉ.शिवाजी शिंदे यांचा समीक्षाग्रंथ ‘निवडक स्त्री आत्मकथने-सामाजिक सत्व आणि स्वत्व’ हा समीक्षा ग्रंथ व उत्कृष्ट संपादनासाठी ‘अक्षयआंदण’ (शिवा राऊत यांची कविता) या ग्रंथाची निवड झाली आहे. या ग्रंथाचे संपादन श्री बबन नाखले व श्री अरूण मानकर यांनी केले आहे. बालवाड्.मय प्रकारात नवी मुंबई



चे मोहन काळे यांच्या ‘चला पुन्हा शाळेत जाऊ या’ या बालकाव्यसंग्रहाची निवड करण्यात आली आहे. तीन हजार रूपये रोख, शॉल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. शिरजगाव येथील युवा कवी नितीन पर्हाड याला ‘उभरती प्रतिभा’ या पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.

माजी राज्यमंत्री व आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ स्थापन केलेल्या ट्रस्टच्यावतीने गेल्या बारा वर्षांपासून मराठी साहित्यातील विविध लेखन प्रकारासाठी महाराष्ट्रातील साहित्यिकांना पुरस्कार देऊन सन्मानीत करण्याचा मानस केला आहे.याच योजने अंतर्गत विदर्भातील ज्येष्ठ साहित्यिकांच्या साहित्य सेवेची दखल घेऊन त्यांना ‘साहित्यव्रती’ पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार यावर्षी यंदा भंडारा जिल्ह्यातील साकोली येथील ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत, झाडीबोली महर्षी म्हणून विख्यात असलेले डॉ.हरिश्चंद्र बोरकर यांना त्यांच्या प्रदीर्घ व निरंतर साहित्यसेवेसाठी देण्याचा निर्णय पुरस्कार समितीने एकमताने घेतला.

# युवा स्वाभिमान पक्षाची तालुका कार्यकारिणी बरखास्त

## अध्यक्ष पदाच्या शर्यतीत निलेश देशमुख यांचे नाव आघाडीवर

**अंजनगाव सुर्जी /वार्ताहर**

युवा स्वाभिमान पक्षाची तालुका कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली असून नविन कार्यकारिणी लवकरच जाहीर होणार असल्याची माहिती समोर येत आहे.अंजनगाव तालुक्यातील निलेश देशमुख युवा स्वाभिमान पक्षाची स्थापना झाली तेव्हापासून आमदार रवी राणा यांच्या सोबत एक निष्ठेने जुळले असून तालुक्यात पक्ष मोठा करण्यात सिंहांचा वाटा आहे.

युवा स्वाभिमान पक्षाचे आंदोलन असो की निवडणूक प्रचार यात निलेश देशमुख



सक्रिय सहभाग नोंदवता. तर कार्यकर्त्यांचे शासकीय कार्यालयात कोणतेही काम अरथळे असेल तर देशमुख कार्यकर्त्यांचे काम होय प्रयत्न पाठपुरावा करतात तर चौवीस तास कार्यकर्त्यांच्या संपर्कात राहत असल्यामुळे निलेश देशमुख यांचे कार्य पाहून युवा स्वाभिमान पक्षाच्या नविन कार्यकारिणीत तालुकाध्यक्ष पदाच्या शर्यतीत देशमुखांचे नांव पक्ष संघटनेत आघाडीवर असल्याचे बोलल्या जात आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकी दरम्यान कोणतीही गटबाजी न करता पक्षाच्या हितासाठी त्यांनी सर्व कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन काम केले. त्यामुळे लोकसभा, विधानसभा निवडणुकीत तालुक्यातुन पक्षाच्या उमेदवाराला भरघोस प्रतिसाद मिळाला होता . यामुळे निलेश देशमुख यांचा युवा स्वाभिमान पक्षाच्या तालुकाध्यक्ष पदासाठी प्राधान्याने विचार करावा अशी आग्रही मागणी पक्षाच्या कार्यकर्त्यांत होत आहे.

# गाडगेबाबांच्या नावाने शोभून दिसणारी संस्था-संदीपपंत सोनार

## शंकरराव शिक्षण संस्थेची गोरक्षण संस्थेस भेट

**दर्यापूर/वार्ताहर**

अनन्य साधारण महत्व प्राप्त असलेली भारतीय संस्कृतीतील गोसेवा प्रत्येक सजीव जीवासाठी अत्यंत महत्वपूर्ण असून दर्यापूर परिसरात कार्यरत असलेल्या गाडगेबाबा गोरक्षण संस्थेचे कार्य हे गाडगेबाबांच्या नावाने असलेल्या या संस्थेला शोभून दिसते असे गौरवपूर्ण प्रतिपादन श्री शंकरराव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संदीपपंत सोनार यांनी केले.



अमरावती जिल्ह्यातील स्वातंत्र्य पूर्व काळात स्थापीत श्री शंकरराव शिक्षण संस्था करजगांव येथील संस्था कार्यकारिणी सदस्यांनी गाडगेबाबा गोरक्षण संस्थेला नियोजन पूर्ण भेट देऊन संपूर्ण कार्य व दैनंदिन दिनचर्या याविषयी माहिती जाणून घेतली . तसेच या संस्था स्थळावर गायीच्या शेणावर सुरु असलेल्या संशोधन कार्याविषयी प्रा. गजानन भारसाकळे यांचेशी विस्तृत चर्चाही केली.गोरक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे संस्थापक विश्वस्त प्रा. भारसाकळे यांनी संदीपपंत सोनार यांचा यथोचित सत्कार केला.याप्रसंगी करजगांव शिक्षण संस्था चमूमध्ये संदीप सोनार,नितीन रहाटे,निखिल सोनार,राजू रहाटे मान्यवरांची उपस्थिती होती.कार्यक्रम पूर्ततेसाठी गोरक्षण संस्था व्यवस्थापक बाळासाहेब भारसाकळे तथा दैनंदीन गोसेवक संतोष गवई, श्रीकृष्ण पोटे व अंकुश घरडे यांचे सहकार्य लाभले.

# श्री वाल्मिकी विरचित प्रभू श्रीराम चरित्र अद्भुत-डॉ.बेडेकर

## डॉ.हेडगेवार हॉस्पीटल व जनकल्याण सेवा संस्थेचा उपक्रम



**अमरावती/का.प्र.**

श्री वाल्मिकी विरचित वाल्मिकी रामायणात श्रीरामाच्या अवताराचा प्रमुख उद्देश म्हणजे रावण व दुष्ट राक्षसांचा वध करणे ! श्री विश्वामित्रांनी ही सगळी दीव्य अस्त्रे श्रीरामाला प्रदान केली , अधिक तेजस्वी व सामर्थ्यवान बनविण्यासाठी ! स्वतः क्रोधाविष्ट होऊन आपला यज्ञ अपुरा राहू नये , पुण्यक्षय होऊ नये यासाठी श्रीरामाची निवड त्यांनी केली. श्रीरामाने राक्षसांसह शिव धनुर्भंग करून प्रत्यक्ष परशुरामाला पराभूत केले . श्रीराम चरित्र अद्भुत व अनुकरणीय आहे, असे प्रतिपादन वाल्मिकी रामायण उलगडताना प्रा. डॉ. अलका बेडेकर यांनी केले.

जनकल्याण सेवा संस्था संचालित अंबागेटच्या आत दत्त मंदिराजवळ डॉ. हेडगेवार हॉस्पीटलचे होमिओ व सुजोक उपचार केंद्र रुग्णसेवा सदनात असून याच वास्तूत श्री राम नवरात्रात प्रा. डॉ. अलका बेडेकर यांच्या वाल्मिकी रामायण व श्रीराम श्री गणेशा झाला आहे.या प्रसंगी डॉ . बेडेकर बोलत होत्या . श्री वाल्मिकी रामायणातील बालकांड आणि अयोध्या कांड प्रारंभ करीत तिसऱ्या दिवशी रामायण वाचन करताना डॉ. बेडेकर म्हणाल्या, राम कथेत विश्वामित्र ऋषींचे महत्व खूप आहे. कारण रावण वधासाठी सर्व दिव्य अस्त्रविद्या त्यांनी श्रीरामाला प्रदान केली. यज्ञ, कठोर तपश्चर्या होती ती ब्रहमर्षि पद मिळविण्यासाठी. पण त्यात विघ्न इंद्राने आणले. ‘आपले आसन अबाधित रहावे, यासाठी इंद्राने अप्सरा रंभेला विश्वामित्र ऋषींची तपश्चर्या भंग करण्यासाठी पाठवले . त्यांनी तिला शाप दिला की , ’ तू दहा हजार वर्षे शिळा हो महर्षि वसिष्ठ तुझा उद्धार करतील ‘काम क्रोधावर विजय मिळवण्यासाठी पुन्हा १००० वर्षे कठोर तपश्चर्या करण्याचा दृढ निधीर केला. नंतर ते उत्तरेकडे निघून गेले . १००० वर्ष मौन व्रत घेतले , आहार घेतला नाही. ते काष्ठवत झाले . तपश्चर्या संपली पुन्हा इंद्र पुन्हा उपस्थित झाला तेव्हा ती तपश्चर्या आणि कठोर तपश्चर्येचे पडसाद पाहून घाबरले . देवांना सांगितले तेव्हा ब्रहमदेवासह ते उपस्थित झाले. आणि त्यांनी त्यांना सांगितले ,’ तुम्हाला दीर्घायुष्य व ब्राह्मणत्व प्राप्त झाले आहे. ‘विश्वामित्र ऋषींच्या विनंतीनुसार वसिष्ठांनी देखील त्यांना ब्राम्हणत्व प्राप्त झाल्याचे सांगून पूजन केले. ब्राम्हणत्व मिळणे किती कठीण ! ज्यांना ते प्राप्त झालंय त्यांनी ते जपा, असे आवाहन डॉ. बेडेकर यांनी केले.

# जुळ्या शहरवासियांना मिळाली जलतरण तलावाची भेट

**अचलपूर/वार्ताहर**

कोरोना काळापासून बंद पडलेला येथील नगरपालिकेचा जलतरण तलाव गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर सुरु करण्यात आला आहे. या जलतरण तलावामुळे परतवाडा अचलपुर शहरातील नागरिकांना एक आगळीवेगळी भेट मिळाली आहे.

नगराध्यक्ष रुपाली माथने व आमदार प्रवीण तायडे आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत या जलतरण तलावाचे उद्घाटन करण्यात आले. अचलपुर शहरातील नागरिकांच्या सेवेत असलेला हा स्विमिंग पूल कोरोना काळात बंद पडून त्याची दुरवस्था झाली होती. शेवटी नागरिकांकडून सातत्याने होत असलेल्या मागणीची दखल घेत मराठी नववर्षाच्या शुभमुहूर्तावर तो पुन्हा सुरू करण्यात आला अचलपूरचे नगरपालिकेचे मुख्याधिकारी धीरज गोहाड, महिला सोनपरोते, नियोजन सभापती दर्शना व बालकल्याण सभापती दुर्गा ठाकूर, नगरसेविका अपर्णा रोडे, यांच्या उपस्थितीत स्विमिंग पूलचा आरोग्य सभापती समशेर खान शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना आमदार तायडे म्हणाले, नागरिकांना आरोग्यदायी व्यायामाची की,



स्विमिंग पूल सुरू झाल्यामुळे सुविधा उपलब्ध झाली असून क्रीडा पोहणे हा उत्तम व्यायाम प्रकार असून युवकांमध्ये क्रीडा संस्कार वाढण्यास विकासाला चालना मिळणार आहे. याचा मोठा फायदा होईल. तो पुन्हा चांगली संधी मिळणार असल्याचेही सुरु झाल्याने खेळाडूंना सरावासाठी त्यांनी सांगितले. नगराध्यक्ष रूपाली पूल सुरू करण्याची मागणी माथने यांनी सांगितले की, स्विमिंग नागरिकांकडून वारंबार होत होती. आवश्यक दुरुस्ती व स्वच्छता करून नववर्षाच्या निमित्ताने ही सेवा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी स्विमिंग पूल परिसराची पाहणी केली. यावेळी नगरसेवक ल.ज. दीक्षित, सुरेंद्र तांबे, अक्षय पखाले, चंद्रेश बहोरिया, स्वीकृत नगरसेविका अक्षरा लहाने, कविता उपसभापती हेमा आसवानी, सदस्य अभय माथने, निल माहेश्वरी, आखूड, सारिका डांगे, अभियंता सुनील अग्रवाल तसेच पदाधिकारी व मनिष शर्मा, निशांत मिश्रा, कंत्राटदार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कोरोनापासून होता बंद

छत्रपती शिवाजी महाराज प्रभाग क्रमांक ७ मधील कल्याण मंडपम परिसरात असलेला सदर जलतरण तलाव हा कोरोनाच्या काळात बंद पडला होता. दरम्यान ही क्रीडापुरक सुविधा पुन्हा सुरू नगरसेविका तसेच राज पाटील यांनी स्विमिंग पुल तायडे यांच्या नेतृत्वात नगराध्यक्ष व या प्रभागाच्या व्हावी, यासाठी सतत प्रयत्न सुरु होते. आ. प्रवीण पूलची योग्य देखरेख व संचालन व्हावे यासाठी सुरू करण्यासाठी विशेष पुढाकार घेतला. स्विमिंग आवश्यक प्रक्रिया केली जाणार असून सध्या हा पूल पालिकेमार्फत चालविण्यात येणार असल्याची माहिती अभियंता मनिष शर्मा यांनी दिली.

# अंधश्रद्धाळू महाराष्ट्र

**आपल्या सरकारला हिंदू समाजाची काळजी घ्यायची असेल तर आत्ता महाराष्ट्रात असलेल्या सर्व बाबा-बुवांच्या मठांवर, संस्थांवर मंदिरांवर लक्ष ठेवण्याचे काम त्यांना करावे लागेल. तिथल्या आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवावे लागेल. तिथे येणाऱ्या भक्तांची अडवणूक आणि फसवणूक होत नाहीये ना हे पाहावे लागेल आणि ती तशी होत असेल तर त्यावर योग्य ती कारवाई करावी लागेल...**



महाराष्ट्रातील 'एपस्टिन फाईल' असे म्हणत सध्या आपल्या महाराष्ट्राची प्रचंड बदनामी सुरू झाली आहे. अशोक खरात नावाच्या कोणा बाबाचे उद्योग सापडले आहेत आणि त्यावरून हा गदारोळ उठला आहे. बाबा-बुवांनी केलेल्या शोषणाची प्रदीर्घ परंपरा असलेल्या महाराष्ट्रातील प्रकरणाला विदेशी एपस्टिनचं नाव देणे हा आपल्या स्वदेशी अस्मितेचा अपमान आहे. 'बुवा तिथं बाया' असे नाटक ज्या महाराष्ट्रात १९६४ साली लिहिले गेले त्या महाराष्ट्राचा या बाबतीतला लौकिक मोठा आहे. सामाजिक परिवर्तनासाठी झटणाऱ्या लोकांची जशी महाराष्ट्रात परंपरा आहे, तशीच समाजाला अंधश्रद्धेच्या गर्तेत नेणाऱ्या बाबा-बुवांची देखील परंपरा या महाराष्ट्राला आहे. आत्ता हा प्रश्न मुख्यत्वे करून लैंगिक शोषणाचा दिसत असला, तरी मुळात हा प्रश्न भयानक वाढत चाललेल्या अंधश्रद्धेचा आहे. कोणती तरी अज्ञात शक्ती या विश्वाच्या मागे कार्यरत असते आणि आम्ही त्या शक्तीवर विश्वास ठेवतो, या वरवर साध्या आणि व्यापक वाटणाऱ्या श्रद्धाळू विचारांपासूनच अंधश्रद्धेकडे जाण्याचा हा प्रवास सुरू होतो.

सध्या आपला महाराष्ट्र झपाट्याने अंधश्रद्धेच्या दरीत कोसळताना दिसत आहे. इतिहास अभ्यासकांना माहिती आहे, एकेकाळी संपन्न आणि तत्त्वज्ञानात प्रचंड चिंतन आणि सखोल अभ्यास असलेला आपला देश असाच हळूहळू अंधश्रद्ध होत गेला आणि शतकानुशतकांच्या गुलामगिरीत अडकला. याला कारण, कोणताही समाज जेव्हा धार्मिकतेच्या बाजूने झुकू लागतो तेव्हा त्याचा सर्वाधिक फायदा धर्माच्या नावाखाली कर्मकांडांचे आणि अंधश्रद्धेचे स्तोम माजवणाऱ्यांनाच होऊ लागतो. आपल्या धर्मातील किंवा परंपरेमधील सगळे काही चांगले, हे एकदा मानले की मग त्यातल्या तांत्रिक परंपरा, अनिष्ट शक्तींना दूर करण्याचे यज्ञ वगैरेवर पण विश्वास बसू लाभतो. मग इतरांचे अनिष्ट घडावे म्हणून सुद्धा उपाय सुरू होतात. स्वतःला मूल होण्यासाठी इतर मुलांचा बळी देण्याचे 'मानवत हत्याकांड' याच महाराष्ट्रात घडले आहे.

करणी, वशीकरण, एखाद्यावर मूठ मारणे यासारखे प्रकार वर्षानुवर्षे चालत आले आहेत. पण तेव्हाच्या आणि आत्ताच्या स्थितीतील फरक म्हणजे राजकारणी, सेलिब्रिटी, धनाढ्य लोक यातील बरेच जण आता या सर्वांत कधी नव्हे एवढा पुढाकार घेताना दिसतात. पूर्वीही सत्यसाईबाबांना मुख्यमंत्री निवासात बोलावले होते. पण त्यावेळी त्याच्यावर माध्यमांनी प्रचंड टीका देखील केली होती. आता अजितदादांच्या घरासमोर लिंबू-मिरची टाकणे, मंत्री होण्यासाठी रेडा बळी देणे, मंत्र्यांच्या निवासस्थानाच्या अंगणात काळ्या जादूचे साहित्य पुरून ठेवणे असे प्रकार माध्यमे चवीने दाखवतात किंवा त्यावर आडून आडून बोलतात. या सगळ्यावर कडाडून टीका करणे, यातील सत्य शोधून काढणे आणि संबंधितांना उत्तरे द्यायला लावणे हे प्रकार होत नाहीत. समाजातील सर्वांत असुरक्षित आणि घाबरलेला वर्ग म्हणजे समाजातले राजकारणी, सेलिब्रिटी आणि श्रीमंत लोक. आपण कमावलेला पैसा, स्थान आणि सत्ता कोणत्याही क्षणी जाईल अशी धास्ती असलेले हे लोक जगातल्या कोणत्याही बाबाचे नाव ऐकले की त्याच्यासमोर झुकायला तयार असतात.

शकुन-अपशकुन, मुहूर्त, वास्तुदोष, नावाच्या अक्षरांमध्ये बदल करणे, एखाद्या मंदिरात अभिषेक करणे, होम करणे अशा वरवर निरुपद्रवी वाटणाऱ्या प्रकारांनी कोणी कोणी व्यक्ती प्रतिष्ठीत लोकांमध्ये आपले महत्त्व वाढवू लागतात. त्यातून राजकीय हितसंबंध जोडून देण्याची आणि गुप्त अघोर विद्येचे वलय घेऊन स्वतःचे महत्त्व वाढवण्याची कला अंगी असलेले बाबा-बुवा तर अलगद यांना आपल्या जवळ खेचतात. यांनाही विविध पातळ्यांवर बाबांचे फायदे होतात आणि बाबांनाही यांच्यामुळे फायदे होतात. आणि नेते, अभिनेते, सेलिब्रिटी हे भक्त म्हणून लाभल्यावर सामान्य माणसांनाही हे बाबा महान वाटू लागतात. टुथपेस्टपासून टीव्हीपर्यंत सगळे काही सेलिब्रिटी चेहरे पाहून विकत घेणारा समाज दुसरे करणार तरी काय?

मन अनिष्ट कारणांसाठीचे यज्ञ सुरू होतात, बळी सुरू होतात, अघोरी विद्या सुरू होतात. सुरुवातीला भक्तिभावाने किंवा मनःशांतीच्या दृष्टीने या सगळ्यांकडे बघणारे तरुण-तरुणी, विवाहित स्त्रिया-पुरुष हे हळूहळू यांच्या पाशात गुरफटु लागतात. स्त्रिया तर भक्तिभावाने या शोषणाच्या बळी होतात. विविध बाबा-बुवांच्या दरबारात आपल्या लेकराबाळांना आणि नवऱ्यांना घेऊन हजर असलेल्या बायका दिसल्या की कळते, नरेंद्र दाभोलकरांचा हा महाराष्ट्र कोणत्या दुष्टचक्रात अडकत चालला आहे. आपला समाज या सर्वांतून बाहेर येईल, अशी विसाव्या शतकात निर्माण झालेली आशा झपाट्याने नष्ट होत चाललेली आहे. गावोगावी. गल्लोगल्ली मठ स्थापन होत आहेत. बाबा-बुवांचे भक्त इंटरनेटवरून बाबांची प्रसिद्धी वाढवत आहेत. आपल्या आपल्या बुवांचे अचाट किस्से पसरवत आहेत. बरे, हे किस्से चमत्काराने पैसे मिळवून देणे, मृत्यूपासून वाचवणे, आजार बरे करणे, मूल होणे इथपासून ते बाबांमुळे हवी ती बस मिळाली, घरात हरवलेली किल्ली बाबांमुळेच घरातच सापडली असे क्षुल्लकही असतात.

बरे, कलाकारांनी कलेच्या माध्यमातून यावर प्रहार करावा तर ती आशाही संपत चालली आहे. पूर्वी लोकप्रिय आणि समाजावर प्रभाव असलेले अनेक अभिनेते, लेखक अंधश्रद्धेविरोधी उभे राहताना दिसायचे. नाटकांतून, लोक नाट्यांतून, पथनाट्यांतून देवादिकांचीच प्रतिके वापरून अनेक कलाकार समाजाचे प्रबोधन करायचे. पण जसजसे एकविसावे शतक पुढे सरकु लागले तसे 'तुम्हाला आमचेच देव का दिसतात?... तुम्हाला आमचेच बाबा-बुवा का दिसतात?' असे म्हणून दम देऊन, कधी मारहाण करून आणि सातत्याने ट्रोल करून या सर्व कलाकारांना हळूहळू गप्प केले गेले. आज महाराष्ट्रातल्या कलाक्षेत्रात रुढी, परंपरा अंधश्रद्धा या दृष्टिकोनातून होणारे प्रबोधन जवळजवळ शून्य टक्क्यावर आले आहे. समाजातल्या अनिष्ट रुढी, अंधश्रद्धा या गोष्टी खटकणारे कलावंत आता समाज माध्यमांतून जुजबी आणि सूचक पोस्ट टाकण्यापलीकडे काही करू शकत नाहीयेत. वरपासून खालपर्वत समाजाने धर्माच्या बाबतीत चिकित्सक नाहीच राहायचे, असे ठरवून टाकले आहे. म्हणजे ज्या हिंदू धर्माचे वैशिष्ट्यच 'धर्मचिकित्सा' असे सांगितले जाते त्यानेच चिकित्सा हद्पार केली आहे. एवढी असंख्य आक्रमणे होऊन, एवढे विविध धर्म या देशात येऊनही ज्या पायावर इथला हिंदू धर्म टिकला आहे तो पायाच आता नष्ट केला जातोय. धर्माच्या आडून भोंदू लोक हिंदू लोकांनाच नाडत आहेत.

त्यामुळे आता सर्वांत मोठी जबाबदारी सध्याच्या सरकारची आहे; कारण हिंदूहिताचे रक्षण करण्याबाबत आम्ही कटिबद्ध आहोत, असे सांगतच त्यांनी सत्ता संपादन केली आहे. आपल्या सरकारला हिंदू समाजाची काळजी घ्यायची असेल तर आत्ता महाराष्ट्रात असलेल्या सर्व बाबा-बुवांच्या मठांवर, संस्थांवर मंदिरांवर लक्ष ठेवण्याचे काम त्यांना करावे लागेल. तिथल्या आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवावे लागेल. तिथे येणाऱ्या भक्तांची अडवणूक आणि फसवणूक होत नाहीये ना हे पाहावे लागेल आणि ती तशी होत असेल तर त्यावर योग्य ती कारवाई करावी लागेल. हिंदू धर्म म्हणजे काळी जादू, अघोरी यज्ञ, कर्मकांड नव्हे, हे त्यांना आपल्याच नेत्यांचे अभ्यासवर्ग घेऊन सांगावे लागेल.(साभार म.टा)

**सचिन मोटे**

# अंधश्रद्धा, स्त्रीचा सन्मान आणि सामाजिक उत्तरदायित्वः एक चिंतन

नाशिक येथे उघडकीस आलेले तथाकथित 'योनी शुद्धीकरण' प्रकरण हे केवळ एका व्यक्तीच्या गुन्हेगारी कृत्यापुरते मर्यादित नसून, समाजातील अंधश्रद्धा, स्त्रीविषयक भेदभाव आणि सामूहिक निष्क्रियतेचे गंभीर प्रतिबिंब आहे. उपचाराच्या नावाखाली महिलांची फसवणूक करून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात येणे हे मानवी सन्मान, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि शारीरिक अखंडतेच्या मूलभूत तत्त्वांचे उल्लंघन आहे.भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत 'जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार' दिलेला आहे, ज्यामध्ये सन्मानाने जगण्याचा अधिकार अंतर्भूत आहे. सर्वोच्च न्यायालयाने Maneka Gandhi v. Union of India या प्रकरणात स्पष्ट केले की वैयक्तिक स्वातंत्र्याची मर्यादा ठरवताना प्रक्रिया न्याय्य, वाजवी आणि गैर-मनमानी असली पाहिजे. पुढे Francis Coralie Mullin v. Administrator, UT of Delhi या प्रकरणात न्यायालयाने जीवनाच्या अधिकारामध्ये मानवी प्रतिष्ठा, सन्मान आणि मूलभूत गरजांचा समावेश असल्याचे अधोरेखित केले. या न्यायालयीन तत्त्वांच्या पार्श्वभूमीवर विचार करता, सदर प्रकरणात महिलांच्या सन्मानाचा झालेला अवमान हा संविधानिक अधिकारांचा थेट भंग आहे.

याचबरोबर संविधानातील कलम ५१A(h) अंतर्गत प्रत्येक नागरिकावर वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचे कर्तव्य सोपविण्यात आलेले आहे. तथापि, प्रत्यक्षात समाजातील काही घटक अजूनही अंधश्रद्धेच्या प्रभावाखाली निर्णय घेतात. महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन अधिनियम, २०१३ हा अशा भोंदू प्रथा आणि अमानवी कृत्यांना प्रतिबंध घालण्यासाठी अस्तित्वात असूनही, त्याची प्रभावीता समाजाच्या सहकार्यावर अवलंबून असल्याचे या घटनांमधून दिसून येते.याच संदर्भात एक विचार करायला लावणारी बाब म्हणजे, याच महिन्यात ८ मार्च रोजी International Women's Day मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विविध मंचांवर महिलांचे सशक्तीकरण, त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव, आणि प्रत्येक क्षेत्रात त्यांनी गाठलेली उंची याचे कौतुक करण्यात आले. स्त्री ही केवळ कुटुंबाची नव्हे, तर समाजाच्या प्रगतीची केंद्रबिंदू आहे, हे ठामपणे मांडले गेले.

परंतु, त्याच महिन्यात अशा प्रकारचे प्रकरण उघडकीस येणे ही एक गंभीर विसंगती दर्शवते. एका बाजूला स्त्री सन्मानाचे घोषवाक्य, आणि दुसऱ्या बाजूला तिच्यावर अंधश्रद्धेच्या नावाखाली अत्याचार यातून एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो:समाजाची मानसिकता खरोखर बदलली आहे का, की आपण केवळ औपचारिक पातळीवर प्रगतीचे प्रदर्शन करत आहोत?ही घटना दर्शवते की स्त्रीविषयक सन्मान आणि समानतेची संकल्पना अजूनही समाजाच्या वर्तनात पूर्णतः रुजलेली नाही.

संततीप्राप्तीच्या संदर्भात समाजातील लिंगभेद विशेषत्वाने अधोरेखित होतो. वैद्यकीयदृष्ट्या वंध्यत्व ही स्त्री आणि पुरुष दोघांशी संबंधित बाब असताना, सामाजिक व्यवहारात दोष केवळ स्त्रीवर टाकला जातो. सर्वोच्च न्यायालयाने Suchita Srivastava v. Chandigarh Administration या प्रकरणात स्त्रीच्या प्रजनन स्वातंत्र्याला वैयक्तिक स्वातंत्र्याचा अविभाज्य भाग मानले आहे. या निर्णयानुसार, स्त्रीला तिच्या शरीरासंबंधी आणि मातृत्वासंबंधी निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. तथापि, सामाजिक दबावामुळे हा अधिकार व्यवहारात मर्यादित ठरतो.

सततच्या दोषारोपांमुळे आणि मानसिक दबावामुळे स्त्रीची निर्णयक्षमता प्रभावित होते. अशा परिस्थितीत दिलेली तथाकथित 'संमती' ही कायदेशीरदृष्ट्या वैध मानली जाऊ शकत नाही. State of Punjab v. Gurmit Singh या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे की लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये पीडितेची मानसिक अवस्था आणि परिस्थितीचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. तसेच K.S. Puttaswamy v. Union of India या ऐतिहासिक निर्णयात 'गोपनीयतेचा अधिकार' (Right to Privacy) हा कलम २१ चा अविभाज्य भाग असल्याचे घोषित करण्यात आले असून, शरीरावरील स्वायत्तता ही त्या अधिकाराचा केंद्रबिंदू आहे. उपचाराच्या नावाखाली शरीरावर केलेले अनधिकृत कृत्य हे या अधिकारांचे उल्लंघन ठरते.या प्रकरणातील लैंगिक अत्याचाराचा पैलू अत्यंत गंभीर आहे. सर्वोच्च न्यायालयाने Bodhisattwa Gautam v. Subhra Chakraborty या प्रकरणात स्पष्ट केले आहे की बलात्कार हा केवळ व्यक्तीविरुद्धचा गुन्हा नसून, तो संपूर्ण समाजाविरुद्धचा अपराध आहे. त्यामुळे अशा घटनांकडे केवळ वैयक्तिक गुन्हा म्हणून न पाहता, सामाजिक अपयश म्हणून पाहणे आवश्यक आहे.या पार्श्वभूमीवर समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. संततीप्राप्ती न झाल्यास स्त्रीवर दोषारोप करणे, पुरुषांच्या जबाबदारीकडे दुर्लक्ष करणे, अंधश्रद्धात्मक प्रथांना मौन संमती देणे आणि संशयास्पद घटनांकडे दुर्लक्ष करणे,या सर्व गोष्टी अशा गुन्ह्यांना अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन देतात. समाजाची ही निष्क्रियता 'सामाजिक सह-अपराध' (Social Complicity) या संकल्पनेशी सुसंगत ठरते.



या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी विधिसंमत आणि सामाजिक स्तरावर एकत्रित प्रयत्न आवश्यक आहेत. संविधानिक कर्तव्यांनुसार वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करणे, संततीप्राप्ती ही स्त्री-पुरुष दोघांची संयुक्त जबाबदारी आहे ही जाणीव समाजात दृढ करणे, महिलांवरील मानसिक दबाव कमी करणे, कायद्यांविषयी जागरूकता वाढवणे आणि संशयास्पद कृत्यांविरुद्ध सक्रिय भूमिका घेणे या बाबी अत्यावश्यक आहेत. याशिवाय शिक्षणव्यवस्थेत वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लैंगिक समज यांचा समावेश केल्यास दीर्घकालीन बदल साध्य होऊ शकतो.निष्कर्षतः, नाशिकमधील हे प्रकरण केवळ एक गुन्हेगारी घटना नसून, समाजाच्या मानसिकतेचे प्रतिबिंब आहे. भारतीय संविधान आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांनी सन्मान, स्वायत्तता आणि समानतेचे जे तत्त्व स्पष्ट केले आहेत, त्यांची अंमलबजावणी समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय शक्य नाही.स्त्री सन्मानाचे उदात्तीकरण करणारा समाज, त्याच महिन्यात घडलेल्या अशा घटनांमधून स्वतःकडेच प्रश्न विचारायला बाध्य होतो. जर या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधली, तरच खऱ्या अर्थाने स्त्रीसन्मान आणि सामाजिक प्रगती साध्य होऊ शकते.

**आशिष गावंडे**
कार्यक्रम अधिकारी,
आकाशवाणी, अमरावती
मो.९१७५६२८६८६

## शहीद दिन

# देवभक्ती इतकीच देशभक्तीही महत्त्वाची



ईश्वरभक्त आपण असतोच, पण त्याबरोबरच आपण या समाजाचे, देशाचे देणे लागतो. त्यांच्याप्रती आपण आपली कर्तव्य पूर्ती करणे तेवढेच महत्त्वाचे असते. म्हणून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर लिहितात, 'देहाकडून देवाकडे जाताना वाटेत देश लागतो आणि आपण त्या देशाचे देणे लागतो! हे लक्षात ठेवून केलेली समाजसेवा, देशसेवा म्हणजे खरी देशभक्ती!' असेच तीन देशभक्त भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव, ऐन तारुण्यात आपल्या हसत हसत शहीद झाले. त्यांना जी फाशी झाली ती कायदेमंडळात बॉंब फेकला म्हणून नाही, तर सौंडर्सच्या हत्येच्या आरोपाखाली त्यांना फाशी देण्यात आली. ही हत्या १७ डिसेंबर, १९२८ रोजी झाली होती. त्यावर खटला चालवण्यात आला आणि त्याच्या अखेरीस २३ मार्च, १९३१ रोजी फासावर लटकविण्यात आले. हे बलिदान देऊन ते अमर झाले.

माता आणि माती यामध्ये फक्त एका वेलांटीचा फरक आहे. मात्र आपण या दोन्हीच्या ऋणातून कधीच मुक्त होऊ शकत नाही. एक जन्म देते, तर दुसरी आपला सांभाळ करते. एकीच्या उदरात आपला जन्म झाला तर एकीत आपण मिसळणार आहोत. हे भान ठेवून या दोन्ही मातांची सेवा आपल्या आयुष्यात केलीच पाहिजे. क्रांतिकारकांनी प्रचंड लढा देऊन स्वातंत्र्य मिळवले आता आपली जबाबदारी आहे ते ते टिकवून ठेवण्याची! त्यामुळे अशा क्रांतिकारकांच्या शहिद दिनानिमित्त त्यांचे स्मरण केले पाहिजे आणि त्यांचा आदर्श ठेवून आपणही धर्मकार्यात, देवकार्यात तसेच देशकार्यात आपले सक्रिय योगदान दिले पाहिजे!

**विनय काळे**

# वयापार प्रेमाचे 'उत्तरायण'

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत प्राथमिक नाट्य महोत्सव २०२५-२६. स्व. भाऊसाहेब लिमये सिपना कॉलेज अमरावती, येथे १७ 'उत्तरायण' नाटक सादर झाले.**





गिटारचे स्वर छेडित पडदा उघडतो.कुटुंब न्यायालयाच्या परिसरात बाकावर नाश्ता करणारा गृहस्थ.फोन वर स्कॉर्प गुंडाळून आलेली तिशीपार स्त्रीचा प्रवेश.थोरल्या बहिणीचा फोन असल्याचे जीजू शब्दातून जाणवले.फोन नंबर घेण्यासाठी गृहस्थ कडून पेन उसना घेण्याची अभिनयातून सूचना मिळते. डिस्प्ले गेल्यामुळे नंबर दिसत नाही; त्यामुळे गृहस्थाच्या फोनवरून फोन करण्याची विनंती.गृहस्थ फोनचे बिल मागतो.दोनदा डायल केल्याचे.अशा संवादातून मस्करी आणि कुटुंब न्यायालयाकडे नेण्याचे कारण विचारताना कौटुंबिक हिंसाचार चे प्रकरण वगैरे काय इथून सुरू झालेल्या नाटकात. दिल दर्या.. गालिफचे शेर मावशीचा फोन आल्यावर ती कोर्टात आल्याचे सांगते. तो पुढे कितवी सुनावणी म्हणताच ये अंधा कानून चे गीत.वेंधळा अभिनय करत तो पुतणी वकील,तिचे भवितव्य अशी कहाणी सुनावतो.दबंगात सलमानचे सह पात्र उल्लेख.मेंदूच्या बाष्पीकरणावर कमेंट.'ना उम्र की सीमा हो'... गीत घड्याळाचे वेळ बघताना व धरलेल्या हाताने स्त्री स्पर्शाचे स्पंदन तो भूमिकेत दाखवतो.ती प्रश्न करते लग्न नाही का नाही?येथे गुलाबी रंगात घोरडे मॅडमचे आठवणीत तो 'मेरा नाम जोकर' स्मरून देतो. मेडिकल रिपोर्टची वयपरत्वे आजाराची यादी तो (आनंद) सांगतो.

**एक टक नाटक**

**समीक्षण**

तुम्ही कसे करता हो? म्हणताच चोखदंडे नाव तो घेतो.श्लील-अश्लील संवाद म्हणजे पॉर्न ते व्हर्जिन सारख्या शब्दात ती चोखदंडेची पारख घेत सभ्य, वेंधळेले चोखदंडे व ती असा संवादातून झालेला परिचय.

एक खेळ खेळू या का? असा भिन्नलिंगी प्रसंग नाटकात उभा करतात. कोस्टँटिन स्टेनीस्लव्हासकी व ली स्ट्रॉसबर्ग यांच्या मेथड अक्टिंग चे प्रयोग चोखदंडे व ती विद्यापीठातील कलर कोट प्राप्तीच्या चर्चा आणि लगेच धनंजय माने इथेच राहतात काय? या डायलॉग वर ती पुरुषाचा अभिनय व तो गर्भधारक स्त्री भूमिका मांडताना अभिनयाची जुगलबंदी सुरू असते. वेद मुलगा त्रिशा गर्भात तिचे बद्दल स्वप्न आणि गंमत जंमत करीत अचानक अठरा कर्मचाऱ्यांना बॉसने नोकरीवरून काढले.त्यात माझाही नंबर आहे.या धक्कादायक बातमीवर अभिनयाचे सांत्वन करणारे प्रसंग विस्कटलेल्या स्थितीत पुढील अंक मजल दर मजल करते म्हणजे शोले,आनंद,नटसम्राट, 'वऱ्हाड निघाले लंडनला'(वन्स),वजूद अशा वळणातील भूमिकेची झुळूक जाणवते.

त्र्यांशी वर्षातील वृद्धापकाळ साकारताना ती सरकारी इस्पितळात दाखल झालेला प्रसंग उभा करून उत्तरायण या शब्दाची हलकी ओळख म्हणजे मोठ्या रात्रीचा लहान दिवस.हळदी, कुंकू, परांजपे बाई आदी पुणेपण नाटकात दाखवत लेखक व दिग्दर्शक गणेश बन्सी वानखेडे यांनी नाटकाचे शिखरबिंदू मध्ये वयापार प्रेमाची गुलाबी रंगत कामगार वडिलांच्या मृत्युने हळहळली तरुणी. एकल प्रेमाची रुजवण कुटुंबातील जबाबदारीत अडकून पडलेल्या ज्येष्ठ तरुणाची गोष्ट उत्तम अभिनय करून साकारली.तोरड्याची छुम छुम(शब्द) छुन छुन(खुळखुळ) झाले.तीने तीनदा चप्पल काढली.लग्नापूर्वी पायात जोडवे ठेवून केलेला ती चा अभिनय स्त्री पुरुषात 'सेम टू सेम' होता.

तो(चोखदंडे) अभिनय करताना नट म्हणून चेहरा तेवढा वयस्कर म्हणजे माधुरीला नाना पाटेकर वजूद सारखे झाले. वयस्क ठीक ओसाळ चेहरा व तो ती करताना हलके से बेरिंग शुल्लक घसरले.ती म्हणून अनुराधा वाठोडकरने उत्तम अभिनय,सुरेख पाठांतरावर संवाद आणि वाट्टेल ती जागा भरून काढून रंगमंच सादरीकरण केले.नेपथ्य ठीक ठाक कौटुंबिक न्यायालयात वकील, पक्षकार अथवा समुपदेशकांची झलक फोन किंवा अप्रत्यक्षरित्या दिसली नाही.कदाचित हा रविवारचा तर सीन नसेल? लेखक तत्त्वज्ञान व प्रस्थापित व्यवस्थेचे हादसे याचा मेळ घालण्याचा प्रयत्न करतांना कुटुंब न्यायालयाच्या चेहरा समोर करून पारिवारिक जीवनाची विस्कळ लिव्ह अँड रिलेशनशिपमध्ये विस्तृत करीत,विवाह संस्काराचे प्रेमबंधातील नाते ती व तो करून दाखवताना उत्तरायण शीर्षक गांभीर्यपूर्वक उकलं करणे साधले (क्लायमॅक्स सांगताना)का? यावर अभिनय व कलासादरात आशय सोडून नाटक जाऊ नये अशी दर्शकाची भूमिका.नेपथ्य संजय काळे,पार्श्वसंगीत सौरभ शेंडे,प्रकाश संयोजन हर्षद ससाणे, रंगवेशभुषा वैभव शेळके, सानवी वानखेडे ह्यांच्या मार्फत नाटक एक टक नाटक बघताना दर्शकांचे साद प्रतिसाद आपसूक उमटले.

कामगार कल्याण मंडळाकडून हौशी नाटकाची पर्वणी 'उत्तरायण'ला पुढील स्तर पार करण्यास उपलब्ध केली.अशीच नाटके दररोज २९ मार्च पर्यंत सायंकाळी ७ वाजता सुरू आहे.रसिक,दर्शक मायबाप यांना विनम्र आवाहन.

**कबीर फादर.**
मो.७७९८६४५५६५

# दत्ताजी डीडोळकर विद्यार्थी विकास निधी समितीची सिपना महाविद्यालय चिखलदराच्या जिजाऊ महिला वसतिगृहाला भेट

**सिपना/प्रतिनिधीः-** कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा जि. अमरावती च्या जिजाऊ महिला वसतिगृहाला श्रद्धेय दत्ताजी डीडोळकर विद्यार्थी विकास निधी सहयोग सेवा फाउंडेशन, नागपूर यांच्या समितीने दि. १२ व १३ मार्च २०२६ रोजी भेट दिली.

समितीने मेळघाटातील निवडक गावांमध्ये जाऊन वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थिनींच्या घरी भेटी देत पालकांसोबत प्रत्यक्ष संवाद साधला. जिजाऊ महिला वसतिगृहाला भेट देऊन तेथील कामकाजाचा आढावा घेतला.

या भेटीदरम्यान मुरलीधर चांदेकर (माजी कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती; माजी प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली डॉ. चंद्रशेखरजी भुसारी व विनय माहूरकर तसेच अमरावती चे मेंटॉर संजय गुंबळे यांनी विद्यार्थिनींसोबत संवाद साधला.

दत्ताजी डीडोळकर यांचा जीवनपट, त्यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान, तसेच त्यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या या सेवा फाउंडेशनचा उद्देश गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत उपलब्ध करून देणे याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच संस्थेने आजपर्यंत केलेल्या



कार्याचा आढावा उपस्थितांना दिला.

प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश जयपुरकर यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी महाविद्यालय व जिजाऊ महिला वसतिगृहाची माहिती देत या सेवा फाउंडेशनमार्फत विद्यार्थिनींना मिळणाऱ्या मदतीचे महत्त्व स्पष्ट केले. ग्रामीण व मेळघाट परिसरातील विद्यार्थिनींना सुरक्षित व सुलभ निवास सुविधा उपलब्ध करून देणे हा वसतिगृहाचा मुख्य उद्देश असून, सध्या श्रद्धेय दत्ताजी डीडोळकर सहयोग सेवा समिती, नागपूर यांच्यामार्फत प्रति विद्यार्थिनी दरमहा रु. ३५०० इतकी आर्थिक मदत दिली जात आहे. एकूण ३६ विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ मिळत आहे.

या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व होतकरू विद्यार्थिनींना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. संस्थेच्या सहकार्यामुळे विद्यार्थिनींसाठी निवास, भोजन तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

समितीच्या सदस्यांनी विद्यार्थिनींच्या शैक्षणिक व वैयक्तिक विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या भेटीदरम्यान विद्यार्थिनींनीही आपल्या अडचणी समितीसमोर मांडल्या व खुल्या दिलाने संवाद साधला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वसतिगृह समन्वयक डॉ. उषा वासनिक यांनी केले. यावेळी डॉ. व्ही. एस. मंगळे, प्रा. जी. डी. मुरतकर, डॉ. उज्वला कोकाटे, डॉ. संगीता जगताप, डॉ. पी. जी. गावंडे, डॉ. निलिमा भोगे, डॉ. एस. एल. कोत्तेवार तसेच प्रणव पवार, व्ही. एम. लकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# भातकुलीमध्ये आढळला डेंग्यू पॉझिटिव्ह

## -आरोग्य विभागावर नागरिकांचा असंतोष

**अमरावती/प्रतिनिधीः-** भातकुली नगरपंचायत परिसरामध्ये डेंग्यू पॉझिटिव्ह रुग्ण आढळल्याने खळबळ उडाली आहे. वार्ड नंबर १ कोलटेक क्षेत्रात हा रुग्ण मिळाला आहे. यामुळे नागरिकांनी आरोग्य विभागावर असंतोष व्यक्त केला आहे. नागरिकांनी आरोप लावला आहे की ,नगरपंचायतच्या वतीने परिसरात स्वच्छतेकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. यामुळे जागोजागी घाण पसरली आहे. नाल्या भरलेल्या आहे. मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला आहे. डेंगू सारखे आजार यामुळे वाढले आहे.



नगरपंचायतकडे वारंवार तक्रारी करूनही याकडे लक्ष देण्यात आले नाही. कोणतेही ठोस पाऊल नगरपंचायत प्रशासनाने उचलले नाही. नगराध्यक्ष पण या वार्डमध्ये राहतात. या नंतरही स्वच्छते संदर्भात व्यवस्था करण्यात आलेली नाही. या कडे लक्ष देऊन तात्काळ फॉगिंग, नाल्यांची साफसफाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# बुधवारा येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड रामायण पठन

## -भव्य धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील बुधवारा परिसरातील आझाद हिंद मंडळाच्या वतीने सार्वजनिक श्री हनुमान मंदिर येथे गुढीपाडव्यापासून श्री हनुमान जन्मोत्सवापर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले असून परिसरात सध्या भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

हनुमान जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिरात अखंड रामायण पठनास प्रारंभ करण्यात आला असून श्री कुंदन महाराज यांच्या वाणीतील रामायण वाचन दररोज सकाळी ६.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत सुरू आहे. भाविक मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहून रामनामाचा लाभ घेत आहेत.

संस्थेच्या वतीने दि. २६ मार्च २०२६ रोजी श्री राम जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात येणार असून यावेळी परिहार महिला भजनी मंडळ यांचे भक्तिमय भजन सादर होणार आहे.

हनुमान जन्मोत्सवानिमित्त पुढील विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दि. ३१ मार्च व १ एप्रिल, सायं. ७.३० वा. ह.भ.प. श्री रविंद्र महाराज बाळापुरे यांचे वारकरी कीर्तन

दि. १ एप्रिल, रात्री ११.०० वा. श्री सतीश श्रीवास व संच यांचे संगीत तुलसी रामायण (सुंदरकांड) सादरीकरण. दि. २ एप्रिल, पहाटे ५.०० वा. ह.भ.प. डॉ. श्रीकृष्णराव जिरापुरे यांचे हनुमान जन्मोत्सव कीर्तन. दि. २ एप्रिल, सायं. ७.३० वा. सुप्रसिद्ध गायक आशुतोष देशपांडे व मधुसदन वटक यांचा भक्ती संगीत कार्यक्रम. दि. ३ एप्रिल, सायं. ६.०० वा. गोपाळकाल्याचे कीर्तन. त्यानंतर सायं. ७.३० वा. महाप्रसाद वितरण.

या धार्मिक सोहळ्यांना उपस्थित राहून आध्यात्मिक आनंदाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक श्री हनुमान मंदिर, बुधवारा अमरावतीच्या विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# श्रीराम नवमी निमित्त २६ ला निघणार भव्य शोभायात्रा

## -विहिंप व बजरंग दलाचे आयोजन -देखावे ठरणार आकर्षणाचे केंद्र

**अमरावती/प्रतिनिधीः-** विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने श्री रामनवमी निमित्य भव्य शोभायात्रा गुरुवार २६ मार्च रोजी बालाजी प्लॉट येथील सिताराम बाबा मंदिर प्रांगणातून सायंकाळी ६ वाजता काढण्यात येणार आहे.विहिपचे जिल्हाध्यक्ष अनिल साहू व समिती अध्यक्ष रोहित शर्मा यांच्या मार्गदर्शनात हे नियोजन करण्यात आले आहे.

शोभयात्रा निघण्यापूर्वी पाच वाजता पूजन आणि आरती केली जाणार आहे. पूजेचे मुख्य यजमान श्यामा व भगीरथ अहरवार, सरोज व केशव कुशराज राहणार आहे. यावेळी जितेंद्रनाथ महाराज, स्वामी राजेश्वराचार्य, महंत मनमोहनदास, डॉ. संतोष नवलानी, सचिनदेव महाराज, श्यामसुंदर निचित, रामप्रिया माई, कवर राजेश साई, मोहन बाबा कारंजेकर मार्गदर्शन करणार आहेत. मुख्य अतिथी म्हणून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार अनिल बोंडे, बळवंत वानखडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, रवि राणा, जगदीश गुप्ता, प्रवीण पोटे, महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, अविनाश मार्डीकर उपस्थित राहणार आहे. सोबतच जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, पोलिस आयुक्त राकेश ओला, नितीन धांडे, नगरसेवक बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, मनोज भेले, नगरसेवक दिनेश बुब, मिलिंद बांबल, दीपक साहू, विलास मराठे, चंदु सोजतिया, कुसुम साहू उपस्थित राहणार आहे. शोभायात्रेमध्ये मातृशक्ति, दुर्गा वाहिनी, प्रखंड कार्यकारिणी स्वयंसेवक आपली सेवा देणार आहे. विविध धार्मिक, अध्यात्मिक देखावे आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

**राजकमल चौकात होणार महाआरती-**

रामनवमी शोभायात्रेची तयारी जोरात सुरू आहे. शोभायात्रेचे जागोजागी स्वागत करण्यात येणार आहे. शोभायात्रा राजकमल चौकात पोहोचल्यावर मान्यवरांच्या हस्ते महाआरती केली जाणार आहे. शोभायात्रेच्या यशस्वीतेसाठी सुरेश चिकटे, बंटी पारवानी, राजीव देशमुख, अर्चना देवडिया, लिना शर्मा, सिध्दु सोलंके, शंतनु भंडारकर, विजय शर्मा, विशाल राऊत, विजय खडसे, शरद अग्रवाल, दीपक पाठक, ज्ञानेश्वर पातसे, आदित्य रोडे, कैलाश कंकरानिया, प्रवीण गोनयका, जयप्रकाश अग्रवाल, श्रीरंग वडनेरकर, योगिता कळंबे, वैशाली शेलारे, निखिल विश्वकर्मा, दुर्गेश ठाकुर, सतिश कुरील, यश गुप्ता, मयुर जयस्वाल, अनिल शर्मा प्रयत्न करत आहे.

# अमरावतीत मॅफेड्रॉन पुरविणारे सूत्रधार गजाआड

## -मुंबईच्या माहीम व कुर्ला येथील रहीवाशी -७८ ग्रॅम मॅफेड्रॉन पुन्हा जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोठया प्रमाणात अवैधरित्या मॅफेड्रॉन (एम.डी.) अंमली पदार्थाचा मुंबईवरून अमरावती शहरात पुरवठा करणाऱ्या मुंबईच्या माहीम व कुर्ला येथील दोन मुख्य सुत्रधारांना अमरावती शहर गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे. गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, ३ कोटीच्या मॅफेड्रॉन जप्ती प्रकरणातील फरार आरोपी अजिम असद शेख रा. माहीम मुंबई हा मॅफेड्रॉन (एम.डी) या अंमली पदार्थाचा पुरवठा करणारा मुख्यसुत्रधार आहे. तो या प्रकरणातील दुसरा आरोपी शेख समीर शेख अमीर रा. गवळीपुरा अमरावती याला एम. डी.चा पुरवठा करण्यासाठी अमरावतीत येत आहे.

अजिम असद शेख हा मॅफेड्रॉन धंदा मोठ्या प्रमाणात करतो. यापूर्वी त्याचेवर २०२५ मध्ये तेलंगणा राज्यात ५५० किलो गांजा बाळगल्याचा गुन्हा दाखल आहे. अजिमने राजस्थान येथून मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ बोलावला होता आणि शुक्रवारी रात्री अमरावतीच्या ग्राहकांना देणार होता. या सर्वांना त्याने लालखडी ते नवसारी रिंगरोड येथे बोलावले होते. ही माहिती पोलिसांना मिळाली. गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा लावला.

ऑटोतून उतरताच अजिमला पोलिसांनी अतिशय शिताफीने ताब्यात घेतले. त्यानंतर दोन पंच व राजपत्रीत अधिकाऱ्यांच्या समक्ष त्याची चौकशी केली. तेव्हा त्याने आपली ओळख सांगितली. त्यांच्यासोबत पोलिसांनी शेख समीर शेख आमीर याला पण ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता ७८ ग्रॅम (एम.डी.) मॅफेड्रॉन पावडर किं ११ लाख ७० हजार व ३ मोबाईल असा एकूण १२ लाख १६ हजारचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



या दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने २३ मार्चपर्यंत त्यांची पोलिस कोठडीत रवानगी केली आहे. चौकशीत त्यांना हा अंमली पदार्थ कोणाकडून आणला अशी विचारणा केली असता त्यांनी मांगीलाल उर्फ मांगी रा. राजस्थान व बिरादा राम उर्फ बिरजु सेन रा. मिदीयान राजस्थान यांच्याकडून आणल्याचे सांगितले. अंमली पदार्थाचा पुरवठा करणारा आणखी एक मुख्य सुत्रधार सत्यम गणेश सोनवणे (वय ३६, रा. नेताजी नगर कुर्ला वेस्ट मुंबई) याला देखील गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्याची सखोल चौकशी सुरू आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात स.पो.नि. मनीष वाकोडे, महेश इंगोले, अमोल कडू , गजानन सोनुने, पोलिस अंमलदार सुनील लासुरकर, फिरोज खान, सतीश देशमुख, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, जहीर शेख, सचिन बहाळे, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, विकास गुडधे, अतुल संभे, मिर्झा नईम बेग, नाझीम उद्दीन सैयद, विशाल वाकपांजर, योगेश पवार, चेतन गुल्हाने, सागर ठाकरे, रंजीत गावंडे, राजीक रायलीवाले, सुरज चव्हाण, निखील गेडाम, संदीप खंडारे, प्रभात पोकळे, चेतन शर्मा, राहुल दुधे यांनी केली.

# कामात हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही - महापौर

## -निरीक्षक-कंत्राटदार समन्वयावर भर, कचरामुक्त अमरावतीसाठी निर्णय

**अमरावती/प्रतिनिधी:-** अमरावती शहर कचरामुक्त करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने स्वच्छता व्यवस्थेवर अधिक कडक भूमिका घेत पुढील टप्प्यातील कार्यवाहीला सुरुवात केली आहे. स्वच्छतेच्या कामात कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देत महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी स्वच्छता निरीक्षक आणि कंत्राटदार यांनी समन्वय ठेवून जबाबदारीने काम करण्याचे निर्देश दिले.

महापौरांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या आढावा बैठकीत शहरातील कचरा संकलन व्यवस्था, मनुष्यबळ, यंत्रसामुग्री उपलब्धता आणि नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शहरातील कचऱ्याची समस्या प्रभावीपणे निवारण करायची असेल तर स्वास्थ निरीक्षकांनी क्षेत्रनिहाय नियंत्रण ठेवणे आणि कंत्राटदारांनी कामाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणे आवश्यक असल्याचे महापौरांनी स्पष्ट केले.

स्वच्छता निरीक्षकांनी आपल्या विभागात नियमित पाहणी करून कचरा संकलन वेळेवर होत आहे की नाही याची खात्री करावी, तसेच कंत्राटदारांनी करारानुसार आवश्यक मनुष्यबळ व साधनसामुग्री उपलब्ध करून कामात कोणतीही त्रुटी राहू देऊ नये, असे निर्देश देण्यात आले.



दरम्यान, शहरातील वाढत्या कचरा समस्येवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी कंत्राट दरानुसार यंत्रसामुग्री वाढविणे अत्यंत आवश्यक असल्याचे महापौरांनी अधोरेखित केले. अतिरिक्त घंटागाड्या, कचरा संकलन वाहने व आधुनिक स्वच्छता उपकरणे उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित कंत्राटदारांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. यामुळे कचरा संकलनाची गती वाढून नागरिकांच्या तक्रारींमध्ये लक्षणीय घट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

स्वच्छता व्यवस्थेवर प्रभावी नियंत्रणासाठी झोननिहाय जबाबदारी निश्चित करून नियमित आढावा बैठक, क्षेत्रीय पाहणी आणि तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्रिय करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. 'स्वच्छ अमरावती हे केवळ उद्दिष्ट नसून प्रशासनाची बांधिलकी आहे. निरीक्षक, कंत्राटदार आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नातूनच शहर स्वच्छ व सुंदर बनेल,' असे महापौरांनी नमूद केले.

नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, ओला-सुका कचरा वेगळा देणे आणि स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

बैठकीस महानगरपालिका अधिकारी, स्वच्छता विभागाचे कर्मचारी, स्वास्थ निरीक्षक, संबंधित कंत्राटदार प्रतिनिधी व झोन स्तरावरील अधिकारी उपस्थित होते. अमरावतीला स्वच्छतेच्या बाबतीत आदर्श शहर बनवण्यासाठी आगामी काळात आणखी कठोर आणि नियोजनबद्ध उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

## जाहीर नोटीस

मी अँड जयंत मुरलीधर देव , माझे पक्षकार महंत विजयेंद्रदास गुरु लालदास यांनी दिलेल्या माहीती व अधिकारानुसार मी , अँड प्रथिप चांडक यांनी दिलेल्या दै. मंडल मध्येदि ०५.०३.२०२६ प्रकाशित झालेल्या नोटीस चे उत्तर देतो ते येणे प्रमाणे सदरसंपत्ती श्री बालाजी संस्थान र.न.ए -१८१४ चे मुळ मालकीची आहे. ह्या मालमत्तेचे वहीवाटदार महंत लालदास गुरू मथुरादास यांचे ०१.०५.२०२१ रोजी निधन झालेले आहे .त्यांचे वारसावरून जाइंट धर्मदाय आयुक्त अमरावती येथे वाद सुरु आहे .एक महंत राकेशदास गुरु लालदास म्हणवणाऱ्या व्यक्ती चा चेंज रिपोर्ट विरुद्ध माझे पक्षकाराने टांकलेले रिव्हीजन पिटीशन नं ०२/ २०२२ दि १९.०१ २०२३ रोजी आदरणीय जाइंट धर्यदाय आयुक्तांनी Squash आणि set aside केलेले आहे. त्यामध्ये राकेशदास याने दिवंगत महंत लालदास चे निधनानंतर दाखल केलेले दस्ताऐवजे बनावट आहे अथवा नाही याबाबत चौकशीचा आदेश दिला.त्यावर राकेशदास ने अपील केलेले नाही.सध्या या दस्ताऐवजांची चौकशी सुरू आहे .त्यामुळे सदर मालमत्तेचे बाबतीत कोणताही व्यवहार गैरकायदेशीर होईल याची नोंद घ्यावी

सही
**अँड जयंत मुरलीधर देव**
**९३७०३२३९५०**

# भुतेश्वर चौकातील तुंबलेल्या नालीची स्वच्छता

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील प्रभाग क्रमांक १३ आंबापेठ गौरक्षण परिसरातील भुतेश्वर चौक येथे मोठी नाली वारंवार तुंबत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. याबाबत स्थानिक नागरिकांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत नगरसेवक रतन डेंडुले यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला.

त्यानुसार आज नगरसेवकांच्या उपस्थितीत महानगरपालिकेच्या स्वच्छता विभाग व अतिक्रमण विभागाने संयुक्त कारवाई करत नाल्यात साचलेला कचरा व गाळ काढून टाकला. यामुळे नालीतील पाण्याचा प्रवाह सुरळीत झाला असून परिसरातील साचलेल्या पाण्याची समस्या दूर झाली आहे.नागरिकांनी प्रशासनाच्या तत्पर कारवाईचे स्वागत केले असून नियमित स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

## पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.

शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)

**संपर्क -**
**९६०७५८२०९४**

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि. / / रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **निमखेड** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **निमखेड** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **शाहेदा परवीन मोहम्मद ईस्माईल** अर्जात नमूद जन्म दिनांक **१३.०७.१९८१** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेड** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ........... हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४)

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) पंकज न.राऊत (पो.पाटील) | १) पंकज न.राऊत (पो.पाटील) |
| २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) | २) जे.व्ही.यावले (ग्रा.सेवक) |
| ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) | ३) प्रल्हाद प.सिरसाठ (सरपंच) |
| ४) डी.डी.फुटाने (तलाठी) | ४) डी.डी.फुटाने (तलाठी) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५२/२०२६
**प्रशांत व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०१.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Prashant Ambikaprasad Shukla, Age 50 Yrs. Occu.: Pvt. Job R/o Juni Vasti, Badnera, Tq. Dist. Amravati.
2. Sau.Chaya Surendra Upadhyay, Age 46 Yrs. Occu.: Housewife R/o Jaju Wadi Arvi, Tq. Arvi, Dist. Wardha
3. Shashikant Ambikaprasad Shukla, Age 44 Yrs. Occu.: Contractor R/o Juni Vasti, Badnera, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अंबिकाप्रसाद केदारनाथ शुक्ला व निर्मलाबाई अंबिकाप्रसाद शुक्ला** हे अनुक्रमे दिनांक 18.02.2010 व 14.03.2013 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रशांत व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रशांत व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. २२४/२०२६ ने.ता.२४.०४.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती सुषमा राजेंद्र टाकोडे, वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.अक्षय राजेंद्र टाकोडे, वय २७ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.प्रतिक्षा निलेशकुमार गावंडे, वय ३०६.० वर्षे, धंदा - घरकाम
रा.शिराळा, ता.जि.अमरावती
४. सौ.कांचन मयूर कोठे, वय २९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील **नामे राजेंद्र वामनराव टाकोडे** हे दि.**१४.०२.२०२६** रोजी **खानापूर**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २०.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १९४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# रखडलेल्या शेतरस्त्यामुळे शेतकरी त्रस्त

## २७ मार्चला सीईओ कार्यालयात करणार ठिय्या आंदोलन

■ प्रतिनिधी | खेट्री ■

*सस्ती येथील शेतरस्त्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून रखडल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसंग्रामसह शेतकऱ्यांनी २७ मार्च रोजी जिल्हा परिषद सीईओ कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.*



'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत-पाणंद रस्ते योजना' अंतर्गत सुरू असलेले हे काम राजकीय दबावामुळे जाणीवपूर्वक थांबविण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे यांच्या नेतृत्वात शेतकरी आंदोलन करणार असून, प्रशासनाविरोधात तीव्र भूमिका घेण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाच्या बदल्यात अनावश्यक मागण्या केल्या जात असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. 'रजिस्टर हक्क सोड लेख' देण्यासाठी दबाव टाकला जात असल्याने शेतकऱ्यांच्या कायदेशीर हक्कांवर गदा येत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. ऐन हंगामात रस्ता उपलब्ध नसल्यामुळे शेतीमाल वाहतूक करणे कठीण झाले आहे.

शेतकऱ्यांना माल डोक्यावरून नेण्याची वेळ येत असून, मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे.

**योजना कागदावरच; शेतकरी मात्र अडचणीत**

शासनाच्या गाजावाजा केलेल्या योजनांचा प्रत्यक्षात फज्जा उडत असल्याचे सस्तीतील प्रकारातून स्पष्ट झाले आहे. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी रस्ते उभारण्याच्या घोषणा केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात कामे राजकीय हस्तक्षेप आणि अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे रखडत असल्याचे चित्र आहे. परिणामी शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

'सस्ती येथील शेतरस्ता राजकीय दबावामुळे गेल्या काही महिन्यांपासून रखडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती साहित्य व शेतमाल डोक्यावरून नेण्याची वेळ आली आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी २७ मार्च रोजी सीईओ कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे.'

**दिलीप परनाटे,** जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम

# सोनाळा ग्रामपंचायतीत घोटाळ्यांची मालिका

## स्वतंत्र चौकशी समिती नेमण्याची सदस्या उके यांची मागणी ; अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला जिल्ह्यातील सोनाळा ग्रामपंचायतीत आर्थिक व प्रशासकीय अनियमिततांचा मोठा 'स्फोट' झाल्याचा गंभीर आरोप पुढे आला असून, ग्रामपंचायत सदस्या प्रतिभा संतोष उके यांनी स्वतंत्र चौकशी समिती नेमत थेट सरपंच व ग्रामसेवक यांच्या विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाची खातेनिहाय सखोल चौकशी न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशाराही त्यांनी दिल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे.

सदस्या प्रतिभा उके यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, सामान्य प्रशासन विभाग तसेच संबंधित पंचायत यंत्रणेकडे सादर केलेल्या निवेदनात गंभीर आरोपांची मालिका उघड केली आहे. ३१ जानेवारी २०२४ पासून ग्रामपंचायतीत सरपंच व सचिव यांच्या संगनमताने निधीचा मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा ठोस संशय व्यक्त करण्यात आला आहे.

ग्रामपंचायतीच्या निधीची प्राप्ती व खर्च यामध्ये मोठी तफावत असून रोखपुस्तक, बँक पासबुक व ताळमेळ पत्रकात विसंगती असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय विकासकामांच्या अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका (एमबी) आणि पूर्णत्व प्रमाणपत्रांमध्येही गंभीर तफावत असल्याचे निवेदनात नमूद आहे.

मनरेगा व इतर योजनांअंतर्गत कामे पूर्ण होण्यापूर्वीच त्यांचे मूल्यमापन केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तसेच बनावट बिले तयार करून साहित्य खरेदीत अनियमितता केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीमध्ये पारदर्शकता नसून ग्रामसभेच्या ठरावांमध्ये फेरफार झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. शासन निर्णयांचे उल्लंघन करून मनमानी कारभार केल्याचा ठपकाही ठेवण्यात आला आहे.

याप्रकरणी तात्काळ स्वतंत्र चौकशी समिती नेमून कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा देत उके यांनी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील, असेही स्पष्ट केले आहे. दरम्यान, या गंभीर आरोपांमुळे सोनाळा ग्रामपंचायतीतील कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, जिल्हा प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तर यांप्रकरणी ग्रामसेवक पूनम घायवट यांची बाजू जाणून घेण्यासाठी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

**"हो केवळ चूक नसून मोठा आर्थिक गुन्हा ?**

ग्रामपंचायत सदस्या प्रतिभा उके यांनी निवेदनात अनेक धक्कादायक आरोप केली आहे. या सर्व बाबी केवळ प्रशासकीय त्रुटी नसून जाणीवपूर्वक केलेला आर्थिक गैरव्यवहार व अधिकारांचा दुरुपयोग आहे. त्यामुळे स्वतंत्र चौकशी अधिकारी नेमून सर्व कागदपत्रे जप्त करून सखोल तपास करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# आस्की किड्समध्ये केजी विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळा थाटात



■ प्रतिनिधी | अकोट ■

आस्की किड्स शाळेत केजी-२ च्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ उत्साहात व थाटात पार पडला. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, अभ्यासाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन, सामाजिक कौशल्ये व यशाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रसिद्ध त्वचारोग तज्ज्ञ डॉ. आरती अंबाळकर, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अर्चना पखान, शाळेचे सचिव नितीन झाडे व प्राचार्य नेहा झाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

लहानग्यांच्या बोबड्या बोलातील भाषणे व आकर्षक नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. प्री-प्रायमरी विभागाच्या प्राचार्या संगीता बाळापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. समावेशक शिक्षणामुळे बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, तसेच केजी स्तरावर घेतलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरेल, असे मत प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. वर्गशिक्षिका नेहा पवार व सोनाली पांडे यांचे विशेष सहकार्य लाभले. मयुरी गोळे यांनी सूत्रसंचालन केले, तर हिमानी चंदन यांनी आभार प्रदर्शन केले.

# मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाची काळा चबुतरा येथे पानपोई



■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक, वैद्यकीय व सांस्कृतिक सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाच्या वतीने उन्हाळ्यात पांथस्थाना पिण्याचे शुद्ध व ताजे जल मिळावे यासाठी मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाच्या वतीने काला चबुतरा येथे पानपोई थाटण्यात आली आहे.

आज सोमवार दिनांक २३ मार्च रोजी सकाळी १०-३० वाजता काळा चबुतरा येथील दीपा क्लास सेंटर समोर थाटण्यात आलेल्या या पाणपोईचा प्रारंभ ज्येष्ठ समाजसेवी श्रीमती गंगाबाई सोहनलाल तापडिया यांच्या हस्ते व मंडळाचे मार्गदर्शक शरद चांडक, ब्रजेश तापडिया, मंडळाचे अध्यक्ष नितीन चांडक, सचिव जतीन राठी आदींच्या उपस्थितीत होत आहे. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या प्रारंभ सोहळ्यात उपस्थित राहावे असे आव्हान मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाच्या समस्त पदाधिकाऱ्यांनी केले.

# दिवंगत आमदार रामाभाऊ कराळे स्मृती चषक स्पर्धेचा जल्लोषात समारोप

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट क्रिकेट चॅम्पियन्स मल्टिटास्किंग असोसिएशनअंतर्गत कार्यरत अकोट सी.सी. क्रिकेट क्लबच्या वतीने आयोजित दिवंगत माजी आमदार रामाभाऊ कराळे स्मृती चषक अंतर्गत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२६ स्पर्धेचा अंतिम सामना व बक्षीस वितरण सोहळा नेहरू पार्क येथे उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. क्रिकेटप्रेमींच्या मोठ्या उपस्थितीत रंगलेल्या या अंतिम सामन्याने स्पर्धेचा समारोप रंगतदार ठरला.

सकाळी सात वाजता झालेल्या नाणेफेकीत मल्हार ११ संघाने विजय मिळवत प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. राष्ट्रगीतानंतर सामन्याला सुरुवात झाली. प्रथम फलंदाजी करताना विक्की द रेसर ११ संघाने १२ षटकांत ९ बाद ११९ धावा उभारल्या. या डावात विक्की मंडले याने १८ चेंडूत ४३ धावांची झंझावाती खेळी साकारत संघाला भक्कम धावसंख्या उभारून दिली.

प्रत्युत्तरादाखल मल्हार द चॅम्प ११ संघाने सुरुवातीपासून आक्रमक आणि संयमी फलंदाजी करत १०.२ षटकांत केवळ २ गडी गमावत लक्ष्य गाठले. गोविंद वर्मा, अभिषेक गोतरकर आणि रितेश मंडले यांच्या उल्लेखनीय खेळीमुळे मल्हार संघाने एकतर्फी विजय संपादन केला. गोविंद वर्मा याने फलंदाजीसोबतच गोलंदाजीतही प्रभावी कामगिरी करत १४ चेंडूत २१ धावा आणि २ षटकांत ११ धावा देत २ बळी घेतले. या अष्टपैलू कामगिरीबद्दल त्याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

सामन्यानंतर लगेचच बक्षीस वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संदीप बोबडे होते. प्रमुख अतिथी म्हणून आरोग्य सभापती मनीष



## मल्हार द चॅम्प ११ संघाचा दणदणीत विजय

रामाभाऊ कराळे, रवि ठाकूर, मनोज चंदन, बजरंग मिसळे तसेच आदर्श शिक्षक अश्विन हिंगणकर उपस्थित होते. भास्करराव वानखडे आणि गोविंद वर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत रामाभाऊ कराळे यांना अभिवादन करून करण्यात आले. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक भास्करराव वानखडे यांनी केले. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडू व पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. निस्वार्थ सेवा सन्मान गणेश धुराटे, बेस्ट ऑफलाईन स्कोअरर विनोद बुंदे आणि रमेश पानझाडे, बेस्ट ऑनलाइन स्कोअरर निलेश गौड आणि शुभम सुंडेवाले, बेस्ट पंच संदीप उन्होंने, संदीप राठोड आणि श्याम संतानी, बेस्ट तिसरे पंच विजय मानकर यांना देण्यात आले. विशेष सीसी क्लब व्यक्तिमत्व पुरस्कार २०२६ अविनाश अरबट आणि चेतन भगत यांना प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट आयोजक म्हणून विजय बेदरकर यांचा गौरव करण्यात आला. बेस्ट बॉलर म्हणून राहुल वर्मा, बेस्ट बॅटर आणि मॅन ऑफ द सिरीज म्हणून विक्की मंडले, तर अंतिम सामनावीर म्हणून गोविंद वर्मा यांना सन्मानित करण्यात आले.स्पर्धेचा अंतिम निकाल जाहीर करताना विजेता म्हणून मल्हार द चॅम्प ११ संघाला ७ हजार रुपये व ट्रॉफी, तर उपविजेता विक्की द रेसर ११ संघाला ३ हजार रुपये व ट्रॉफी प्रदान करण्यात आली.कार्यक्रमाला क्लबचे उपाध्यक्ष राजेंद्र मुन्हेकर, सहसचिव सुनील धुळे, कोषाध्यक्ष मंगेश जुनारे, कार्याध्यक्ष विजय बेदरकर, विधी सल्लागार मनोज वर्मा, मॅनेजर श्याम संतानी तसेच सदस्य विजय मानकर, अविनाश उन्होंने, दिनेश वानखडे, अनिल बाभूळकर, चंद्रकांत चापके, संदीप राठोड, ख्वाजा भाई तांबोळी यांच्यासह इतर सदस्य व क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय बेदरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिल बाभूळकर यांनी केले. सामन्यादरम्यान विजय बेदरकर आणि हर्षल मानकर यांनी समालोचनाची धुरा सांभाळली. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. विजेत्या संघाने ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष साजरा करत स्पर्धेचा समारोप उत्साहात केला.

# राजस्थानी संस्कृतीचा वारसा जपणारा 'गणगौर' उत्सव उत्साहात



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

शहरात राजस्थानी परंपरा आणि संस्कृतीचे प्रतीक असलेला 'गणगौर' उत्सव यंदा मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात साजरा करण्यात आला. १६ दिवस चालणाऱ्या या पारंपरिक उत्सवात महिलांनी आणि युवतींनी उत्स्फूर्त सहभाग घेत शहरात सांस्कृतिक रंगत निर्माण केली.

उत्सवाच्या निमित्ताने शीतला पूजनानंतर महिलांनी कुंभाराच्या घरून आणलेल्या मातीपासून गणगौर (माता पार्वती) आणि ईसरजी (भगवान शिव) यांसह विविध मूर्ती तयार करून त्यांना पारंपरिक वेशभूषा व दागिन्यांनी सजविले. चैत्र शुद्ध तृतीयेपर्यंत दररोज या मूर्तींना पाणी पाजण्याची परंपरा पाळत महिलांनी वाजत-गाजत विहीर, तलाव तसेच बागेत फेरफटका काढला.

धार्मिक मान्यतेनुसार, माता पार्वती होळीच्या दुसऱ्या दिवशी माहेरी येते आणि भगवान शिव तिला परत घेण्यासाठी येतात. त्यांच्या मिलनाचे प्रतीक असलेला हा उत्सव वैवाहिक सुख, अखंड सौभाग्य आणि कुटुंबातील समृद्धीसाठी साजरा केला जातो. नवविवाहित स्त्रिया पतीच्या दीर्घायुष्यासाठी, तर अविवाहित युवती योग्य वरासाठी हे व्रत करतात.

यावर्षी प्रथमच शहरात भव्य गणगौर रॅली व शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. अग्रवाल समाजाचे अध्यक्ष अनूप मोजिका यांच्या निवासस्थानापासून निघालेली शोभायात्रा शाकंभरी चौक, शिवाजी चौक मार्गे अग्रसेन भवन येथे दाखल झाली. या शोभायात्रेत ईसरजी व माता पार्वतीच्या आकर्षक झाकी, इंदुरी ढोल, डीजे तसेच सेल्फी पॉइंट यामुळे विशेष आकर्षण निर्माण झाले. मार्गात ठिकठिकाणी नागरिकांनी उत्साहात स्वागत केले.

उत्सवाचा समारोप अग्रवाल समितीच्या वतीने आयोजित स्नेहभोजनाने करण्यात आला. या कार्यक्रमात समाजातील सौ. श्रुतिका पोद्दार, सौ. महक केडिया, सौ. लोचन नरेदी, सौ. मीनाक्षी अग्रवाल, सौ. काजल शर्मा, सौ. खुशबू अग्रवाल, सौ. स्वाती अग्रवाल, सौ. पायल अग्रवाल, सौ. समीक्षा मेहाडिया यांच्यासह अनेक महिलांनी सहभाग घेतला.

तसेच कु. प्रथा शर्मा, कु. प्रिया चौहान, कु. प्रितिका वर्मा, कु. लीशा अग्रवाल, कु. पूजा अग्रवाल, कु. कार्तिका उपाध्याय, कु. मनीषा व्यास, कु. रसिका वर्मा, कु. कनक अग्रवाल, कु. सोनल दज्जुका, कु. ऋषिता अग्रवाल, कु. दिशा तिवारी, कु. श्रद्धा अग्रवाल, कु. कोमल वर्मा, कु. रिद्धी अग्रवाल आदी युवतींनीही उत्साहाने सहभाग नोंदविला.

### महिला भजन मंडळांचा जल्लोष

**अकोला :** स्थानिक श्रीराम व हरिहर संस्थान संचालित टिळक रोडवरील मोठ्या राम मंदिरात सुरू असलेल्या श्रीरामनवमी उत्सवास भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.उत्सवात गुरुमाऊली महिला भजन, ज्ञानेश्वरी महिला भजनी मंडळचे भजने होऊन परिसर राममय झाला.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १०९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# अतिवृष्टीग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित

## प्रशासनाविरोधात संताप वाढला

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सावरगाव परिसरातील शेतकरी गेल्या काही महिन्यांपासून अतिवृष्टीच्या मदतीपासून वंचित असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. गत खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. नुकसानीचे पंचनामेही करण्यात आले होते. त्यावेळी शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात मदत अद्यापही मिळालेली नाही.

नुकसानग्रस्त शेतकरी वारंवार तहसील कार्यालयात जाऊन पाठपुरावा करत आहेत. अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने शेतकरी नाराजी व्यक्त करत आहेत. कागदोपत्री अडथळे आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे अनुदानाचा प्रश्न रखडल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.



अनेक वेळा तहसील कार्यालयात जाऊन आधारकार्ड देऊन त्रुटी दुरुस्तीची विनंती केली, मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे मी अनुदानापासून वंचित आहे. संबंधितांनी तातडीने अनुदानाची रक्कम खात्यात जमा करावी, अन्यथा तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल.

**लक्ष्मीबाई राठोड,** शेतकरी, सावरगाव

दरम्यान, शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम तात्काळ त्यांच्या खात्यात जमा करावी, अन्यथा तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

**प्रशासनाची उदासीनता; शेतकरी आक्रमक**

शेतकऱ्यांना अद्याप अनुदानाची रक्कम मिळालेली नाही. हा विलंब केवळ तांत्रिक अडथळा नसून कर्तव्यच्युतीचा प्रकार असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. तहसील व महसूल विभागाकडून अपेक्षित तत्परता न दाखवल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक हक्क प्रलंबित राहिले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# २१६ युनिटला ६७ हजार रूपयाचे बिल

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा शहरातील संत कंवरराम धर्मशाळा परिसरात राहणाऱ्या एका घरगुती वीज ग्राहकाला महावितरणकडून आलेल्या अव्वाच्या सव्वा बिलामुळे मोठा धक्का बसला आहे. केवळ २१६ युनिट वीजवापर असताना तब्बल ६७ हजार ८० रुपयांचे बिल मिळाल्याने संबंधित ग्राहकासह परिसरातही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदर ग्राहक (ग्राहक क्र. ३९००१००६७१२२) वर्धा अर्बन विभागातील बिलिंग युनिट १८१३ अंतर्गत असून, सी. के. कावळे यांच्या नावावर वीज मीटर आहे. गेल्या वर्षभरात या ग्राहकाचा मासिक वीज वापर २०१ ते २१६ युनिट इतकाच नोंदवला गेला असून, दरमहा सरासरी २ ते ३ हजार रुपयांपर्यंत बिल येत होते. मात्र, मार्च २०२६ महिन्यासाठी त्याच प्रमाणातील वापरावर थेट ६७ हजार ८० रुपयांचे बिल देण्यात आले.या बिलामध्ये कोणतीही थकबाकी नसल्याचे ग्राहकाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे इतक्या मोठ्या रकमेचे बिल नेमके कशामुळे आले, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, महावितरणचे कर्मचारी ग्राहकाच्या घरी जाऊन बिल भरण्याची सूचना देत वीज जोडणी खंडित करण्याचा इशाराही दिल्याचे सांगण्यात आले.या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या ग्राहकाने संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असून, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याकडेही न्याय मागितला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून बिल दुरुस्त करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.ऊर्जा तज्ज्ञांच्या मते, मीटर रीडिंगमधील त्रुटी, तांत्रिक बिघाड किंवा बिलिंग प्रक्रियेत झालेली चूक यामुळे अशा घटना घडण्याची शक्यता असते. मात्र, अशा त्रुटींमुळे सामान्य ग्राहकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो.दरम्यान, या घटनेमुळे महावितरणच्या बिलिंग प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित झाले असून, संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन योग्य तो तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# रामभरोसे बंधारा!
# बोरखेडीत निकृष्ट दुरुस्तीवर संताप

### पहिल्याच पुरात वाहून जाण्याची भीती; ग्रामस्थांकडून चौकशीची मागणी



**आष्टी (शहीद)/ जनमाध्यम**

तालुक्यातील पाणीटंचाई ग्रस्त गाव म्हणून ओळख असलेल्या बोरखेडी येथे जांब नदीवरील पाटबंधाऱ्याच्या दुरुस्ती कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जलसंधारण विभागाच्या या कामाकडे कंत्राटदाराने बेफिकीरपणे पाहिल्यामुळे बांधकाम अक्षरशः 'रामभरोसे' सुरू असल्याची संतप्त प्रतिक्रिया गावकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

बोरखेडी, बंबरडा व थार या गावांसाठी जीवनदायिनी ठरणाऱ्या जांब नदीवरील पाटबंधारा हा उन्हाळ्यात पाण्याची टंचाई कमी करण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. मात्र, या बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना जुन्या भिंतीवर थेट काँक्रीट स्लॅब टाकून निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्याचा आरोप आहे. आवश्यक तांत्रिक प्रक्रिया व मजबुतीकरण न करता घाईघाईत काम उरकले जात असल्याचे चित्र आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, काँक्रीट टाकल्यानंतर त्यावर नियमित पाणी मारणे गरजेचे असते; मात्र प्रत्यक्षात कामाच्या ठिकाणी पाणी टाकण्यासाठी कोणताही मजूर दिसून येत नाही. त्यामुळे हे बांधकाम टिकाऊ राहणार नाही, अशी भीती व्यक्त होत आहे. पहिल्याच पुरात हा बंधारा वाहून जाईल, अशी चिंता गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे.या संदर्भात ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी विनीत साबळे यांना दूरध्वनीद्वारे माहिती दिली होती. मात्र, अधिकाऱ्यांनी काम समाधानकारक सुरू असल्याचे सांगितल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढली आहे. प्रत्यक्षात मात्र काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा ठाम आरोप स्थानिकांनी केला आहे.या प्रकरणी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यपालन अधिकारी तसेच जलसंधारण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. या कामाची सखोल चौकशी करून संबंधित कंत्राटदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.दरम्यान, पाण्यासाठी दरवर्षी संघर्ष करणाऱ्या बोरखेडीकरांसाठी हा बंधारा अत्यंत महत्त्वाचा असताना त्याच्याच दुरुस्तीमध्ये होत असलेल्या निष्काळजी पणामुळे प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आता तरी प्रशासन जागे होऊन या 'रामभरोसे' कामाची दखल घेणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.




## साहित्य उचलण्याच्या कारणावरून मारहाण

**वर्धा -** इतवारा बाजार परिसरात किरकोळ कारणावरून मारहाणीची घटना घडली. प्रल्हाद सदाशिव पेंदोर (६०) यांनी रस्त्यावर पडलेले साहित्य उचलून ठेवण्यास सांगितल्याने वाद निर्माण झाला. या कारणावरून गुड्डू फरिद शेख याने संतापून शिवीगाळ करत लोखंडी सळाखीने पेंदोर यांच्यावर हल्ला केला. या मारहाणीत ते जखमी झाले. परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. घटनेची माहिती मिळताच वर्धा शहर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी पीडिताच्या तक्रारीवरून गुड्डू शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरकोळ कारणांवरून होणाऱ्या वाढत्या वादांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## हटकले म्हणून युवकावर हल्ला

**वडनेर -** पोहणा येथे युवकावर मारहाणीची घटना घडली असून परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. बोपापूर येथील जीवेश चांभारे हा मित्रांसोबत आईस्क्रिम दुकानासमोर उभा होता. त्यावेळी होमेश्वर कोल्हे याने अचानक शिवीगाळ करत मारण्याची धमकी दिली. या प्रकाराला विरोध केल्याने संतप्त झालेल्या कोल्हेने जीवेशवर हल्ला चढविला. या मारहाणीत जीवेश जखमी झाला असून त्याला उपचारासाठी हलविण्यात आले. घटनेनंतर नागरिकांनी आरोपीविरोधात संताप व्यक्त केला. वडनेर पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. अशा घटनांमुळे युवकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे.

## घरातील साहित्य जाळण्याचा प्रयत्न, कुटुंबीय भयभीत

**वर्धा -** त्रिमूर्तीनगर परिसरात घरगुती वादातून गंभीर प्रकार घडला. गणेश गायकवाड याने कुटुंबीयांशी वाद घालत शिवीगाळ केली व संतापाच्या भरात घरातील सदस्यांना मारण्यास धाव घेतली. यानंतर त्याने घरातील लाकडी खाट व वडिलांचे कपडे पेटवून देण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने वेळेत कुटुंबीयांनी हस्तक्षेप केल्याने मोठी दुर्घटना टळली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वर्धा शहर पोलिसांनी तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घरगुती वादाचे रूपांतर अशा गंभीर घटनांत होत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

## इंदिरा मार्केटमधून दुचाकी चोरी

**आर्वी -** येथील इंदिरा मार्केट परिसरात दुचाकी चोरीची घटना उघडकीस आली. कैलास नागरीकर यांनी आपली एमएच ३२ एएफ ०७६८ क्रमांकाची दुचाकी बाजार परिसरात उभी केली होती. काही वेळाने परत येताच ती जागेवरून गायब झाल्याचे लक्षात आले. अज्ञात चोरट्यांनी दुचाकी चोरून नेल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे व्यापारी व नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. तक्रारीनंतर आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे पोलिसांनी गस्त वाढविण्याची मागणी होत आहे.

## विहिरीत उडी घेऊन इसमाची आत्महत्या

**वर्धा -** भूगाव येथे एक धक्कादायक घटना घडली असून गजानन पुरुषोत्तम गौळकर (४६) यांनी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची नोंद झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ते शेतीच्या कर्जामुळे ताणतणावात होते. या मानसिक दबावातून त्यांनी शेतातील विहिरीत उडी घेतली. घटनेची माहिती मिळताच सावंगी (मेघे) पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शेतकरी समस्येचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा समोर आला असून यावर ठोस उपाययोजनांची गरज व्यक्त होत आहे.

## अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांचा दणका

**हिंगणघाट -** तालुक्यातील शेकापूर बाई येथे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलीवर पोलिसांनी कारवाई करत सुमारे ७ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विना नंबर ट्रॉलीसह वाळू साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी राजेंद्र कृष्णा तिजारे (४२) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणेदार घनश्याम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध वाळू तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे. परिसरातील नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले असून अशा मोहिमा अधिक तीव्र करण्याची मागणी होत आहे.

## गळफास घेऊन विवाहितेची जीवनयात्रा संपली

**पुलगाव -** शहरातील आर. के. कॉलनी परिसरात घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. एका विवाहितेने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस येताच नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे.मृत विवाहितेचे नाव दीपा दीपक ढींग (खत्री) असे असून, त्या आपल्या कुटुंबासह पुलगाव येथील आर. के. कॉलनीमध्ये वास्तव्यास होत्या.

# सेलू तहसीलमध्ये 'तारीख पे तारीख'चा सुळसुळाट

**सेलू/ जनमाध्यम**

लाखो रुपये खर्च करून उभारलेली झगमगती इमारत, आधुनिक सुविधा आणि मोठमोठ्या घोषणा पण प्रत्यक्षात सेलू तहसील कार्यालयात जनतेची फरफट सुरूच असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. साध्या दाखल्यासाठी नागरिकांना वारंवार चकरा माराव्या लागत असून 'तारीख पे तारीख'च्या चक्रात अडकून सामान्य माणूस अक्षरशः हैराण झाला आहे.

उपविभागीय अधिकाऱ्यांच्या सततच्या भेटींमुळे तहसीलदारांचे दैनंदिन कामकाज ठप्प होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. सेलू आणि देवळी या दोन तहसीलचा कारभार त्यांच्या अखत्यारीत असताना देवळीपेक्षा सेलू तहसीलकडे वारंवार येण्या-जाण्यामुळे कामासाठी आलेल्या नागरिकांना तासन्तास थांबूनही




### उपविभागीय अधिकाऱ्यांच्या दौऱ्यांनी कारभार ठप्प

रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे. अधिकाऱ्यांच्या दौऱ्यांतच वेळ जातो, आमच्या कामाला वेळ कुठे? असा प्रश्न संतप्त नागरिक करत आहेत.दरम्यान, राज्य शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान'चा गाजावाजा मोठा असला तरी प्रत्यक्षात कार्यालयात फाईल्सचे ढिग साचलेले आहेत. जलद सेवा देण्याच्या घोषणांचा फुगा फुटल्याचे चित्र आहे. कर्मचारी वेळेवर हजर नसणे, 'सर्व्हर डाऊन'चा बहाणा आणि दलालांचा वाढता हस्तक्षेप यामुळे नागरिकांची पिळवणूक होत असल्याचे आरोप होत आहेत.ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना दिवसाचा मजुरीचा तोटा सहन करत तासन्तास वाट पाहावी लागते. काहींना तर पुन्हा-पुन्हा येण्याची वेळ येत आहे. त्यामुळे आर्थिक व मानसिक त्रासाचा डोंगर वाढत आहे. सरकारी काम म्हणजे वर्षभर थांब हीच म्हण आजही खरी ठरत असल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून कारभारात शिस्त आणावी, जबाबदारांवर कारवाई करावी आणि सामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# देवळीत व्यावसायिक गॅस सिलिंडर टंचाई

### छोटे व्यवसाय अडचणीत

**देवळ/जनमाध्यम**

शहरात व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या टंचाईमुळे चहा कॅंटीन, हॉटेल्स व कॅटरिंग व्यवसायिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून सिलिंडरचा पुरवठा कमी झाल्याने अनेक छोट्या व्यवसायांवर परिणाम झाला असून काहींना तात्पुरते दुकान बंद ठेवावे लागत आहे.

तहसील प्रशासनाच्या पथकाने अलीकडेच शहरासह ग्रामीण भागात कारवाई करत ११ घरगुती सिलिंडर जप्त केले. सध्या निर्माण झालेल्या परिस्थितीत घरगुती वापराला प्राधान्य देण्यात येत असल्याने व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा घटला आहे. परिणामी, व्यावसायिकांना आवश्यक तेवढा गॅस मिळत



नसल्याची तक्रार आहे.सिलिंडर उपलब्ध नसल्यामुळे अनेक चहा कॅंटीन चालकांनी दुकाने बंद ठेवली आहेत. काहींनी पर्याय म्हणून इलेक्ट्रिक शेगडीचा वापर सुरू केला असला, तरी वाढत्या वीज खर्चामुळे हा पर्याय परवडत नसल्याचे सांगितले जात आहे. काही हॉटेल चालकांनी भट्टी व लाकडी शेगडीचा वापर सुरू केला आहे; मात्र त्यामुळे कामाचा वेग कमी होत असून खर्च वाढत आहे.दरम्यान, कॅटरिंग व्यवसायावरही या टंचाईचा मोठा परिणाम झाला आहे. लग्नसराईचा हंगाम सुरू असताना अनेकांनी ऑर्डर्स घेतल्या आहेत; मात्र सिलिंडरच्या अभावामुळे त्या वेळेत पूर्ण करणे कठीण होत असल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे.हॉटेल व्यावसायिक पुखराज राजपुरोहित यांनी सांगितले की, गॅसअभावी कामाचा वेग मंदावला आहे. भट्टीवर काम करताना वेळ आणि खर्च दोन्ही वाढत आहेत.व्यावसायिकांनी शासनाने तातडीने व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

### उमेद महिला कॅडर संघटनेच्या
# समस्यांसाठी शासनस्तरावर प्रयत्न करणार : पालकमंत्री



**वर्धा/ जनमाध्यम**

गेल्या अनेक वर्षांपासून उमेद अभियानात तुटपुंज्या मानधनावर महिला कॅडर ग्राम पातळीवर ग्रामसंघामध्ये विविध माहिती संकलनाचे काम करीत आहे. अशा परिस्थित त्यांचे मानधन वाढविण्यासाठी व त्यांच्या विविध समस्यांसाठी शासनस्तरावर संबंधित विभागाशी चर्चा करुन प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रयत्न करणार, असे पालकमंत्री डॉ. भोयर यांनी आज येथे सांगितले.

दादाजी धुनीवाले सभागृह येथे संघर्ष उमेद महिला कॅडर संघटना महाराष्ट्रच्यावतीने विविध मागण्यांसाठी संघटनेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पालकमंत्री बोलत होते. बैठकीला संघटनेचे अध्यक्ष अतुल शेंद्रे, सचिव विजय दरणे, कल्पना खोबे, पृथ्वीराज शिंदे, आशिष कुचेवार आदी उपस्थित होते.महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे यासाठी बचतगटाची निर्मिती करण्यात आली आहे. या बचत गटांना सक्षम करण्यासाठी उमेद अभियान राबविण्यात येत आहे. उमेद अभियानांतर्गत ग्रामसंघ, प्रभाग संघ, तालुका संघ अशी साखळी तयार करण्यात आली आहे. यासाठी महिला कॅडरचा वापर करण्यात येत आहे. समाजातील प्रत्येक घटकांना न्याय देण्याचे काम शासन करीत असून महिला कॅडरला न्याय देण्यासाठी शासनस्तरावर आपल्या समस्या मांडून समस्याचे निराकरण करण्यात येईल. यासाठी महिलांनी निराश होऊ नये. कृषि सखी, बँक सखी, उद्योग सखींनी समन्वय ठेऊन कामे करावे. यश हे एक दिवस प्राप्त होणारच आहे, असे पालकमंत्री म्हणाले.यावेळी अतुल शेंद्रे यांनी उमेद महिला कॅडर संघटनेच्या महिला १ हजार ५०० रुपये मानधनावर काम करीत असून त्यांच्या मानधनात वाढ करण्यात यावी, अशा विविध समस्या पालकमंत्री यांच्या समोर मांडल्या. बैठकीला वर्धा, भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील संघटनेच्या महिला उपस्थित होत्या.

# वनसंवर्धनासाठी लोकचळवळ उभी राहावी : प्रदीप दाते

**वर्धा/ जनमाध्यम**

वाढते तापमान, तीव्र होत चाललेली पाण्याची टंचाई आणि प्रदूषणाचा वाढता विळखा या पार्श्वभूमीवर 'वनसंवर्धन' ही काळाची गरज बनली आहे. यासाठी केवळ शासनावर अवलंबून न राहता प्रत्येक सुजान नागरिकाने पुढाकार घेत लोकचळवळ उभी करावी, असे आवाहन विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ समाजसेवक प्रदीप दाते यांनी केले.

स्थानिक ऑक्सिजन पार्क येथे जागतिक वन दिन निमित्त निसर्ग सेवा समिती व देवळी येथील एस.एस.एन.जे. महाविद्याल याच्या एनसीसी विभागाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदीप दाते होते. प्रमुख अतिथी म्हणून मुरलीधर बेलखोडे, सुभेदार विनोद कुमार सिंग, कॅप्टन मोहन गुजरकर, डॉ. राजेंद्र बोरकर, वन क्षेत्र अधिकारी वैशाली भलावे, प्रा. रवींद्र गुजरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.या निमित्ताने आयोजित निसर्ग अभ्यास शिबिरात एनसीसी छात्र सैनिकांनी श्रमदानातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. ऑक्सिजन पार्क परिसरात दोन तास श्रमदान करून सुमारे १०० खड्डे खोदण्यात आले व त्यामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. 'वनसंवर्धन आपली जबाबदारी' या विषयावर परिसंवादही पार पडला. वन वाचवले तरच निसर्ग वाचेल, असे मत मुरलीधर बेलखोडे यांनी व्यक्त केले. डॉ. राजेंद्र बोरकर यांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन केले.वन क्षेत्र अधिकारी वैशाली भलावे यांनी वनसंवर्धनात नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगितले. एनसीसी छात्र सैनिकांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन मोहन गुजरकर यांनी केले. संचालन कोमल शितळे व कल्याणी लिखार यांनी केले, तर आभार प्रदर्शन रितेश बुटे यांनी मानले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैष्णवी कन्नाके, सत्येश्वरी सावरकर, समीक्षा नेवारे, कुंदन कावडे यांच्यासह एनसीसी छात्र सैनिकांनी परिश्रम घेतले. शेवटी हम सब भारतीय है... या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# इंदिरा हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**वर्धा(भानखेडा)/जनमाध्यम**

इंदिरा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, भानखेडा येथे सत्र १९९८-९९ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत शाळेतील दिवस पुन्हा अनुभवले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य दिपक कदम होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी प्राचार्य मनोहर बारस्कर, सालई येथील मुख्याध्यापक विठ्ठल पाटील, सेलडोहच्या मुख्याध्यापिका रंजना बोधने तसेच माजी मुख्याध्यापिका साधना कोल्हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात बीएसएफ निरीक्षक किशोर शेंडे यांनी शिक्षकांना माणवंदना देऊन केली.प्रास्ताविकात प्राचार्य कदम यांनी विद्यार्थ्यांना चांगल्या पालकत्वाचे महत्त्व, कुटुंबाच्या आर्थिक नियोजनाची गरज आणि



शासकीय योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन केले. तर मनोहर बारस्कर यांनी आरोग्याला प्राधान्य देण्याचे महत्त्व अधोरेखित केले.यावेळी माजी विद्यार्थी अशोक चावरे, राजू मस्कर, संदीप चौधरी, प्रफुल धोपटे, ज्ञानेश्वर देशमुख, रवी हिवंज, विनय निवल, सविता ताकसांडे, सुरेखा बाभुळकर, प्रतिभा बाळसराफ, स्वेता येसनकर, स्मिता पाटील, पूनम राऊत, दिनेश आगे, अतुल लोखंडे, उमेश भोमले, संदीप येसणकर, भारती खवट आणि सोनाली भुते यांनी आपल्या यशस्वी प्रवासाबद्दल अनुभव कथन केले.माजी शिक्षकांचा सत्कार करून विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच शाळेला १५ खुर्च्यांची भेट देण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. अमोल धोपटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विठ्ठल पाटील यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाला माजी शिक्षक विलास फुटाणे, शिला वरभे, विठ्ठल चौधरी तसेच अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ११५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# अखेर बेपत्ता सर्वज्ञचा नाल्यात आढळला मृतदेह

## अपघात की घातपात, तपासाकडे शहराचे लक्ष

## कृषी विद्यापीठ परिसरातील धक्कादायक प्रकार



**अकोला/प्रतिनिधीः-** शहरातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसरात रविवारी सकाळी उघडकीस आलेल्या घटनेने संपूर्ण अकोला हादरले आहे. तीन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या ११ वर्षीय सर्वज्ञ निंबाळकर या बालकाचा मृतदेह विद्यापीठ परिसरातील एका नाल्यात आढळून आल्याने नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सर्वज्ञ निंबाळकर हा १९ मार्च रोजी घरातून कोणालाही न सांगता बाहेर पडला होता. बराच वेळ उलटूनही तो घरी परतला नाही, त्यामुळे कुटुंबीयांची चिंता वाढली. परिसरात, नातेवाईकांकडे तसेच मित्रांकडे चौकशी करूनही काहीच धागादोरा न लागल्याने अखेर कुटुंबीयांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. त्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम हाती घेतली होती.

दरम्यान, सर्वज्ञला पोहण्याची आवड असल्याने तो परिसरातील विहिरी किंवा पाणवठ्यांकडे गेला असावा, अशी शक्यता व्यक्त करत बचाव पथकाच्या मदतीने विविध विहिरींमध्ये शोध घेण्यात आला. मात्र, तेथे कोणताही ठोस पुरावा मिळाला नाही. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही बालकाचा शोध घेण्याचे आवाहन करण्यात आले होते.

रविवारी सकाळी कृषी विद्यापीठ परिसरात मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या काही नागरिकांना एका नाल्याकडून तीव्र दुर्गंधी येत असल्याचे जाणवले. त्यांनी नाल्याजवळ जाऊन पाहणी केली असता पाण्यावर एका लहान मुलाचा मृतदेह तरंगताना दिसून आला. या प्रकाराची माहिती तत्काळ पोलिसांना देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करत मृतदेह बाहेर काढण्यात आला. ओळख पटविताना तो सर्वज्ञ निंबाळकर असल्याचे स्पष्ट झाले. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने तो काही दिवसांपासून पाण्यात असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

पोलिसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवला असून, या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, सर्वज्ञचा मृत्यू अपघाती आहे की यामागे (पान २ वर)

# बच्चू कडू यांच्या मेळघाट संघर्ष महापदयात्रेचे यश



**मेळघाटचा 'वनवास' संपण्याचा मार्गावर**
- आरोग्यमंत्री आबिटकर यांनी आश्वासनांची केली पूर्तता
- धारणीला ३०० खाटांचे सामान्य रुग्णालय निर्मितीला हिरवी झेंडी
- धारणी, चुरणी, चिखलदरा रुग्णालयांचा कायापालट

**अचलपूर/प्रतिनिधीः-** गेल्या अनेक वर्षापासून संपूर्ण राज्यात नव्हे तर देशात मेळघाटमधील कुपोषण आणि माता मृत्यूच्या भीषण समस्या नेहमी चर्चेत असते . या गंभीर समस्या बाबत गेल्या १ मार्च ते ९ मार्च पर्यंत माजी आमदार बच्चू कडू यांनी मेळघाट संघर्ष यात्रेचे आयोजन केले होते. यामध्ये माजी आमदार कडू यांनी आरोग्य सुविधांच्या अनेक समस्या प्रकाशात आणल्या होत्या. त्यानंतर राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी त्या पद यात्रेच्या अंतिम दिवशी भेट ही दिली होती .आणि मेळघाट मध्ये आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी माजी आमदार बच्चू कडू यांनी मांडलेल्या समस्यांची तत्काळ दखल घेत राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली आहे. यामध्ये आता धारणी, चुरणी आणि येथील चिखलदरा (पान २ वर)

# चार वर्षे विश्वासाचा गैरफायदा

## नोकराकडून ३ कोटींची फसवणूक

### व्यापाऱ्याची तक्रार; कुटुंबीयांसह सहा जणांवर गुन्हा



**अमरावती/प्रतिनिधीः-** वरुड शहरात विश्वासू कर्मचाऱ्याने च मालकाला गंडा घालत कोट्यवधींची अफरातफर केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. 'लोकेश ट्रेडर्स' या प्रतिष्ठित फर्ममध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने सुमारे ३.०५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपी गोपाल रामकृष्ण चौधरी (वय ४०) याने फर्म मालक लोकेश संतोष अग्रवाल (वय ४८, रा. वरुड) यांचा विश्वास संपादन करत टप्प्याटप्प्याने आर्थिक गैरव्यवहार सुरू केला. २०२१ पासून ते डिसेंबर २०२५ पर्यंत त्याने फर्मच्या बँक खात्यातील रक्कम विविध खात्यांमध्ये वळवली. विशेष म्हणजे, या व्यवहारांसाठी त्याने स्वतःच्या तसेच नातेवाईकांच्या नावाने उघडलेल्या आठ (पान २ वर)

# श्रद्धा की बारात अनोखा रोड शो आज

## श्रद्धा रियल होलसेल मॉल तर्फे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील लग्नाच्या हंगामाला खास बनवण्यासाठी श्रद्धा रिअल होलसेल मॉलतर्फे एक अनोख्या उपक्रमाअंतर्गत 'श्रद्धा की बारात' या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. ही श्रद्धा की बारात २३ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता काढण्यात येणार असून, शहरातील प्रमुख मार्गांवरून जात लोकांचे आकर्षण ठरणार आहे.

ही भव्य बारात राजकमल चौक येथून सुरू होऊन जयस्तंभ चौक, मालवीय चौक मार्गे इरविन चौकपर्यंत काढण्यात येणार आहे. या आयोजनासाठी आवश्यक पोलीस परवानगी घेण्यात आली असून, वाहतूक व सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात आली आहे, जेणेकरून नागरिकांना कोणतीही अडचण होऊ नये.

श्रद्धा की बारातीची सर्वात मोठी खासियत म्हणजे डबल डेकर 'बारात ऑन व्हील्स' असेल, ज्यामध्ये साउंड आणि लाईट्ससह विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. यावर मॉडेल्सद्वारे वेडिंग कलेक्शनचे लाइव्ह सादरीकरण केले जाईल, ज्यामुळे शहरवासियांना नव्या लग्न फॅशनची झलक पाहायला मिळेल. याशिवाय बारातीत ढोल-ताशा, पंजाबी ढोल, डान्स ट्रूप, घोडे, व्हिंटेज कार, एलईडी वॉल, आकर्षक लाईटिंग आणि लाइव्ह अँकरिंग असे अनेक आकर्षणांचा समावेश असेल, ज्यामुळे संपूर्ण वातावरणाला रॉयल लग्नाचा अंदाज मिळेल. या भव्य कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून पल्लवी संजराव सहभागी होणार असून, त्या बारातीची शोभा वाढवतील. (पान २ वर)

# विद्युत प्रवाहाच्या झटक्याने तरुणाचा मृत्यू

## गोपालनगरात काम करतानाची घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** गोपालनगर परिसरातील एका बांधकामस्थळी काम करत असताना विद्युत प्रवाहाचा धक्का लागून एका तरुणाचा मृत्यू झाला. रितेश विनोद लोणारे (वय २९, चवरेनगर) असे मृताचे नाव असून, त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. ही घटना २२ मार्च रोजी उघडकीस आली. रितेश इलेक्ट्रीकल कामकाजासाठी ओळखला जात होता.

माहितीनुसार, रितेश हा गोपालनगर परिसरातील एका बांधकामस्थळी काम करत असताना, तो ड्रील मशिनने भिंतीला छिद्र करीत होता. दरम्यान त्याला (पान २ वर)

# अंकिता नागतोडे यांची बुलढाणा जिल्हा परिषदेत निवड

## एमपीएससीत यश,मैत्री ग्रुपकडून सत्कार



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** शहरातील अंकिता नागतोडे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) परीक्षेत यश मिळवत बुलढाणा जिल्हा परिषदेत ग्रामीण पाणी पुरवठा विभागात निवड मिळवली आहे. तिच्या या यशामुळे संपूर्ण शहराचा गौरव वाढला असून सर्वत्र तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अंकिता नागतोडे हिने यापूर्वी सावंगी मगरापूर येथे (पान २ वर)

# शेतकरी कर्जमाफी आंदोलनाला यश

## डॉ. रामपाल धारकरांकडून बच्चू कडूंचा सत्कार



**अमरावती/प्रतिनिधीः-** गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या शेतकरी कर्जमाफीच्या आंदोलनाला अखेर यश मिळाले आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी बच्चू कडू यांनी केलेले उपोषण, विविध ठिकाणी काढलेल्या यात्रांमधून उभारलेला संघर्ष आणि सातत्याने केलेल्या आंदोलनामुळे सरकारवर दबाव निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री यांनी शेतकरी कर्जमाफीची घोषणा केल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयाबद्दल (पान २ वर)

# जागतिक जलदिनानिमित्त जलदिंडी





**अमरावती/प्रतिनिधीः-** जागतिक जलदिनानिमित्त इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन (IWWA) अमरावती केंद्र, दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) अमरावती केंद्र, जलसंपदा विभाग आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये जलदिंडी व 'पाणी आणि समानता' या विषयावरील व्याख्यानाचा समावेश होता.

सकाळी ७ वाजता शिवटेकडी येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयापासून जलदिंडीला सुरुवात झाली. अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून जलदिंडीचे उदघाटन करण्यात आले. या वेळी आनंद जवंजाळ, विवेक सोलंके, अरविंद मोकादम, प्रदीप कोल्हे, सुनिल राठी, राम विघे, संजय शिरभाते, डॉ. शरद मोहोड यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. जलसंपदा विभागाचे (पान २ वर)

# आत्महत्येसाठी गर्भवती महिला पोहोचली उंच टेकडीवर

## अग्निशमन दलाची धाडसी रेस्क्यू मोहिम



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वडाळी परिसरातील प्रथमेश तलावाजवळील जुन्या खदान परिसरात असलेल्या उंच टेकडीवरून आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असलेल्या आठ महिन्यांच्या गर्भवती महिलेचा जीव पोलिस, अग्निशमन दल आणि १०८ रुग्णवाहिका कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे वाचला. ही घटना शनिवारी (दि.२१) घडली असून परिसरात मोठ्या प्रमाणात चर्चेचा विषय ठरली आहे.

माहितीनुसार, संबंधित महिला कौटुंबिक कारणांमुळे मानसिक तणावाखाली होती. त्यातूनच ती टेकडीवर चढून आत्महत्या करण्याच्या उद्देशाने वर पोहोचली. (पान २ वर)

# फॉरेस्ट डेपो परिसरात देशी कट्ट्यासह आरोपी जेरबंद



**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील फॉरेस्ट डेपो परिसरात शस्त्र बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेने चलाखीने अटक केली. अक्षय मोहन उईके (वय २७, रा. कालीमाता नगर, परतवाडा) असे आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून लोडेड देशी कट्टा व जिवंत काडतूस असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. त्याच अनुषंगाने २० मार्चच्या रात्री एलसीबी पथक परतवाडा परिसरात गस्त घालत असताना, आरोपी अक्षय (पान २ वर)




# नगरसेवक रामेश्वर तांडेकर यांचे निधन



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील प्रभाग क्रमांक ७चे कर्तव्यदक्ष नगरसेवक रामेश्वर फकीरचंद तांडेकर यांचे अल्पशा आजाराने आज (दि.२२) वयाच्या ६२ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने दर्यापूर शहरावर शोककळा पसरली असून एक सच्चा, मातीशी जोडलेला लोकप्रतिनिधी हरपल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. शांत, संयमी व सामाजिक भान जपणारे तांडेकर यांनी आपल्या कार्यकाळात सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत काम केले. प्रभागातील विकासकामे, नागरिकांच्या अडचणी सोडविणे आणि जनसंपर्क यामध्ये ते नेहमीच आघाडीवर होते. त्यामुळे प्रत्येक निवडणुकीत त्यांना नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत असे. त्यांच्या पश्चात दोन मुलं, एक मुलगी असा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने कुटुंबियांसह संपूर्ण प्रभागातील नागरिक पोरके झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

त्यांची अंतिम यात्रा उद्या, दि. २३ मार्च रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरून निघणार आहे.

# गुंतवणुकीच्या आमिषाने डॉक्टरची फसवणूक

## आरोपी फरार



**अमरावती/प्रतिनिधी** - तिवसा येथे गुंतवणुकीवर मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका डॉक्टरची लाखोंची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तिवसा पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरू आहे. डॉ. सुधीर रामदास चक्रनारायण (वय ३९, रा. तिवसा) यांना ओळखीतील तुषार मनोहर ताकझुरे (वय ४५, रा. बीपीएल चांदूर, जि. अकोला) याने 'तिरुपती मार्केट टिप्स' या कंपनीत गुंतवणूक केल्यास दरमहा १० टक्के परतावा मिळेल, असे सांगून विश्वासात घेतले. आकर्षक नफ्याच्या आमिषाला बळी पडत डॉक्टरांनी मार्च २०२४ ते ऑगस्ट २०२५ या (पान २ वर)